[illegible] " १ " " ८८
टाक मखेर " ७ " " १८८
किरकोळ अंकास............... ८४

नोटिसी बद्दल
१० ओळीचे आत रु १
पुढें दर ओळीस ०१८६
दुसरे खेपेस ........०१

Per annum in arrears 1 " 1R. 8 a
Six monthly............ 3 " 8 as
Single copy.............................. 4as

Advertisements.
Below 10 lines...2
Per line over 10...4as
Repetition per line 3a

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXI — AKOLA MONDAY 4 APRIL 1887 — NO 13.

वर्ष २१ — अकोला सोमवार तारीख ४ माहे एप्रिल सन १८८७ इ० — अंक १३.

## नोटीस.

दरबाऱ्या वल्द रामजी माहार वस्ती मौजे नाकशरी तालुके खामगांव जिल्हा आकोला यासी खालीं सहीकरणारीण इजकडून नोटीस देण्यात येते कीं तुम्ही माझे लग्नाचे नवरे असून लग्नास सुमारें बारा वर्षें जाहलीं हल्लीं मी तरुण वयांत येऊन सुमारें ९ वर्षें जाहलीं ते दिवसापासून मी तुमच्याशी नपनवाऽप्रमाणें वेवहार करिते पण तुम्ही पुरुषांत नसल्यामुळें माझे तरुणपणाची माती होते कारितां ही नोटीस देतें कीं तुम्ही पुरुषांत आहात याबद्दल डाक्टरचे सरटीफिकिट व माझे खावटिबद्दल एक वर्षाचा आकार रुपये ४८ अट्ठेचाळीस दरमहा चार रुपये प्रमाणें पंधरादिवसाचे आंत माझे जपास आणून देऊन मजला घेऊन जावें नाहींतर या नोटिसीचे आधारें मी दुसरा नवरा करून जाईन मग तुमचा कांहीं हक्क राहणार नाहीं. कळावें ता० १९ माहे मार्च सन १८८७ इसवी

( सही )

सोनी मर्द दरबाऱ्या माहार वस्ती पिंपरी तालुके खामगांव जिल्हे आकोला निशानी खुद हातची बांगडी असे.

## नोटीस.

मारुती वल्द लक्ष्मण गुरळकार वस्ती मौजे वरुड ता० मेहकर जिल्हा बुलढाणा यास खालीं सहीकरणारीण इजकडून नोटीस देण्यात येते कीं तुम्ही माझे गंधर्वांचे नवरे असून गंधर्वास सुमारे दाहाबारा वर्षें झालीं असतील हल्लीं माझे पाठीवर तुम्हीं दुसरी सवत केली तीस सुमारे सहा वर्षे झालीं असतील ते दिवसापासून तुम्ही मजला नन रीतीप्रमाणें आपले घरीं नेऊन नांदवीत नाहीं. व अन्नवस्त्राचीही सोय करून देत नाहीं मी माझे भावाचे आश्रयानें राहून त्यांचेच कडून सावकारी कर्ज काढून खात आहे प्रस्तुत सावकारी पैसा फार झाल्यामुळें अधिक कर्ज देत नाहीं कारितां ही नोटीस तुह्मांस दिली आहे. तरी माझे अन्नवस्त्राचे खर्चाबद्दल दरमहा रुपये ४ प्रमाणें चार वर्षांचा आकार रुपये १९२ माझे भावाचे वतीं सावकारास देऊन मजला आपले घरीं घेऊन जावें व मजशी रीतीप्रमाणें व्यवहार करावा जर तुम्ही याप्रमाणें पंधरादिवसांचे आंत न कराल तर मी दुसरा नवरा करून जाईन मग तुमचा मजवर कोणते प्रकारे हक्क राहणार नाहीं कळावें ता० १९-३-८७ इ०

सही

पुंजाई मर्द मारोती गुरळकार वस्ती पिंपरी तालुके खामगांव जि० आकोला निशानी खुद हातची बांगडी असे.

## पत्रव्यवहार.

या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्याच मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. एडिटर साहेब वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

वि. वि. खालीं लिहिलेल्या चार ओळीस आपल्या सुंदर अंकीं स्थळ मिळेल ही आशा जाणू। शेवेसी पाठविल्या आहेत ती पूर्ण करणें आपणाकडेस आहे.

कसबे दाहिहंडा तालुके अकोट जिल्हा अकोला येथील मराठी शाळेंत तारीख २२ मार्च सन १८८७ इसवी रोजीं प्रातःकाळीं रा. रा. मारुती हनुमंत पाटील स्कुल कामिटीचे मेंबर यांनीं येऊन शाळेची तपासणी केली त्यावेळीं येथील अ. मास्तर नंबर पहिला यांची मेहरबान डे. ए. इ. जिल्हा अकोला यांचीं दोन महिने पर्यंत मुंडगांव तालुका मजकूर येथील फर्स्ट असिस्टंटचे जागी बदली करून त्यांचे जागेवर रा. नारायण जनार्दन अ. मास्तर पिंपळगांव काळे यांची नेमणूक करून तूर्त दोघेही असिस्टंट इन्स्पेक्टर साहेबांचे हुकूमावरून त्यांचे आफिसांत गेले आहेत. व येथील सेकंड अ० मास्तर रा. रामकृष्ण गंगाराम यांची ही थोडेदिवसां करितां केळीवेळी येथील मुलींचे शाळेवर नेमणूक झाली असे समजलें तेव्हां येथील मुलांस शिकविण्याची फार गैरसोय होऊं लागली हे पाहून सदरहू पाटील साहेबांनीं स्वतः चे खर्चानें एक पांच रुपये प्रमाणें सव्वा महिना पर्यंत मदतगार टीचर तारीख २२.३.८७ इसवीपासून नेमून दिला यामुळें शिक्षणाचे बाबतींत बरीच मदत झाली आहे. सदरहू पाटील आपलें कर्तव्यकर्म चांगलेप्रकारें बजावतात व विद्यावृद्धी होण्याकारितां सर्व गोष्टींत पुढारी होतात हें त्यांस फार भूषणास्पद होय. याचप्रमाणें थोडे दिवसांपूर्वीं सदरहु पाटील व रा. रा. गणेश सदाशिव देशपांडे व रा. रा. गणेशकृष्ण चेंडके यांनीं शाळेंत येऊन गरीब मुलांचे फीकारितां अनुक्रमे १ रुपया व आठआठ आणे दिले. तसेच येथील रा० रा० बळीराम सिताराम वृथामुंडी कुलमुखत्यार मुनीम निसबत नागोजी सोनाजी साहू दुकान दहिहंडा यांनीं उष्ण काळाचे दिवस व मुलांस घरीं गेल्या शिवाय पाणी पिण्याची सोय नाहीं ही मोठी अडचण पाहून स्वतःचे खर्चानें चारमहिने उन्हाळा संपपर्यंत दरमहा दीड रुपया प्रमाणें एक गुजराथीब्राह्मण पाणी पाजण्याकारितां नेमून दिला ही त्यांची देणगी आजतीन वर्षें सतत चालू आहे. व पुढें ही चालवितील ही आशा आहे. हे त्यांचे दातृत्व फार महत्त्वाचें व स्तुतीस पात्र आहे.

आपला ( क्ष )

रा. रा. वऱ्हाडसमाचारपत्रकर्ते यांस—साष्टांग नमस्कार वि० वि० फार दिवसांत आपली भेट घेतली नाहीं ह्मणून आपण रागावला असाल. परंतु काय करूं एडिटर साहेब आमच्या उमरावतींत आतांशा कांहींना कांहींतरी नवीन गम्मत असतेच. या मुळें वेळ कोणीकडे कसा जातो हें समजत देखील नाहीं असो.

स्वारी रवाना झाली— आपले परम दयाळू व फार दिवसाचे जुने जुडिशल कमिशनर कर्नल बेलसाहेब यांची प्रकृती नादुरुस्त झाल्या कारणानें ते फर्लो रजा घेऊन गेल्या मंगळवारी स्वदेशी जाण्याकारितां रवाना झाले. बेलसाहेब हे याप्रांतांत अगदीं प्रथम जे कामगार आले त्यांपैकींच एक असून यांचे बरेच दिवस ह्मणजे ३१ वर्षांवर येथेच गेलीं असल्या कारणानें प्रांतांतील सर्व लोकांना ते मोठे प्रिय झाले होते. पक्षकार वकील व ज्यांचा ज्यांचा त्यांच्याशी संबंध पडे त्यांना त्यांनीं त्रास ह्मणून कसा तो दिलाच नाहीं. बेलसाहेब नावाला मात्र रजेवर ह्मणून गेले आहेत परंतु त्यांची नौकरी पुरी झाल्या कारणानें आतां ते हिंदुस्थानांत परत येणार नाहींत ह्मणून त्यांची शेवटली भेट घेण्याकारितां गांवांतील च्यार सभ्य गृहस्थानीं रेलवे स्टेशनावर त्यांना जातां जातां पानसुपारी देण्याचा समारंभ केला होता. स्टेशनच्या मागल्या खुल्या जागेवर एक मोठी चांदणी दिली होती व चित्रविचित्र रंगाच्या निशाणांनीं सुशोभित केली होती. त्याप्रमाणेंच स्टेशनाच्या आंतल्या बाजूस ही रंगी बेरंगी निशाणें लावून व मंगल आम्र पल्लवाच्या माळाटांगून स्टेशन शृंगारलें होतें. स्टेशनला येण्याच्या रस्त्यावर ही कांहीं मोठीं मोठालीं निशाणें फडकत होतीं. सुमारें १० वाजण्याच्या सुमारास आपली एतद्देशीय मंडळी जमूं लागली गाडीची वेळा झाल्या बरोबर बेलसाहेब यांची मडम कन्या व इतर युरोपीयन गृहस्थ यांच्या गाड्या येऊन धडकल्या. बेलसाहेब आल्या बरोबर सर्वांनी त्यांना उत्थापन दिलें व मुख्यासनावर बसविलें. यानंतर आमचे येथील प्रसिद्ध वकील रा. रा. सदाशिव नारायण यांनीं बेल साहेबाचे गुणानुवाद थोडेसें भाषण करून गाईले. यावर गाडीची वेळ अगदीं झाली असल्या कारणानें फारशीं भाषणें वगैरे झालीं नाहींत. लागलेच बेलसाहेब मंडळीशीं आपलें शेवटलें भाषण करण्याकारितां व मंडळीनें घेतलेल्या तसदी बद्दल त्यांचे आभार मानण्या कारितां उभे राहाले. म्हातारा अगोदरच दयाळू त्यांत पुष्कळ दिवस इकडे राहिलेला या मुळें हा प्रांत सोडून जाण्याचें त्याला खरोखर वाइट वाटलें असेल यांत संशय नाहीं. मंडपांत शिरल्या बरोबर साहेबांचे तोंड अगदी उतरून गेल्या सारखे झालें होतें. यावर मंडळीचे आभार मानण्या कारितां उभे राहिल्या बरोबर तर म्हाताऱ्याला रडूच्याचा हुंदकाच आला. त्यांच्याच्यानें एक शब्द नीट बोलवेना. डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहु लागल्या काय चमत्कार पहा. आपण कोण. देशाचा कोणाचा चालतों कोठें व कुठे आपल्या घरीं चालतों असतां इतकें वाईट वाटण्याचे कारण काय? परंतु चीर सहवासांची गोष्टच अशी आहे. असो. बेलसाहेबांच्यानें फारसें बोलवलें नाहीं. कसें तरी च्यार शब्द बोलून त्यांनीं मंडळीची रजा घेतली साहेबांच्या मडमेची ही तीच अवस्था झाली होती बाई मंडपांत आल्या पासून गाडीचालू होई पर्यंत येक सारखी रडत होती. मंडळींना विचारून साहेब मुद्दाम आणविलेल्या सलासाच्या डब्यात बसले. व गाडी चालू झाली. त्या वेळेस पुष्कळांना वाईट वाटलें. गाडीखाली कित्येक ठिकाणी "फागसिग्नल" म्हणजे धुकण्याची सुचना देणारे बार लाविले होते त्यांचे आवाज गाडी गेल्या बरोबर झाले. असो. या प्रमाणें बेल साहेब या प्रांताची रजा घेऊन गेले, त्यांना पोंचविण्या करितां वुडक साहेब आपल्या मडमेसह मुंबई पर्यंत गेले आहेत.

बक्षिस समारंभ—येथील १ ला नंबर मुलींच्या शाळेचा वार्षिक बक्षिस समारंभ आज सकाळी शाळेच्या बंगल्यांत झाला. अध्यक्ष स्थानीं रा. रा. विष्णुपंत महाजनी इन्स्पेक्टर हे होते. गांवांतील इतर १५ किंवा २० सभ्य गृहस्थ आले होते. प्रथम साहेब सुंदराबाई मास्तरीण यांणी शाळेचा रिपोर्ट थोडक्यांत सांगितला नंतर रा० रा० श्रीधरपंत वगैरे गृहस्थांनीं शाळेसंबंधानें कांहीं चांगल्या उपयुक्त सुचना केल्या. या सुचना खरोखर महत्वाच्या आहेत व या संबंधानें आह्मी मनांतून आपल्यांला निराळीच कांहीं पत्रें पाठवून चर्चा सुरूं करावयाची आहे सुंदराबाई शाळेवर आल्या पासून शाळेची व्यवस्था फार चांगल्या रीतीनें चालली आहे असें कोणी ही शाळा पहाण्यास गेलो असतां दिसून येईल. पटावर एकंदर ८० मुली आहेत त्यांपैकीं निरनिराळ्या यत्तेंत १२ मुली पास झाल्या आहेत. शिवाय बाईचे स्वतःचे वर्तन लें निर्मळ असून टापटीप चांगली वापको माणसाच्या ताब्यांत देण्याचें वऱ्हाडांत हें पहिलें परिक्षा परंतु सुदराबाईनें फार की संकट [illegible] कोणती शिकार- काम चालविलें आहे [illegible] करून दाखविले वाटतो.

"आरंभ श[illegible]" असें आपल्या [illegible] लोक[illegible] [illegible] र.

पहा. आमच्या उमरावतीकरांनीं कोणचं सगळें गोष्ट हातांत घरली व ती शेवटास नेली असें प्रार्थेच नाहीं. तेरड्याचा रंग तीन दिवस ह्मणतात त्या प्रमाणें आरंभीं कांहीं दिवस मंडळी टुरटुर करिते पण कांहीं दिवस लोटले कीं झालें जिकडे तिकडे शिळे प्रत्येक गोष्टींत आमच्या उमरावती कराची अशी ही रड आहे. पहा म्युनिसि संबंधानें पानरे पोळकरेची, धर्मशाळाकरेची, अनाथगृह बांधेचे टाऊनहाल बांधेचो, यों करेचे नी त्यों करेचे मार सभ्या हात लावल्याव गप्पा मंडळी झाकीत असे. व आरंभीं कांहीं दिवस तर अगदीं अनन्यभावेंकरून त्यांचे कामावर तुटून पडत असे. पण शेवटीं झालें कायं कांहीं नाहीं. पाण्याचें बुडबुडे भरभर आले नी अगदीच गार झाले. आतां कोणी टाऊनहालचें किंवा पानरपोळाचें नांव देखील काढीत नाहीं. त्याप्रमाणेंच आनसुमारें १-२ महिने येथें अकोल्याच्या धरतीवर एक व्यापारी मंडळी स्थापित करण्याचें कांहीं पुढारी मंडळीनें मनांत आणिलें. त्याचें मंडळीचें प्रास्पेक्टस तयार झाला. जागोजागचे नियम बोलाविले. शेअर्स सुरू केले. बहुतेक शेअर्स भरले. मंडळीच्या आठवड्याच्या आठवड्यास नियम पास करण्या करितां व व्यवस्थापक मंडळी, डिरेक्टरस्, खजानजी वगैरे नेमण्या करितां सभा होऊं लागल्या. सर्व कामगार निवडले गेले व कंपनी आतां खचित स्थापन होणार असें खास ठरलें. पण शेवटीं झालें काय! कांहीं नाहीं. प्रथम चार दिवस जी गडबड दिसून येत होती ती सर्व शांत होऊन व्यापारी मंडळीचें आतां नांव देखील ऐकूं येत नाहीं. जी मंडळी या कामांत अगदीं पुढारी होती त्यांना वाईट वाटून ते पुनः पुनः उत्साह आणण्याकरितां प्रयत्न करीत असतात परंतु तिकडे लक्ष्य देतो कोण. डिरेक्टरांचे मंडळींत जे गृहस्थ नेमले गेले आहेत ते सर्व उत्तम वाडणे अनुभविक व विद्वान गृहस्थ आहेत. परंतु खरा जोडून काय करणारा मात्र एक ही दिसत नाहीं. का करण्यास दुसरा तयार असता पाहिजेल तो हुद्दा आपल्या अंगावर घेण्यास पाहिजे तो तयार होईल. परंतु आरंभ करावा कोणी. कोणी ह्मणतात या कंपनीपासून तोटा होईल. कोणी ह्मणतो भांडणा की कटकट पाहिजे कशाला. सारांश कोठें कांहीं नाहीं. मंडळी स्थापण्याचा बेत अगदीं शेवटास गेला असतां ही शेवटीं [illegible] गाहीं टाकलेल्या स्वरूपा [illegible] [illegible] प्रमाणें आमच्या [illegible] गायन [illegible]

[illegible] अवस्था आहे. असो. असा एक किंवा दोन निघतील [illegible] [illegible] परंतु आतां कांहीं लिहित नाहीं. [illegible] जागा फार अडली [illegible] माफ करा. [illegible] विनंती.

तारीख २० मार्च [illegible] न १८८७ इ० [illegible] आपला [illegible] किरस्ता.

[illegible] of [illegible]

Amraoti. The [illegible]

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र शुद्ध ११ शके १८०९

# आमच्या राजप्रकरणीं व सार्वजनीक मंडळ्या

उच्च प्रतीच्या शिक्षणा पासून मनुष्याला जे अलभ्य लाभ होतात त्यापैकींच मी कोण, माझी अवस्था काय आहे, मी कशा करितां जन्मलों वगैरे गोष्टी आपल्या कळूं लागणें हा होय. आमच्या सरकारच्या मेहेरबानीने आमच्या लोकांना हें उच्च प्रतीचें शिक्षण बरेंच मिळूं लागलें आहे व वर लिहिलेले प्रश्न आतांशा आमच्या लोकांच्या डोक्यांत बरेच शिरूं लागले आहेत. उच्च प्रतीच्या शिक्षणाचा आमच्या लोकांवर जो परीणाम व्हावा तो हळूं हळूं होतो आहे. व याचीं उदाहरणें आपली राज प्रकरणी, सामाजीक व धर्म संबंधी स्थिती काय आहे ती नीट पाहून तींत सुधारणा करणें योग्य आहे किंवा नाहीं, योग्य असल्यास कोणत्याप्रकारची सुधारणा केली पाहीजे वगैरे गोष्टींचा विचार करण्या करितां जागजागीं अलीकडे ज्या सभा, मंडळ्या वगैरे स्थापन होत आहेत त्यां वरून स्पष्ट दिसत आहेत या मंडळ्या अलीकडच्या १०–१५ वर्षांत नाहीं नाहीं तरी सर्व देशभर शेकडों हजारों झाल्या असतील परंतु त्यापासुन इष्ट हेतु यावेतसे सीद्धीस जात नाहीत. कीत्तेक ठिकाणीं तर असल्या मंडळ्यांचा उदय जाणी लय बरोबरच होतो व केव्हां केव्हां यांचे अस्तित्व दिसण्यांतही येत नाहीं. ही खरोखर मोठी दुःखाची गोष्ट आहे. आतां आपल्या या सभा व मंडळ्या यांच्या हातून इच्छीलेलें काय शेवटास कां जात नाहीं व ह्या पासुन योग्य उपयोग कां होत नाहीं या प्रश्नांचे उतर देणें ह्मणजे अनेकवार गाईलेलें रडगाणें पुनः गाण्या सारखें होणार आहे. राज प्रकरणीं हक्क मिळविण्याकरितां सरकारशीं भांडणें राज्य व्यवहर्यांत सरकार नियमकरीत त्यांच्या तथ्यातथ्याचा विचार करून त्यांचे गुण दोष काढणें सरकारानें योजिलेल्या कामाराच्या न्याय अन्याय गोष्टी पहाणें व सरकारच्या हातून चूक झाली असतां त्याचे कान उघडणें इत्यादि गोष्टींची स्फुर्ती अलीकडे आमच्या लोकांत बरीच झाली आहे. राज प्रकरणीं आमची स्थिती व आमचे हक्क आम्हाला पूर्णपणें समजूं लागले आहेत. ही गोष्ट निर्विवाद आहे खरी, तथापि या गोष्टींचा उहापोह करण्या करितां ज्या मंडळ्या किंवा सभा जागजागीं स्थापन होतात त्यांची वृद्धि किंवा भरभ होत नाहीं. पूर्वोक्त अशा प्रकारच्या मंडळ्या अनेक आहेत- परंतु तेथें एखाद्या खेडेगांवाच्या किंवा साधारण केकोणच्या अशा सार्वजनिक मंडळींचीं जा कर्में किंवा जो पराक्रम आपल्या पाहण्यांत व ऐकण्यांत येतो तसा इकडल्या मोठमोठ्या शहरांही दिसून येत नाहीं. इंग्लंडांत शहरोंतहीं गावोगांवीं व खेड्यांपाड्यां वगैरे ठिकाणच्या मंडळ्यांचे देखील सरकारांत वजन असतें व सरकार त्यांच्या सुचनांचा विचार करिते. आमच्या इकडे तसें कांहींच दृष्टीस पडत नाहीं. कित्येक ठिकाणीं तर सरकार आमच्या सुचनाकडे नुसतें ढुंकून देखील पहात नाहीं. याचें मुख्य कारण आपल्या इकडील अशा प्रकारच्या मंडळ्यांच्या अंगीं जें उदेशैक्य किंवा स्नेहभाव ज्याला इंग्रजींत "कोहिजन" ह्मणतात तो दिसून येत नाहीं. आपल्या इकडे एखादी सार्वजनिक मंडळी स्थापन झाली ह्मणजे तिचा विस्तार बहुत करून तो प्रांत किंवा तो इलाखा याच्या बाहेर कधीं जात नाहीं. तिचा सर्व वर्तनक्रम बहुत करून स्थानिक विषया संबंधानें च असतो. बंगाल्यांत सभा स्थापन झाली ह्मणजे तिचा संबंध मुंबई किंवा मद्रास इलाख्यांतील सार्वजनिक विषयांशीं रहात नाहीं फार कशाला. एखादा प्रांत किंवा इलाखा घेतला तर त्या लहान मंडळ्या असतां त्याचा देखील परस्परांशीं फारसा संबंध नसतो. मग परका प्रांत किंवा परका इलाखा याची गोष्ट दूरच. या कारणामुळें असल्या सार्वजनिक मंडळ्यांचें वजन पडावें तसें पडत नाहीं. इंग्रजींत "ऐक्य हेंच बळ आहे" अशी एक ह्मण आहे व ही ह्मण सर्वत्र लागूं पडते. आम्ही आपल्या स्थानिक विषयांचाच विचार करीत आपला सर्व वेळ घालवूं लागलों, सर्व देशाला साधारण अशा ज्या गोष्टी आहेत त्या अमकी मंडळी करील किंवा तमकी करील असें जर ह्मणत बसलों तर त्यापासून कांहीं होणार नाहीं. एकच काय करणें आपल्याला बरें दिसलें नाहीं व आग्रह णें आम्ही केलें नाहींतर आमच्या ठिकठिकाणच्या लहान लहान मंडळ्या चार दिवस टुरटुर करून लयास जातात बोल बळ तें [illegible] वर्षांत देशाला सर्व साधारण अशा गोष्टींचा विचार होतो आहे असें आमच्यांत एक काय ती नॅशनल काँग्रेस आहे. परंतु तिची स्थापना नुकतीच झाली असल्या कारणानें व तिचा उदय वर्षांतून एकदांच होत असल्या कारणानें तिच्या हातून अजून कांहीं झालें नाहीं. या काँग्रेसच्या अगोदर आमच्यांत प्रसिद्ध सार्वजनिक मंडळ्या मुळींच असें नाहीं. परंतु वर्तन काळांत त्यांचे इष्ट ऐक्य नसल्या कारणानें सर्व देशाला साधारण हितकर अशी चांगलीशी गोष्ट एकही त्यांच्या हातून झाली नाहीं. पुण्याची सार्वजनिक सभा, मुंबईची प्रेसिडेन्सी असोसिएशन व बंगाल्याची नॅशनल लीग यांनीं केवळ स्थानिक संबंधाचीं पुष्कळ कामें केलीं असतील परंतु साधारण देशहिताचें काम एकही त्यांच्या हातून चांगलेसें झालें नाहीं. हेंच जर त्यांचे परस्पर ऐक्य असतें व केवळ स्थानिक गोष्टी शिवाय त्यांनीं देशहिताला साधारण अशा गोष्टींचा विचार एकमतानें करून आपले प्रयत्न चालविले असते तर त्यापासून पुष्कळ फायदा झाला असता. याकरितां आपापल्या प्रयत्नांत परस्पर ऐक्य भाव ठेवणें ही गोष्ट आमच्या मंडळ्यांनीं चांगली लक्ष्यांत ठेविली पाहिजे.

( पुढें चालूं. )

आम्हीं आपल्याला हितकर अशा गोष्टी सरकारा जवळ मागण्या करितां कितीही ओरड केली तरी त्या देण्याचें मनांत येई पर्यंत त्या ओरडीकडे लक्ष्य द्यावयाचें नाहीं असा आमच्या सरकारचा निश्चय झाल्या सारखा दिसतो, व या मुळें प्रत्येक सरकारचें जें कर्तव्य कर्म आहे तें तें नीट रीतीनें बजावण्याची हयगय करितें असें कित्येक वेळा ह्मणण्याचा प्रसंग आमच्यावर येतो. स्थानिक स्वराज्य देशांत इतर कित्येक ठिकाणीं लागूं केलें त्या प्रमाणें च आमच्या वऱ्हाडांत लागूं करण्या विषयीं आमच्या लोकांची किती ओरड आज पर्यंत चालली होती. रिपन साहेब व्हाइसराय असतां त्यांनीं ही गोष्ट कबूल ही केली होती परंतु तिकडे लक्ष्य देतो कोण? पुष्कळ कटकट करितां करितां शेवटीं जिल्हे व तालुके लोकल बोर्डांचा कायदा आमच्या प्रांता करितां प्रसार झाला. हा कायदा १८८६ सालाच्या आरंभा पासून च अमलांत आणावयाचा असें या कायद्यांत लिहिलें होतें परंतु ८६ साल जाऊन आतां ८७ शींही अर्धेमुर्धे गेलें. तथापि अद्याप कांहीं नाहीं. आमच्या स्थानिक सरकारला या संबंधानें मुळींच विसर पडला कीं काय समजत नाहीं. आमच्या हिताच्या गोष्टी विषयीं सरकार जर अशी उदासीनता व हयगय दाखवूं लागलें तर आमचें दुर्दैव समजावयाचें. दुसरें काय!

# The Berar Samachar

MONDAY APRIL 4 1887

## THE FUTURE OF THE WORKING OF OUR LOCAL SELF-GOVERNMENT SCHEME.

The new Municipal Law has scarcely been declared applicable to Berar than we feel extremely anxious as to its probable future. The occasion that has caused in us such a solicitude for the sapling of Local self government is rather a terrible gust of wind that threatens to uproot it. To come to plain language, we have heard with deep regret of the resolution adopted by the Municipality of Amraoti, a centre of light and leading so far as Berar municipalities are concerned, about the abolition of the duty on vehicles passing over the municipal roads. If the public have watched with the least care what has been written about the camels of the Commissioner saheb in our columns, they need not claim an extra amount of shrewdness to guess and guess correctiy what has been at the bottom of this resolution. The facts all lie in a nutshell; the Commissioner's camels were detained by the Naka farmer at a certain Naka near the Amraoti Cotton Market, for not paying the customary toll on demand; this enraged our Commissioner and some correspondence passed between the President of the Municipality, Colonel Bullock and the Commis-

sioner. The Commissioner had asked what steps the Committee would take to punish the Naka contractor, who had the audacity to follow the toll rules rather strictly, as well as the municipal Overseer who abetted the offence of the former by telling him to do what the rules warranted. The Committee thought fit to take no steps against the two guilty persons and the Commissioner Saheb one morning appeared at the meeting of the Municipality with the object, it was said, of representing the oddity o the Nakas. *So far the facts*; the resu of the Commissioner's presence was, as we have said the abolition of the Nakas altogether. Now we would protest against any interference of this kind in matters purely within the authority of the Municipality. The Commissioner is at most a *controlling* authority, but certainly we should think it quite an out-of-the-way step on the part of the Commissioner to have personally visited the meeting of the Municipality and thus to have influenced directly the deliberations of the Committee. To say that the members, official and non-official, were not influenced in abolishing first some Nakas and th[illegible] a stroke, by the presence [illegible] Commissioner, would be to show an utter ignorance of the relations between persons possessing superior power and those that have to deal with them with a full consciousness of that supreme power. If every one of the members of the Municipal Committee, including the President, were put on his oath, hardly one will be found to say that they were not more or less influenced by the presence of the Commissioner. And it is the most natural thing that it should be so; it is not a weakness to which the members of the Committee are peculiarly prone. The Commissioner, we are informed, was made aware of the fact that the revenue from the toll was a very considerable portion of the total revenue of the municipality and could not be safely dispensed with; and the Commissioner thought that some of the Nakas at least were particularly obnoxious and those, if not all, should be abolished, and that an octroi duty—the much detested octroi, against which the Resident has often protested, might be levied instead of the present toll. After some deliberation, in which free thought had very little play, a make shift compromise was come to by which the Commissioner was to recoup the Committee for the loss it would have to sustain by the abolition of the Nakas, by undertaking to repair some of the *thorough* roads from Imperial revenues. At the very next sitting of the Committee the Nakas were abolished altogether. This was indeed abolition w[illegible] a vengeance. All the native members present were for, and all European members *against* the abolition of the Nakas! Indeed there was very little wisdom shewn in the measure and the suicidal spirit that guided the members at this second meeting was only equalled by their timid action at the first. To have given up a goodly income of 7000 Rupees a year was not at all a measure calculated to be in harmony with the prospects of financial pressure on account of the growing wants of a prosperous town like Amraoti. The roads of the city have to be repaired out of this fund and every year something from the fund is spent on the drainage works, the necessity for which is becoming axiomatic every day. To have given up such a decent sum, without providing for the amount in some other way, betrayed, to say the least, of it a very great want of foresight and due regard to the public interests. The tax was very light and was not much felt by the people; it prejudiced no particular interests of the city and to have abolished such a tax on the merest possibility of finding out *some* other tax instead! Certainly the public have a right to demand an explanation of their ill thought actions from the Committee. The members might have been under pressure; but the public are free and they have a right to say that they shall not be burdened with any new tax when the income could come in so easily to the Municipality and with so little pressure felt by the people.

Is all this a probable forecast of the future working of our Local Self-Government scheme? Is the free action of Committees to be fettered by the presence of a controlling officer? We earnestly hope not; and we also hope we will find members on the new Committees more plucky in standing on their rights.

But perhaps, it is not pluck that our civic fathers at Amraoti are wanting in. They were taken by surprise and had very little time to think over the matter in right earnest from all points of view. A Sub-Committee has been appointed either to curtail expenditure or to suggest a new tax. We would ask the Sub-Committee to see that they should not lose sight of the expediency of the tax that they have abolished with so little thought in as much as its incidence is general, its pressure is least felt, and it is collected without great expense, and thus has almost all the ingredients which underlie the principles of good taxation. We would also ask the public of Amraoti to make a strong representation to the Committee, and if necessary to the Resident, to reimpose the cart tax and save their purses.

Much has been urged as to this tax working as preventive of traffics and the abolition of many of the Nakas is tried to be defended on this ground, but we shall show in one of our issues, that the fears are perfectly groundless and that the tax is on the contrary really a very good tax.

---

Mr. Godfrey the 2nd clerk of the Deputy Commissioner's office here has been recommended for confirmation in the appointment of Head Clerk on Rs. 200. We have already informed our readers that Mr. Francis a member of the Executive Engineer's office Establishment, has been appointed 2nd Clerk on Rs. 100. We do not know on what grounds this appointment is made to the prejudice of one of the able office hands who, we are informed deserves promotion. Colonel Grant has in the appointment of Mr. Godfrey shewn the strictest sense of duty and strength of mind but we do not know what to say of his action with regard to the 2nd Clerk's appointment.

Whatever be the cause of this we hope that Colonel Grant will not forget the claims of the office hand above referred to for promotion in the English or Vernacular Department, because he has passed the Departmental Lower Standard Examination when a suitable vacancy occurs hereafter.

---

Says the Statesman:—

" We suppose that retrenchments are unavoidable under the present financial pressure, and it would be unjust to imagine that heads of official departments are not as reluctant as ourselves, to reduce their establishments, and turn old hands adrift upon the world, to seek other employ. Unfortunately, we find men of a hard nature here and there, in positions of influence, and whose want of imagination and sympathy makes them careless altogether of the circumstances of their subordinates. A more common complaint is the favoritism or to speak more plainly the injustice, of many heads of offices, in the matter of promoting their subordinates. Thus we have a letter before us complaining that since Mr. ——— became head of the ——— office, the native assistants are systematically passed over for promotion, which is confined almost exclusively to Christians. The writer says that Christian boys who have not even attended a high class school, are appointed to posts of Rs. 40 to Rs. 60 a month where native under-graduates, who have served for years in the office, are still in lower grades.

" Young men after passing the Entrance or the First Arts Examination join the office as apprentices, and after remaining there for years, may get an appointment of Rs. 30 with expectations of promotion, but as long as there is any Christian assistant in the grade, however low on the list and however unqualified, no native assistant can look for promotion, "

Setting aside the injustice of such conduct, no course could be more unwise. We do not think it is common, but the complaint which reaches us in the present case, is so specific that we do not like to pass it by. We have no means of verifying the charge, and therefore suppress the name of the officer of whose injustice the complaint is made. Since writing thus, *Reis and Rayyet* publishes a letter in which the Accountant General's office is complained of as follows:-

" The following arrangement has been recently made to fill up some long standing vacancies in the office of the Accountant-General, Bengal. Mr. J. Andrews, who stood 46 th in the grade 40 rising to 55, has promoted to the grade 60 to 85, Mr. E. H. S. Williamson, who stood 81 st in the same grade has also been promoted to the same grade. Mr. A. E. Thomas, who stood 30 th, and Mr. J. D. Thompson, who stood 40 th or lace in the list of supernumeraries, getting 30 per month, have been promoted to the grade of 40 to55. It will be seen from the above statement that a wholesale supersession of native officers has taken place in the office. Was there no native in the office fit for promotion ? "

We have reproduced the above in order to bring to the notice of the Berar public and the officials the glaring injustice which is being done to the poor native clerks and the discontentment felt by the people on account of such action. We hope that the Berar officials will not try to justify their similar actions on the score that they are not the only persons who deal with the natives in the manner stated in the above extract. Woe to the natives!! They are thwarted in their rise in higher service by the " genuine Europeans and the lower by the " Country Europeans " ( the Eurasians)

---

## वऱ्हाड.

हवामान:—ह्या आठवड्यात उष्णतेचें मान थोडें अधिक झालें आहे. संध्याकाळीं अभ्रें येऊन हवा कुंद होऊन गारवा भासतो. ताप व खोकला यांचा आजार गांवांत सुरू झाला आहे. देवीची साथही आसपास व येथेंही तुरळक सुरू झाली आहे.

मे० कर्नल बेक सा० डेप्युटी कमिशनर यांची स्वारी ता० २९ मार्च सन १८८७ इ० दुपारचे गाडीनें विलायतेस फर्लोवर निघून गेली. त्यांचा आतां पुन्हा परत येण्याचा विचार नाहीं. फर्लो संपल्या-बरोबर तिकडेच पेनशन घेणार आहेत. उमरावती येथें यांना मोठी पानसुपारी झा-ली व आकोल्यांतील येथील पुढारी मंडळींनें ही रेल्वे स्टेशनावर साहेब बाहादूर यांस फुलांचे हार व पानसुपारी देऊन खूष केलें. शिवाय येथील मि० क० मि० नौकिंग सा० हे ही आपले मेमसाहेबी जे बेक सा० यांच्या भेटी करितां मुद्दाम येथें आले होते रेल्वे स्टेशनावर त्या दिवशीं येथील सर्व युरोपियन्स बहुतेक युरेशियन्स व सं-भावित नेटिव व पारशी लोक हे साहेब ब-हादुरांच्या भेटी करितां हजर होते. व त्या दिवशीं रेल्वे स्टेशनावरी एक प्रकारची विशेष शोभाच आली होती. दुपारचे १ वाजून ३५ मिनिटांनीं प्लॅटफॉर्मावर गाडी-लागल्या बरोबर साहेब बाहादुरास गाडींतून मोठ्या सन्मानानें उतरून घेऊन त्या ठिका-णी [illegible] होती त्या ठिकाणीं आणले नंतर सर्वांच्या भेटी होऊन फुलांचे हार पानसुपारी अत्तर गुलाब व हारतुरे गजरे इत्यादि सामुग्री प्रमाणें झाल्या नंतर साहेब बहादुरांनीं सर्वांचा निरोप घेतला.

मि० मॉन्स यांस कमिशनरचे सुपिरिटेंडेंट नेमल्या बद्दल त्यांचे जागेवर ज्युडिशियल क० ऑफिसांतील १९० रुपयांचे सेकंड क्लार्क मि० मरे यांस नेमणार व त्यांचे जागीं एलिचपूर येथील डे० क० कचेरीतील सेकंड क्लार्क मि. बॉब यांस नेमणार असें समजतें.

मि० आबर्ट एम्. ए. सी. एस् हे परवा नागपुराहून येथें आले. हे बहुतेक बुलढाण्यास तूर्त डेप्युटी कमिशनरचे जागेवर जाणार असें समजतें.

मि० वामन नारायण बापट ए० क० क० मलकापुर हे दोन महिन्याचे रजेवर जाणार आहेत. मि० बापूजी वीर जी ब० खामगांव हे दोन महिन्याचे रजेवर जाणार आहेत.

येथील डिपुटी कमिशनर कचेरींतील हेडक्लार्क जागेवर मि० गॉडफ्री सेकंड क्लार्क यांस कायम करावें अशी शिफारस झाली आहे व ती बहुत करून हालचे फार किरींत मंजूर होईल.

---

## वर्तमानसार.

विलायतेतील लोकांस रशियावांचून आज दुसरें कांहींएक दिसत नाहीं असें म्हटलें असतां चालेल. प्रत्येक राज्यकारस्थानाचें मूळ शोधूं लागल्यास, त्याचा आरंभ रशियातून झाला आहे असें यांस दिसत आहे. बल्गेरियन प्रकरणांत रशिया पुढारी आहे. इजिप्तप्रकरणांत फ्रान्सच्या आंतून रशियाची फूस आहे. सुएज कालव्याच्या संबंधानें प्रश्न निघाला आहे, हा तरी जर्मनी व रशिया यांच्या अनुमोदनानें फ्रान्समधून निघाला आहे. हिंदुस्थानावर स्वारी करितां यावी यासाठीं इराणच्या दरबारांत जनरल कालबर्ग याची नेमणूक रशियाकडून झाली आहे. चीन देशाच्या उत्तरेस कोरियामध्यें गडबड रशियानें चालविली आहे. कान्स्टांटिनोपलवर चाल करून येण्याचा रशियाचा घाट आहे; याप्रमाणें आफ्रिका, यूरोप व एशिया या तिन्ही खंडांत आपल्यास हा जबर प्रतिस्पर्धी उत्पन्न झाला आहे, हा आपला पाडाव करील की काय, अशी इंग्लंडास भीति पडलेली आहे.

इंग्लंडांत जो हल्लीं पैशाचा पूर निघत आहे, तो व्यापार वाढल्यामुळें निघत आहे. इंग्लंडचा व्यापार हिंदुस्थानदेश आपल्या ताब्यांत असल्यामुळें अतिशय वाढला आहे ही गोष्टही निर्विवाद आहे; अर्थात इंग्लंडास जर आपला मोठेपणा व आपलें वजन कायम राखावयाचें असेल, तर त्यानें हिंदुस्थानांतील आपल्या राज्याचा पाया बळकट केला पाहिजे. हा पाया बळकट झाला आहे, मात्र या बळकटीस धक्का पोचावयाचा नाहीं, अशी तजवीज इंग्रजी सरकारानें केली म्हणजे पुरे आहे.

अशा प्रकारची तजवीज इंग्लिशसरकार करीत आहेत काय! इंग्लिशसरकारास रशियाची भिति जर वाटत असेल, तर त्यांनीं हिंदुस्थानांतील लोकांस परकीय अम्मल आपल्यावर चालू आहे असें मनांत आणूं देऊं नये. ब्रिटिशसरकारच्या राज्यापासून आम्हांस जरी अनेक फायदे झाले आहेत तरी दिवसें दिवस आम्ही निर्धन होत चाललों आहों, यामुळें ब्रिटिश अंमलाच्या चांगुलपणाविषयीं किंत्येकांस संशय उत्पन्न होऊं लागला आहे. इंग्लिशसरकारांनीं लोकांचा हा संशय लौकर दूर केला पाहिजे.

खरा मार्ग म्हटला म्हणजे हिंदूस्थानांतील प्रजा संकटसमयीं आपणास उपयोगीं पडेल अशी व्यवस्था करणें हा नव्हे काय! असो सरकार याचा योग्य विचार करील अशी आम्ही आशा करितों.

नवरोझ सणाबद्दल निझामानें दरबार करून किंत्येकांस बेगाव्हाले व मोठाले असे किताब दिले, त्यांत अबदुल हक्क यांसही मुल्क हा किताब दिला मुल्क पदवीच्या गृहस्थास ३५०० रुपयांची सनद असून १५०० स्वार व २५०० पायदळ इतक्या फौजेचा तो मुख्य असतो व त्यास डंका वाजविण्याचाही हक्क असतो.

ग्याझिटियर आफ इंडिया या नांवाचें जें एक गेल्या १७ वर्षांपासून नवीन खातें सुरू झालें होतें तें येत्या एप्रिलच्या १ ल्या तारखेपासून बंद होण्याचें ठरलें.

अफगाण सरहद्दीच्या संबंधानें बोलणीं करण्याचें जे कांहीं मुद्दे राहिले आहेत त्यांबद्दल बोलणें करण्याकरतां इंग्रजाचे कांहीं कामगार रशियन दरबारी जाणार आहेत.

...रशियाची रेल्वे जी मध्य एशियांत आलीकडे येत आहे ती आपल्या हद्दींत येणें हितावह होणार नाहीं असें बुखाऱ्याच्या हद्दींतील लोकांचें मत झाल्यावरून त्यांनीं ती रेल्वे पुढें येण्यास हरकत सुरू करण्याचा यत्न सुरू केला. त्यावरून रशियानें आपली फौज सज्ज करून ती चारजुईपर्यंत आणून तेथें एक छावणी स्थापन केली; नंतर बुखाऱ्याच्या लोकांची ती समजूत बदलून रशियाच्या रेल्वेस हरकत करण्याचें त्यांणीं सोडून दिलें, त्यावरून वाटलें म्हणजे रशियानें आपली चारजुई येथील फौज उठविणें अवश्य होतें, पण त्यानें तसें न करतां तेथें जी छावणी बसविली ती कायमच घातली.

यंदा सयामप्रांतांत तांदुळाचें पीक अतिशयीत आलें आहे असें सांगतात.

रशियाची रेल्वे समरकंदपर्यंत आणण्याचें ठरून त्या रेल्वेस लागणारी जमीन खालसा करण्याचा हुकूम सुटला असें विलायतची बातमी सांगते.

अफगाणीस्थानच्या वाटेवर सीबीपर्यंत व त्याच्यापुढें बोलन खिंडीतून व हर्णै खिंडीतून गुलिस्थान व किल्ला अबदुल्ला येथपर्यंत बेरटनच्या वाटेनें जे रेल्वेचे फाटे तयार झाले आहेत व होत आहेत त्या रेल्वेस सिंधपेशिन रेल्वेची वायव्य शाखा असें म्हणावें असें हिंदुस्थानसरकारानें फर्माविलें आहे.

मद्रास शहरांत पटकीचा बाधा बराच सुरू झाल्यावरून त्यास हटविण्याचे उपाय चालू आहेत.

ब्रह्मदेशांतील एक शिवाय करून सर्व संस्थानिक इंग्रजांस अनुकूळ होण्याचे ठरलें.

आजपर्यंत बेंगाल इलाखा म्हणून एक मानला जात असे तो ब्रह्मदेश खालसा झाल्यापासून त्या एकंदर इलाख्याचा एक विभाग झाला आहे असें समजतें.

इंग्रजसरकारचा पश्चिम आफ्रिकेंतील राजकीय वकील मि. जानस्टन यास तिकडच्या नेटिव लोकांनीं कैद केलें आहे असें सांगतात. ठा० अ०

मद्रास युनिव्हरसिटीनें मराठी भाषा शिकण्याची परवानगी दिली हें अभिनंदनीय होय. मराठी भाषा शिक्षणपद्धतींत गोवून दिल्यानें हैदराबाद येथील शाळांस फार सोय झाली. या पूर्वी त्या शाळांत संस्कृत भाषेचा अभ्यास करावा लागे त्यामुळें विद्यार्थ्यांची व शिक्षकांची मोठी गैरसोय होत असे ती आतां नाहींशी झाली हें चांगलें झालें.

निझाम साहेब व प्रधान मानकरी वगैरेंची आपसांत जी चुरस असे ती हल्लीं अगदीं बंद झाली आहे. परस्परांत दळणवळण चांगलें सुरू असतें परस्पराबद्दल मनेंहीं शुद्ध झालीं आहेत. या सर्व गोष्टीस तेथें नवथर गेलेले कर्नल मार्शल हे कारणीभूत झाले असें म्हणण्यांत कांहीं हरकत नाहीं. त्यांनीं थोडक्या वेळांत सर्वांचीं मनें वळून परस्परांतली चुरस मोडून काढली ही लहान सहान गोष्ट नव्हे.

गव्हर्मेंट आफ इंडियानें असा हुकुम फर्माविला आहे कीं खालच्या प्रतीच्या नोकरांनीं आपखुशीनें राजिनामा देते वेळेस असें लिहून दिलें पाहिजे कीं आम्हास आमच्या या वर्तनाचे परिणाम पूर्णपणें अवगत आहेत.

ब्रेन्हर्ड कौंटींत फ्लोरिडा मुक्कामीं एक मोठी मनेदार गोष्ट घडून आली ती अशी बेल्डन आडनांवाच्या कुटुंबांस एक तेरा वर्षांची मुलगी होती. तिची व एक भल्या मोठ्या सापाची सलगी झाली होती. त्या सापाची तिजवर इतकी भक्ति असे कीं तिनें कांहीं केलें तरी त्यास राग येऊं नये एकेदिवशीं घराजवळच ती मुलगी झाडींत सापाजवळ खेळत बसली होती. तिच्याव एका शिद्याची अवचित नजर गेली आणि तिच्या जवळ कोणी पालक नाहीं असें पाहून त्यानें तिला धरलें व गर्द झाडींत पळवून नेऊं लागला. हे चांडाळ कृत्य पाहून त्या सापांत इतका विलक्षण त्वेष चढला कीं सरकन तिच्या मिठींतून निघाला व त्याच्या मानेवर जबर चावा घेतला त्या सरसा शिद्यानें मुलीस तर सोडून दिलें, परंतु त्या सापास धरून अशा जोरानें एका झाडावर हापटलें कीं बहुतेक तो गतप्राण झाला. शिद्दी तावडतोब घेरी येऊन पडला तो मेलाच. यास म्हणावें विश्वासूपणा, नाहीं तर आहेत खाल्ले त्या घराचे वासे मोजणारे!

०ने ओ०

सिंध प्रांतांत शिथी येथील म्युनिसिपालिटीनें तेथें एक मसणवटीची नवीन जागा करून जुबिलीचें स्मरणार्थ "कुइन व्हिक्टोरिया ज्युबिली मसणवटी" हें तिला नांव दिलें.

रेल्वेअपघात झाल्यावरून निफाडचे स्टेशन मस्तरावर खटला चालणार आहे. नांदगांवचे युरोपियन स्टेशन मास्तर यांना कामावरून दुर केलें होतें. त्यांस १० रुपये पगार कमी करून कामावर रुजू होण्यास सांगितलें.

इन्डियन मिरर म्हणतें कीं, पाहिजे तर थोड्याशा युरोपियन लोकांची वस्ती येथें करून दिली तर फारशी हरकत नाहीं, परंतु युरोपियन लोकांची वसाहत या देशांत न होऊं देण्याची खटपट आपल्या अंगांत जितकी शक्ति असेल तितकी खर्च करून केली पाहिजे. हिंदुस्थानाचीच लोकसंख्या दिवसेंदिवस इतकी कांहीं वाढत चालली आहे कीं हिंदुस्थानालाच देशांतर करण्याचे आणखी पांचपन्नास वर्षांनीं भाग पडेल. तेव्हां या लोकांना आपल्या देशांत वसाहत करूं देणें ही हिंदुस्थानच्या लोकांची चूक नाहीं पण मोटा थोरला खिळा होणार आहे. पु० वै०

सदर्न मराठा रेल्वेचा गोरगांवापासून मिरजे पर्यंतचा फाटा ता. १ एप्रिल पासून चालूं व्हावयाचा होता परंतु त्याची सरकार तर्फे पाहणी झाल्यानंतर सुरू होण्याचें ठरलें.

मद्रास येथील गायन शाळेच्या शाखेनें तेथें एक हिंदु मुलीं करितां गायन शाळा स्थापन केल्याचें समजतें.

ब्रम्हदेशाच्या स्वारीचा खर्च १२१॥ लख ६१पे झाल्याचें समजतें.

सेंट पिटर्सबर्ग येथें निहिलिस्ट लोकांस कैद करण्याविषयीं मोठी धांदल होऊन गेली आहे. खिवचें कालेज बंद पडलें व कित्येक लष्करी अंमलदारांस फाशी दिल्याची वदंता आहे.

अलहाबाद येथें महामारीच्या रोगाची साथ उद्भवली आहे.

कलकत्ता येथील एक कोळीण मासे विकण्यास गेली होती तेथें तिनें आपली लहान मुलगी बरोबर नेली होती. तिच्या दुकानीं गिऱ्हाइकांची गर्दी झाल्यामुळें मुलीस एका बाजुस ठेवून तिनें मासे विकले. थोड्या वेळानें ती मुलीस पाहूं लागली तों ती कोठें आढळेना. शेवटीं तिनें ती गोष्ट पोलिसाला कळविली. तेव्हां तपासाअंतीं असें कळलें कीं एका बाईनें ती मुलगी नेऊन दुसरे एकजणीस ४ रु. स विकली. हल्लीं दोघी स्त्रियांवर खटला चालूं आहे.

प्रोफेसर थामस हालोवे यांनीं इंग्लडांत एक हाले साहेब नावानें८०,००००० रु. खर्चून विद्यालय बांधलें त्यांत पुरुषांस जाण्याची अगदीं बंदी आहे असें म्हणतात.

मद्रास येथें लेडी डफ्रीन फंडास २२,०६९ रु. वर्गणी जमली व म्हैसूर येथें ११,००० रु. जमली त्यांपैकीं म्हैसूरच्या महाराजांनीं ७५०० रु. दिले.

काश्मीरांत आगगाडीचा रस्ता तयार करण्याच्या उद्देशानें पहाणीचें काम चाललें होतें तें आटपलें.

निफाडच्या स्टेशन मास्तरच्या चुकीनें जी. आय. पी. लाइनीवर अपघात झाल्या मुळें त्याची चौकशी माजिस्त्रेट समोर होण्याचें ठरलें.

चालूं सालच्या एम. ए. च्या परीक्षेस न्याचरल सायन्स संबंधी जुनेच नियम लागूं होतील परंतु पुढील साली नवीन नियम लागूं करण्याविषयीं सरकारचा ठराव झाला.

झिंध संस्थानचा राजा अल्पवयी असल्यामुळें सरदार जनरल रतनसिंग, कालिफ रहिमबक्ष व मुनसीहरसारप यांचे रिजन्सी कौंसिल त्या संस्थानची व्यवस्था करण्यासाठीं सरकारानें नेमिलें.

मद्रास सरकारास शेतकी व खेतकी संबंधाच्या शाळांखात्याचा सन १८८५।८६ साली ५७,६९८ रु. खर्च झाला व ४७,९९३ रु. उत्पन्न झाल्याचें समजतें.

पुढील सालच्या आरंभीं कलकता येथे छाया यंत्रानें काढलेल्या तसबिरींचे प्रदर्शन होणार त्या समयीं चार सोन्याची पदकें देण्यांत येतील असें म्हणतात.

सु० प०

☞ हे पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छा० प्र० केलें.

साहत्माही " ३ " " ८८
साल अखेर " ७ " " १८८
किरकोळ अंकांस....................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु १
पुढें दर ओळीस ८१८६
दुसरे खेपेस ........८१

Per annum in arrears 7 " 1R. 8 a
Six monthly.............. 3 " 8 as
Single copy........................ 4as

Advertisements.
Below 10 lines...2
Per line over 10...4as
Repetition per line 3a

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXI AKOLA MONDAY 11 APRIL 1887 NO 14
वर्ष २१ अकोला सोमवार तारीख ११ माहे एप्रिल सन १८८७ इ० अंक १४

## वैद्यक मांत्रिकार्णव

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं आ-म्ही शके १८०९ चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून "वैद्यकमांत्रिकार्णव" या नांवाचें मासिक पुस्तक काढणार आहेंत; या पुस्तकामध्यें चरक, सुश्रुत, वाग्भट, भावप्रकाश. आयुर्वेद इत्यादि संपूर्ण वैद्यशास्त्रविषय स्वीय ग्रंथांची, व पवनकृत वैद्यशास्त्रविषयक ग्रंथांचीं, व मंत्रमहोदधि. रुद्रयामल, शारदातिलक दत्ततिलक, प्रपंचसार, तंत्रसार, बाराहीतंत्र, इंद्रजाल इयादि मंत्रशास्त्रविषयक ग्रंथांची माहिती क्रमाक्रमानें दिली जाईल हें पुस्तक रॉयल ४० पानांचें असून यामध्यें संस्कृत श्लोक मराठी अर्थासहित देऊन प्रसिद्ध केलें जाईल.

वर्षाची किंमत १ रुपये ८ आणे व टपालखर्च ६ आणे.

किरकोळ अंकास ८ आणे.

वर्गणी आल्याखेरीज पुस्तक पाठविलें जाणार नाहीं.

नारायण गोविंदराव कडलक,
ज्योति. प्रकाशकर्ते, नानाची पेठ, घोडेपिराजवळ घरनंबर २८४, पुणें.

## जाहीरात.
## उपनिषदांचा मराठी अर्थ

ऋग्वेदाच्या शाखा २१ आहेत. यजुर्वेदाच्या १०९, सामवेदाच्या १००० आणि अथर्ववेदाच्या ५० शाखा आहेत याप्रमाणें चारवेदांच्या मिळून ११८० शाखा आहेत. प्रत्येक शाखेचें एकेक उपनिषद आहे, याप्रमाणें ११८० उपनिषदें आहेत त्यांतून मुख्य मुख्य अशा १०८ उपनिषदें श्रीरामानें मारुतीस उपदेशिलीं त्यांचीं नांवें:—ईश, केन, कठ, प्रश्न, मुंड, माडुक्य, तैत्तिरीय, ऐतरेय, छांदोग्य, बृहदारण्यक, इत्यादि आहेत. त्यांतील ऋग्वेदाचीं १०, (शुक्लयजूंची १९ आणि कृष्णयजूंची ३२ अशीं) यजूंचीं ५१, सामवेदाचीं १६ आणि अथर्ववेदाचीं ३१ उपनिषदें आहेत. गौडपादाचार्य, श्रीमच्छंकराचार्य, शंकरानंद, सदाशिवब्रह्मेंद्र, स्वयंप्रकाशानंद आणि विद्यारण्याचार्य इत्यादिकांनीं पूर्वोक्त उपनिषदांवर भाष्य आणि व्याख्या केल्या आहेत.

श्रीरामानें हनुमंतास उपदेशिलेल्या १०८ उपनिषदांचें मराठी भाषांतर करणें, तें सांप्रतकाळांत फारच उपयोगी होईल, असें कित्येक मित्रांनीं सुचविल्यावरून, तसें करावें असें मी इच्छित आहें.

प्रथममूळ वाक्य लिहून नंतर त्याच शब्द आणि व्याख्या लिहून, त्यापुढें त्याचा अर्थ मराठींत लिहावा अशी योजना आहे.

हें पुस्तक सर्वांस घेण्यास सुलभ पडावें ह्मणून मासिक पुस्तक रूपानें छापणार आहों. रायल आठाचे अष्टपत्री साच्यानें पुस्तक प्रति महिन्यास निघत जाईल. चांगला आश्रय मिळेल तर दर पंधरवड्यासही काढितां येईल. प्रत्येक अंकांत १६ पृष्ठें येत जातील. १२ अंकाबद्दल आगाऊ किंमत २ रु० व मागाहून ३ रु० पडेल. हाशील आगाऊ ८६ व मागाहू ८८ पडेल.

एकशेंआठ उपनिषदांचें मराठी भाषांतराची अभिरुचि लोकांस लागून त्याचा चांगला खप झाल्यास, बाकी राहिलेल्या १०७२ उपनिषदांचा शोध करून मिळतील तितकीं याच प्रमाणें छापण्याचा उद्योग करूं.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्याच मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

पातूर
तारीख ३०-३ ८७

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस

वि० वि० — मी आपल्या पत्राच्या २१ साव्या तारखेच्या अंकांतला "फिरस्ता" या सहीचा. अकोला हायस्कुलांतील एका शिक्षकाविरुद्ध लेख वाचला, व लागलेच थोड्या दिवसानीं वैदर्भांतून सत्यानें त्याला उत्तर दिलें तेंही माझ्या नजरेखालून गेलें. आतां कोणताही पक्ष न स्वीकारतां शिक्षकावरचा ठपका उडवावयाचा हा माझाही हेतु खराच परंतु तो कितीसा सिद्धीस जाईल याचा वानवाच आहे.

माझ्यामतें, फिरस्त्यानें वर्तमान इतका गवगवा न करतां तिऱ्हाइतपणें ह्मणा अथवा कांहीं दिवस शिक्षकाशीं स्नेह संपादून ह्मणा शिक्षकाचा त्याच्या शिक्षण पद्धतीविषयीं मान उघडणी केली असती तर बरें होतें मग त्याचा जर परिणाम न होता तर पुढची पायरी चढणें रास्त होतें. शिक्षकाच्या विरुद्ध लिहिलें असतां मुलाच्या वरचा, त्याचा धाक उडतो हेंही त्याच्या लक्षांत आलें नाहीं कीं ! मुकाच तो ( सत्याच्या लेखावरून ) प्रौढ "सत्यानें" "फिरस्त्याच्या पत्रावर जे ( अप्रौढ आहे वितंगत इ. इ.) आरोप आहेत ते कांहींसे सुयुक्तिक दिसतात खरें परंतु या सत्यास ' नांव मोठें व लक्षण खोटें असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं कां कीं ह्यानें कांहींएक सिद्ध करून न दाखवितां "फिरस्त्याच्या लेखावर प्रांजळबुद्धिनें लिहिलेला नाहीं, मत्सर प्रेरित इ० इ०" वगैरे हलकट बुद्धीनें परंतु उदार हस्तानें वृथा आरोप आणिले आहेत. लेख एखाद्याच्या नर विरुद्ध आहे तर कधींत मत्सर प्रेरित असतोच. कांहीं एक सिद्ध करून न दाखवितां तो लेख असाच आहे तसाच आहे असें बरळल्यानें लोकांचा त्याजविषयीं झालेला ग्रह न जाऊन उलटा दुणावतो, ही कल्पना त्या प्रौढस सत्यास मनांत कशी आली नाहीं. पदराला खार न लावितां दुसऱ्याविषयीं पोकळ कळवळा शोभत नाहीं. ह्या "सत्याला" जर शिक्षकाचा कळवळा आला होता तर कागद व शाई खर्च घालायाचे होते. आपले बोलणें सिद्ध करून दाखवून मग फिरस्त्याच्या पत्रास पाटलोणीचा खिसा योजिला असता तर बरें होतें तर आतां या खोपेतून उठून बरळणाऱ्या ' सत्यास ' तीच जागा द्यावी अथवा दुसरी एखादी शोधावी हें निवडणें मी आतां वाचकांवरच सोपवितो.

एक
( तिऱ्हाइत )

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र वद्य ४ शके १८०९

## सन१८८७-८८साला-चा सरकारी जमा खर्चाचा खर्डा.

येत्या साला करितां जमाखर्चाचा खर्डा सर ऑकलंड कालव्हीन साहेबांनीं तयार केलेला प्रसिद्ध झाला आहे त्या वरून पहातां त्यांना शाबासकी द्यावी किंवा दोष द्यावा हें समजत नाहीं. संपत्तीच्या संबंधानें हिंदुस्थानची जी सध्यां भिकार अवस्था झाली ती वरून पहातां हल्लींच्या जमाखर्चाची स्थिति योग्य आहे असें ह्मणतां येत नाहीं. मग आमचे सरकार किंवा इतर लोक त्या संबंधानें कांहीं ह्मणोत. हल्लीं जो खर्डा तयार झाला आहे तो नेहमींच्या रिती प्रमाणें वाढलेल्या खर्चाबद्दल सांढवणूकी करितां दिलेल्या नाना प्रकारच्या सबबीनें भरला आहे गुदस्तसालची शिल्लक अवघी ९०० पौंड राहिली आहे व तीही अक्षूर नांवेच्या बाजूसच आहे. गुदस्ता आमच्या सरकारचा खर्च वाढण्यास मुख्य दोन कारणें झाली. एक ब्रह्म देशाची लढाई व दुसरें सोन्या रुप्याच्या भावाची चढाई. ब्रह्मदेशा संबंधानें खर्च सरकारानें उगाच आपला हेका करून आपल्यावर घेतला. पण त्यांत सरकारचें काय गेलें. तो दिला हिंदुस्थानच्या जमाखर्चांतूनच. या प्रमाणें अवाढव्य वाढलेल्या खर्चाची भरपाई करण्या करितां सरकारला कांहीं नवीन कर बसवावें लागलें. त्यांतच सध्यांचा इनकमट्याक्स होय. या करापसून सरकारला अजमास ७६०००० पौंड उत्पन्न झालें. या शिवाय खर्च कमी करण्या करितां प्रती वर्षीं दुःष्काळ खर्च व रेल्वे वगैरेना सरकाराकडून जो पैसा मिळत असे त्यांतील बंद करावा लागला. याप्रमाणें कशी तरी गडबड करून गुदस्तावें साल सरकारनें पार पाडलें. आतां यंदाच्या साला करितां जो खर्डा झाला आहे त्यांत उत्पन्न अजमासानें ७,७४,६०,२०० पौंड धरलें आहे व खर्च ७,७४,४३,९०० पौंड धरला आहे. ह्मणजे सुमारें १६७०० पौंड शिल्लक रहावी असा अजमास आहे. याप्रमाणें खर्डा तयार करितांना सरकारनें वसुलाच्या व खर्चाच्या संबंधानें गुदस्त साला प्रमाणेंच बाबी तयार केल्या आहेत. या शिवाय वसुलांत निरनिराळ्या स्थानिक सरकारांपासून येणारा वसूल यंदा वाढविला आहे. सोन्या रुप्याच्या भावानें जो तोटा सा झाला आहे (सुमारें १६२५०००० पौंड ) तो नागपूर बंगाल रेल्वेचें भांडवल स्टेट सेक्रेटरीकडे भरलें गेलें ह्मणजे व यंदा कांहीं नवीन रेल्वे सुरू झाल्यास त्याच्या ही भांडवलानें भरून येईल असा अजमास आहे आतां निरनिराळ्या स्थानिक सरकारांवर जें खर्चाचें अधिक ओझें लादण्याचा सरकारचा विचार आहे तो आह्माला अगदीं पसंत नाहीं. निरनिराळे इलाखे व प्रांत प्रांत निरनिराळ्या बाबीपासून जें उत्पन्न होते ते त्या सरकारांजवळ स्थानिक कामाकारितां राहिले पाहिजे त्याप्रमाणें लार्ड लिटन साहेबाच्या वेळेंत उत्पन्न झालेले "फॅमीन इनशूरन्सफंड" ह्मणजे दुष्काळाची तरतूद करण्याकरितां जमविलेलें भांडवल त्यांपैकीं पुष्कळ भाग त्यावां सरकार आपल्या कामाकारितां खर्च करितें हें हीं योग्य नाहीं. या भांडवल संबंधानें तर सरकारनें मुख्य उद्देश दूर फेकून देऊन त्याचा समूळ अपहार करण्याचें आरंभिलें आहे. १८७७ सालीं जेव्हां मोठा दुष्काळ झाला तेव्हां लिटन साहेबांनीं व्यापारी वगैरे लोकांवर हल्लींच्या इन्कम टॅक्स प्रमाणेंच लायसेन्स टॅक्स ह्मणून एक कर बसविला व त्याच्या उत्पन्नांत हे फंड करून त्याचा व्यय कालवे, पाट, तळीं, रेल्वे, सडका वगैरे दुःष्काळ निवारक साधनें तयार करण्याकडे करावा असें ठरलें. परंतु ते सर्व एकीकडे राहून हल्लीं सरकारनें या फंडावर बराच हात मारण्याचें धरिलें आहे. याप्रमाणें खर्चाच्या प्रसिद्ध झालेल्या सारांतील मुख्य

मुख्य गोष्टींचा विचार झाला. यांतील मुद्यांचा सविस्तर विचार सवडीनुसार करूं

मनुष्यानें जगांत येऊन चार लोकां-च्या तोंडांतून आपलें नांव निघेल अशी काहीं तरी कीर्ति करून जावें असें आमचे वाडवडील आम्हांस सांगत आले आहेत. त्याप्रमाणें जोतो आपल्या शक्तिप्रमाणें आ-पलें नांव राहण्या सारखें काहीं तरी कर-ण्याचा प्रयत्न करीत असतो. परंतु ज्याचें नांव सर्व तो मुखीं जग प्रसिद्ध होतें असे लोक फारच थिरळा झटले पाहिजेत. व त्यांना ईश्वरी अवतारच झटले तरी चा-लेल. युरोपांत साक्रेटीस, आरिस्टॉटल गॅ.लिलियो, शेक्सपियर, मिल्टन, वॉट बेकन, कॉट, व आमच्या देशांत शंकराचार्य, व्यास वाल्मिकी, कालिदास, वगैरे असे पुरुष हो ऊन गेले आहेत. हल्लीं आमच्या देशांत चांगले विद्वान लोक पुष्कळ आहेत परंतु ज्यांचें नांव हिंदुस्थानांत ही सर्वांस माहीत असेल किंवा नाहीं याचा आम्हांला संशय वाटतो. आणि ज्यांची नुकतीच प्रतिद्धीस आलेली रखमाबाई पहा; तिच्या नांवाचा डंका सर्व हिंदुस्थानांत गाजून शेवटीं इंग्लं डांत ही जाऊन पोंहचला. एवढेंच नाहीं तिच्या संबंधानें पार्लमेंटांत प्रश्न ही निघा-ला; शाबास रखमाबाई तूं धन्य झालीस खरी, बिचारी आनंदीबाई नांव मिळवि-ण्यासाठीं स्वदेश सोडून अमेरिकेस गेली व शेवटीं अमोल्य प्राणास ही मुकली ते-व्हां कोठें तिचें नांव जिकडे तिकडे प्रसि-द्ध झालें. आणि तूं मुंबईतल्या मुंबईत ब-सूनच आपलें नांव सर्व लोकांच्या तोंडांतून वाटवीत आहेस तेव्हां तुझें भाग्य कुठवर सांगावें! साहेब फारन यांनीं रखमाबाई विरुद्ध निकाल सांगितल्या दिवसा पासून आमच्या हिंदुस्थानांतील इंग्रज वर्तमान पत्रकर्ते या निकाला विरुद्ध ओरड करीत आहेत. पण चमत्कार पहा कीं हा विषय इंग्लंडांत ही जाऊन तिकडील टाइम्स सें-टजेम्स गॅझेट वगैरे वर्तमानपत्रांनीं ही त्या वर लांब लांब लेख लिहिले आहेत या ले-खांत आमच्या जुन्या धर्म शास्त्रावर आणि सामाजिक रितिभातीवर अयोग्यतेचे आणि क्रूरतेचे दोषारोप या शिवाय दुसरें काहीं मिळणार नाहीं हें सांगणें नकोच. या सं-बंधानें आतां जास्ती लिहिण्याचें काहीं ना-हीं. शेट मलबारी यांनीं लिहिलेल्या टि पणावर सर्व देशांतून सरकारांनीं जी मतें मिळविली आहेत व त्याचें एकत्र बांधलेलें पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे तें या वर्तमान पत्रकर्त्यांनीं वांचून पहावें. म्हणजे आमच्या सामाजिक रितीभाती संबंधानें आमच्या लोकांचें बहुमत किंवा बहुत क-रून एक मतच कां म्हणाना. काय आहे हें त्यांना कळून येईल. आमच्या सामाजि-क रितीभातींत सुधारणा आम्हां मधूनच खुशीनें हळूं हळूं झाली पाहिजे. ती दरून जर सरकार आम्हावर कादूं लागले तर सरकारचा हेतु सिद्धीस जाणार नाहीं या विषयीं सरकारची खात्री ही झाली आहे. असें असतां हे लोक उगीच खुळ्या सार खी बडबड करितात याचा अर्थ काय!

याच संबंधानें मुंबईत एक मंडळी स्था-पन झाली तिच्यांत तेथील काहीं बडे यु-रोपियन गृहस्थ व बाबा असून आमच्यां-तील तेलंग सारखी जाडी मंडळीही आहे या मंडळीचें अध्यक्षत्व एल्फिन्स्टन कॉले-जचे प्रिन्सिपाल वर्ड्सवर्थ यांनीं पत्करि-लें आहे. या मंडळीच्या मतें हा ठराव अगदीं चुकीचा आहे व ठराव करितांना हिंदु धर्मशास्त्र आणि इंग्रजी कायदे यांचा जो संकर केला आहे तो करूं देऊं नये हें या मंडळीचें काम आहे. रखमा बाईला पुढें मदत करण्या करितां मंडळीनें वर्गणी-ची यादीही काढिली आहे. शाबास.

कौंटेस आफ् डफरिन फंडाच्या वऱ्हाड च्या शाखेच्या रिपोर्टा वरून कळतें कीं सन १८८६ साल अखेर सुमारें २० ह-जार रुपयाची रकम वऱ्हाडांतील निरनि-राळ्या गांवाहून वसूल झाली. काहीं गृह-स्थांनी प्रत्येकी मिळून १०० रुपये वर्गणी दिली या मुळे ते या फंडाचे "लाईफ मेंबर्स झाले आहेत. हा फंड जमा करण्या-चे कामीं व्यवस्थापक मंडळींनीं जसा उ-त्साह दाखविला तसाच त्याचा विनियोग करण्याचे कामीं ही दाखवितील असें आ-म्ही इच्छितों. नागपूर येथें दायाचा धंदा शिकण्यास जाण्या करितां परवानगी व स्टेपेन्ड मिळण्या विषयीं काहीं उमेद वा-रांचे अर्ज कमिटी पुढें असल्याचें कळतें परंतु या बाबतींत अद्याप काहीं निकाल नाहीं.

रा. रा. गणेश बाबजी सहस्रबुद्धे यां-ची नेमणूक वऱ्हाडांत ए. अ. क. चे जा-गीं झाल्याचा सर्वांस संतोष वाटेल. रेसि-डेन्सी आफिसांतून कित्येक वेळा गैर हुषार व विश्वास न ठेवण्याजोग्या गृहस्थांच्या अशा जागीं नेमणुका झाल्या मुळें हकदील हकदारांस फार अन्याय होत असल्याचें आह्मी मागें अनेक वेळां लिहिलें आहे परंतु ही नेमणूक तशा प्रकारची मुळींच नाहीं. रा. रा. सहस्र बुद्धे हे मुंबई युनिव्हर्सिटीचे ग्र्याजुएट असून आ-पल्या कामांत फार हुशार व चाकरगार आहेत. ज्या ज्या सेक्रेटरींच्या हाता खा-लीं यांनीं काम केलें त्यांना हे कामाच्या योग्यतेनें फार प्रियझाले होते आम्हांस खा-त्री वाटते कीं ते वऱ्हाडांत आल्यावर लोकांस यांजपासून फार फायदा होईल.

रशियन लोकांनीं इंग्रजसरकारच्या हि-शोन आणि खोनक यांचे दरम्यान अस-लेला किल्ला ताब्यांत घेण्यासाठीं चढाव करून १०० लोकांची कत्तल उडविली. आजपर्यंत बकध्यान करून अखेरीस सुर वात केली वाटते.

# The Berar Samachar

MONDAY APRIL 11 1887

The Report for the year 1886 of the Branch Committee of the Countess of Dufferin's Fund in Berar is not uninteresting. Till about the end of the year nearly twenty thousand rupees have been subscribed from the various towns in the six districts. Not a few have become 'Life Members' by payment of 500 Rs. each and it is hoped by the interesting Secretary of the interesting movement that many more 'candidates for the distinction' must have become subscribers to the fund by the date of the report Mr. Purshotam Rao Bhat whose descriptions never lack interest has perhaps embodied in the above phraseology the motives of the subscribers to the Fund as Life-Members. There is no doubt that many have subscribed to the Fund because the officials have identified themselves with the movement. Monies have not been paid simply because people have been particularly impressed with the distinct advantages of the movement; and the amounts collected would represent in most cases the influence actual or indirect which has been used for gathering the funds. Berar is not a poor province and it is no wonder if a large fund is gathered up by the end of the current year. There are chances of this fund being abused and perverted from its original objects if the same zeal and circumspection is not shown in spending as in collecting it. A good many applications are we learn lying before the Committee for being allowed to join the midwifery class at Nagpur and they are not disposed of. If true, this is not encouraging to intending students and we hope the Committee might do something to remove the evil.

We notice with pleasure the appointment of Mr. Ganesh Babji Sahasrabudhe B. A. to the post of Extra Assistant Commissioner in Berar. We have often referred to the injustice caused to candidates for those posts among the officials in Berar by the appointment of persons of doubtful qualifications from out of the Residency, but we have nothing to say in the present case as the merits of the gentleman now appointed have been recognized by the successive secretaries for Berar and the present appointment is but due to him as an encouragement to him for his past services as clerk in the Berar office. From his antecedents the public may be sure of having secured a person competent for the post he is put to.

In connection with the appointments of purely native clerks in English offices to higher posts in the administrative or Judicial branches of the service, we have often been struck with the injustice of the rules which fetter their promotions to higher posts, and of the practice generally observed of not promoting them even in the offices to the higher clerical appointments. These latter are as it were reserved for Eurasians who enjoy the cream of the clerical service and the drudgery of the office is the lot of the native assistants. The appointments to clerkships require no particular qualifications and this leaves room for favoritism and jobbery. We have more than once alluded to the evils of the system and suggested an Examination or some such satisfactory test for making appointments to vacant clerkships. The present system is a crying evil and must be done away with. A notable instance has occurred here in which a clerk qualified beyond doubt for promotion has been kept back. If the clerical service deteriorates, it will be no wonder. We hope the attention of the authorities might be directed to this source of ill-feeling and to the injustice caused to clerks under the present system.

## FROM HYDERABAD RESIDENCY ORDERS, APRIL 1 1887.

Under Section 9 of the Rules regulating legal practitioners in the Court of the Resident at Hyderabad and in all Courts subordinate to it, notice is hereby given that the next examination of candidates for the office of Pleader will be held at Amraoti in the Judicial Commissioner's Court-house, commencing at 11 A. M. on Wednesday the 7th September 1887.

Persons desirous of being examined should submit their applications to the Judicial Commissioner, Hyderabad Assigned Districts, together with the certificates and fee required by section 10, on or before the 1st June 1887.

Under Notification of the Government of India, Foreign Department, No. 156 dated the 30th September 1870, the Resident is pleased to declare that the Court presided over by Mr. C. H. Price, Extra Assistant Commissioner in the Hyderabad Assigned Districts, shall be of the fourth grade having jurisdiction up to Rs. 1,000.

Uner Section 12, Act X of 1882, the Resident is pleased to appoint Mr. C. H. Price Extra, Assistant Commissioner in the Amraoti District, to be a Magistrate of the 2nd class in that district with power to pass sentences of whipping under Section 32 of the same Act.

Under Section 37, Act X of 1882, the Resident is pleased to invest Mr. Waman Narayen Bapat, Extra Assistant Commissioner and Magistrate of the 1st Class in the Buldana District with the following additional powers, namely:—

A (9). Power to take cognizance o offences upon information (Section 191.)
B (12). Power to sell property alleged or suspected to have been stolen, &c. (Section 524).

As a case of discipline, 2nd Class Hospital Assistant Enoch Shadrach, in charge of the Hospital at Chikalda, Ellichpur District, is reduced to the 3rd Grade and posted to the Civil Hospital, Amraoti.

"Lieutenant Eyre Houston, R. E., is permanently appointed to the Department as an Assistant Engineer 2nd Grade, and posted to Hyderabad."

Hospital Assistant Pooransingh is transferred from Amraoti to the permanent medical charge of the Chikalda Hospital.

Mr. Waman Narayen Bapat, Extra Assistant Commissioner, Malkapoor, Buldana District, in the Hyderabad Assigned Districts, has been granted privilege leave for two months with effect from the 15th April 1887 or from such date as he may avail himself of it.

Mr. A. F. Higgins, Executive Engineer 2nd Grade, is, on return from privilege leave, placed under the orders of the Superintending Engineer for the purpose of drawing up the projects for the water-supply of the towns of Shegaon and of Akola in the Akola District

We give below the news of Sir

T. Madhorao in reference to politics and social Reforms. They are embodied in an eloquent address he made at the annual convocation of the University of Madrass. We commend them to the perusal of every thinking man who takes interest in welfare of his country and people.

"India is the scene of the confluence of two mighty civilisations. You will find a great deal that is old and also a great deal that is new. You are not to accept either indiscriminately or exclusively. Exercise your judgment in choosing. In regard to scientific knowledge, the modern must be given preference. We dive to the bottom of the sea. We pierce to the bowels of the earth. We rise to far off ethereal solitudes, where new worlds seem to be in process of creation or consolidation. In regard to virtues, many old ones which have been our inheritance for ages are excellent, and ought to be retained, such as gentleness, good-will, self--restraint, fidelity and gratitude to benefactors, politeness, patience, charity, general benevolence, respect and submission to constituted authority, love of peace and order--happily a long list of which we may well be proud. At the same time, some modern virtues may also be adopted, such as courage, candour, independence, perseverance, punctuality, public spirit, &c. Similarly, a proportion of our manners, customs and habits deserve to be cherished; for instance, the simplicity of our lives, our sobriety, our domestic affections our cheerful support of needy or helpless relatives or dependents. Had time permitted, I should have referred to some of our fine arts and to a great deal in the domain of aesthetics, which deserves respect, reverence, and admiration.

(To be continued.)

## वऱ्हाड.

गुणोत्तेजक संगीतें कंपनीची मंडळी नागपूराहून येत्या आठवड्यांत येथें येऊन नाटकें करणार आहेत

कमेटीचे कंदील वगैरे लागत नाहीं-त. तर ते बेलेवर लागतील अशी व्यवस्था कमेटीच्या अधिकाऱ्या कडून व्हावी.

सन १८८७ ची वऱ्हाडांतील वकीलीची परीक्षा उमरावती येथें मेहरबान ज्युडिशियल कमिशनर साहेब यांचे कचेरींत बुधवार तारीख ७ माहे सेप्टेंबर सन १८८७ इसवी रोजीं दुपारी ११ वाजतां सुरू होईल. परिक्षेस येणाऱ्या उमेदवारांनीं, फी व सर्टिफिकिटें यां सुद्धां आपले अर्ज मेहेरबान ज्युडिशियल कमिशनर साहेब यांजकडेस, तारीख १ माहे जून सन १८८७ इसवी रोजीं अथवा या तारखेच्या अगोदर, पाठविले पाहिजेत.

१८७० सालचे सप्टेंबर ३० तारखेच्या रेसिडेन्सी ऑर्डर मधील नं० १९६च्या नोटिफिकेशन वरून मे० प्रास साहेब ए० अ० क० यांना बच्च्या लोकांचे सिविलजज नेमून १००० रु० पर्यंत अधिकार दिला आहे व त्याचप्रमाणें १८८१ चा आक्ट नंबर १० कलम १२ अन्वये त्यास सेकंड क्लास माजिस्ट्रेटचा अधिकार दिला आहे व कलम ३१ प्रमाणें फटके मारण्याचाही अधिकार दिला आहे.

मे० वामन नारायण बापट ए० अ० क० आणि फ० क्लास म्याजिस्ट्रेट जिल्हा बुलडाणा यांनां १८८२ च्या आक्ट १० च्या १० व्या कलमां प्रमाणें ९ (९) (कलम १९१) व बी (१२) (कलम ६२४) यातील अधिकार दिले आहेत.

मे० वामन नारायण बापट ए० अ० क० मलकापूर जि० बुलढाणा, यांनी तारीख १९ एप्रिल पासुन अगर ते घेतील त्या दिवसा पासून दोन महिन्यांची हक्काची रजा मिळाली आहे.

एलिचपूर जिल्ह्यातील चिखलदरा येथील से० क्ला० हास्पिटल असिस्टंट यांनां कमी करून उमरावती सिव्हिल हास्पिटल वर थर्ड ग्रेड हास्पिटल असिस्टंट नेमिलें.

हॉस्पिटल असिस्टंट पुरनसिंग यांची उमरावतीहून बदली करून चिखल दऱ्याच्या हॉस्पिटलवर कायम नेमिलें.

मे० आयर हाउस्टन यांनां हैद्राबाद येथें से० ग्रेड असिस्टंट एंजिनियरच्या जागेवर कायम नेमिलें.

मे. करनल फिटजरल्ड साहेब सेकंड क्लास डिपुटी कमिशनर यांना घरीं जाण्या करितां एकवर्षाची फरलो रजा मिळाली व त्या प्रमाणें साहेब बहादूर यवत माळाहून निघून काल प्रात:काळीं आकोल्यास आले आहेत. कांहीं खासगी कामाकरितां येथें त्यांचे एक दोन मुक्काम आहेत.

मे. डाक्टर नंदी अनररी अ० क० वऱ्हाड यांना निजाम सरकारांनीं आपले नोकरींत घेतल्यामुळें ते शनवारी प्रात:काळीं हैद्राबादकडे उमरावतीहून रवाना झाले गुरुवारीं सायंकाळीं उमरावती येथील नेटिव्ह क्लबची त्यांना पानसुपारी झाली. समयास करनल बुकन साहेब व निजामउद्दीन साहेब होते.

रा. रा. गणेश बाबजी सहस्त्रबुद्धे नवीन नेमलेले ए. अ. क. यांची यवतमाळ येथें नेमणूक झाल्यामुळें ते शनवारीं रात्रीं उमरावतीहून तिकडेस गेले.

मे. क्यापटन् मॉरिस कानटोन्मेंट माजिस्ट्रेट, सागर, यांची वरार कमिशनांत अ. क. चे ग्रेडमध्यें नेमणूक झाली व त्यांस खामगांवचें कार्टावर अध्यक्ष नेमले आहे.

सर सालरजंग निजाम सरकारचे दिवाण प्रकृतीच्या दुरस्तीसाठीं महाबळेश्वरी पुढच्या आठवड्यांत जाणार.

निजाम सरकारांनीं आपले दप्तरची भाषा आजवर पर्शियन होती ती उर्दू चालू करण्याचा ठराव करून हुकूम सोडला.

नोटीस.

नोटीस बनाम मारुती वल्द खंडुजी रंगारी कस्बे नांदुरें तालुके मलकापूर यांस:—

खालीं सही करणार इजकडून कळविण्यांत येतें कीं, राधाबाई नवरे मारुती रंगारी सराग कसबे नांदुरें तालुके मलकापूर जिल्हे बुलढाणें सुरू सन १२९६ फसली कारणें तुम्हास पूर्वीं नोटीस दिली असतां त्या नोटीसी वरून तुमचे मनाची शांती झाली नाहीं, या करितां पुन: नोटीस करणें भाग आले. तुमचें आमचें लग्न पंच व जाती संबंधानें होऊन त्यास सुमारें वर्षें सात झालीं आहेत त्यांत मी अज्ञान अवस्थेंत असून तुमचे घरी रिती प्रमाणें राहून त्यांत तुम्हां माझा अपराध किंवा कांहीं रोग किंवा शरिरानें नेदुरुस्त किंवा अनेक प्रकारचें रोग माझे अंगीं नसतां मी माझे धर्मानें तुमचे येथें कायदेशीर राहून तुम्ही मजला माझे आई बापाचें घरीं पाठवून मजला टाकले आहे. असो. याबद्दल माझें म्हणणें कांहीं नाहीं परंतु आपण माझ्या संसाराचा कांहींच एक निवाडा न पाहतां एकदम दुसरें कुंटुंब करण्यास इच्छा करितां तर हें धर्म शास्त्राला लागूं नसून तुम्ही गैर कायदेशीर का करितां परंतु हें बरें नाहीं तर करितां आपल्यास पुढें अशी उमेद असली तर आपले आई बापांनीं आमचा गळा फसवावयाचा नव्हता परंतु तुम्ही दुसरें लग्न करण्याचें मजला प्रसिद्ध करितां तर असें घडणार नाहीं कारण माझे आईबापांनीं आपले पुरुषार्थावर आपले पदरीं बांधून माझें संसाराची गैर विल्हे करितां हें बरोबर नाहीं दुसरें माझा निकाल झाल्या वांचुन आपण दुसऱ्या ठिकाणीं लग्न कराल तर तुमचा आमचा लग्नाचा संबंध रहाणार नाहीं. या करितां आपणास नोटीस कायदेशीर केली आहे. या नोटीशीची मुदत नोटीस पावल्या पासून ८ दिवसांचे आंत तुम्ही आपल्या आई बापास पाठवून मजला घरीं घेऊन जावें असा माझ्या मनाचा पूर्ण हेतू आहे. जरे करितां माझे मना प्रमाणें आपण न कराल तर दोष यावती समजली जाईल, तुमचा आमचा लग्नाचा कांहीं संबंध रहाणार नाहीं हें पक्कें समजावें व माझ्या पोटगीचा खर्च रुपये १२६ दोन वर्षांचे व या नोटीसीचे खर्चा सुद्धां अखेर निकाल होईपर्यंत सर्व भरून घेऊं. कळावें ता० ७ माहे एप्रिल सन १८८७ इसवी.

(सही) राधाबाई नवरे मारुती
रंगारी सराग कसबे नांदुरें
निशानी खुद्द बांगडी,

## वर्तमानसार.

अद्वितीय घड्याळ! प्यारिसमध्यें नुकतेंच एक नवीन घड्याळ तयार करण्यांत आलें आहे. हें घड्याळ म्हणजे, कालमापनाचीं जगामध्यें जीं कांहीं यंत्रें किंवा साधनें आहेत त्या सर्वांमध्यें एक अपूर्व व अद्वितीय कालमापकयंत्र आहे. तें ३॥ मीटर (एक स्थलमापक परिमाण आहे) उंच असून पाऊण मीटर रुंद आहे. या घड्याळांत सेकंड, मिनिटें, पावतास, तास, दिवस, आठवडे, महिने, चार ऋतु, वर्षें की पर्वें, अशी इ० स० ९९,९९९ वर्षांच्या अखेर दिवसाच्या अखेर तास पर्यंत समजण्याची व्यवस्था केली आहे! याशिवाय त्या घड्याळावर पूर्व व पश्चिम अशा उभय गोलार्धांतील सर्व अक्षांशरेखांवर अमुक वेळेस किती वाजले व कोणती वेळ आहे हें समजतें त्याचप्रमाणें, कोणत्या तिथीस किती चंद्र आहे आणि इतर पंचांगसंबधीं लागणाऱ्या किरकोळ माहित्या या घड्याळावरून बिनचूक समजतात या घड्याळांत केवळ कालादिमापनचमत्कार समजतात एवढेंच नाहीं; तर, त्यामध्यें आणखीही मोठे आश्चर्यकारक देखावे दिसण्याची रचना केली आहे. मनुष्याचें आयुष्य, ख्रिस्ती राष्ट्राचें मत, एक जुना मुर्तिपूजक आणि जुन्या जर्मन लोकांच्या भाषा, अशा रीतीच्या चार मुर्ति त्या घड्याळांत ठेवल्या असून, त्या मुर्तिचे आश्चर्य वाटण्या सारखें काम चालू असतें या घड्याळांतील प्रत्येक मिनिटाचा एकेक टोला वसतो व तो टोला निरनिराळे साठ पुरुष एकामागून एक पुढें येऊन मारून जातात! या घड्याळांतच एक मृत्यूचा पुतळा (हाडांचा सांगाडा) करून ठेविला आहे. घड्याळाच्या दुसऱ्या खणांत ख्रिस्तीशास्त्रांतील १२ भावविवादी (अपॉस्तल,) शेक्सपीयरनें सांगितलेल्या मनुष्याच्या सात अवस्था, चार ऋतुपरुष, राशिचक्रांतील बाराही राशी, आणि अशाच प्रकारची दुसरी माहिती पहाणाराला आश्चर्य वाटण्यासारखी मूर्तिमंत दिली आहे. रात्रीच्या वेळीं या घड्याळामध्यें एक पहारेकरी पुरुष झटकर पुढें येऊन प्रत्येक तासाच्या अंतीं एक शिंग फुंकून जातो व तास संपला असें कळवतो. सूर्योदयाचे वेळेस एक कोंबडा पुढें येऊन कुकडू असें ओरडून जातो, आणि सूर्योदयाची वेळ झाली म्हणून कळवितो. या घड्याळांत एक कोकिळ येऊन कुहू करून जातो. पण तो वर्षांतून एकच वेळ व तो. हा वसंतर्तूच्या आरंभाचे तारखेला येऊन त्या ऋत्वागमनाची सूचना करून जातो या वर्से व्यावहारिक माहितीशिवाय धर्मपुस्तकांतील कांहीं देखावे दिसतात. ख्रिस्ती शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें ७ दिवसांत पृथ्वीची घडण कसकशी झाली ती, आणि क्रॉस ख्रिस्ति पदक व त्यावरील १४ मुख्य स्थानें, वगैरे दाखविलीं असून तेथें काय काय चाललें तो सर्व व्यापार तेथें दिसतो. दिवसांतल्या एका नियमित तासाला भजनालयांतला एक अधिकारी येऊन प्रार्थनेची घांट वाजवितो आणि गुडघे टेंकून, व हात जोडून प्रार्थना करतो आहे असें दाखवितो. आणि इतक्या सर्व क्रियानिरनराळ्या रीतीनें, सलंद व व्यवस्थितपणें चालूनही त्याशिवाय या घड्याळांत उत्तम प्रकारचीं वाद्यें वाजुन मनुष्याचे मीवाला मोठी करमणूक होते! अशा प्रकारचें घड्याळ म्हणजे मानवी बुद्धिमत्तेचा आणि कल्पनाशक्तीचा कमालीचा परिपाक या १९ व्या शतकांत आपल्या अवलोकनांत येत आहे असें म्हणावें लागतें युरोपियनांच्या कौशल्याची व कल्पनेची धाव कशी चालली आहे व ते काय काय चमत्कार करून दाखवितात ते पाहून आम्ही आश्चर्यानें तोंडांत बोटच घालावें! ज्ञा० प्र०

— फ्रान्स व जर्मनी.—मो. आनटोइन, जर्मन रीचस्टागचे मेंबरशिपकरितां सभासद यांस जर्मनसरकारानें अलसास मधून हांकून लाविलें. यावरून लढाई लवकरच होईल असा अदमास होता.

— मुलगा जसजसा अधिक परिक्षा पास होत जातो तसतसा त्यास सासऱ्यानें अधिक हुंडा द्यावा लागतो असा बंगाल्याकडे प्रघात पडत चालल्याचें समजतें.

— आयर्लंडचे चीफ सेक्रेटरींनीं तेथें अपराध करणाऱ्या लोकांस शासन करण्या बद्दलचें बिल प्रथम गेल्या सोमवारीं वाचलें. त्यांत तेथलि माजिस्त्रेटास तोंडीं चौकशी करण्याचा अधिकार द्यावा व मोठा अपराध करणारांची चौकशी ऐरलंडांत न होतां इंग्लंडांत व्हावी असा आशय होता. यावर मि. पार्नेल हे आयर्लंडच्या स्थितीची चौकशी करण्याकारितां हाऊस आफ कामन्सच्या कमिटीनें चौकशी करावी म्हणून भाषण करणार होते ते त्यांनीं तूर्त तहकूब केलें. परंतु मि. डिलन यांनीं हें बिल पास झालें तर आपण प्रमुखत्व स्वीकारून पास हरकत करूं असें मोठ्या त्वेषानें भाषण केलें.

— अफगाणीस्थानच्या आमिरानें दुराणी लोकांची नवीन पलटण तयार करण्याचा केलेला प्रयत्न फसला. व गिलझी लोकांचा पुनः जमाव होत असल्याचें समजतें.

— गेल्यासालीं पंजाब युनिव्हरसिटीच्या परिक्षांचे प्रश्न फुटल्यामुळें यंदा तसें न होण्याविषयीं विशेष काळजी घेतली होती, तथापि कित्येक प्रश्न बाहेर फुटल्यामुळें त्या परिक्षा पुन्हां घेतल्या जातील असें सिव्हिल व मिलटरी ग्याझेटवरून समजतें.

— मद्रासच्या गव्हरनर साहेबांनीं गेल्या सोमवारीं टेकनिकल एजुकेशनच्या संबंधानें पुढें लिहिल्याप्रमाणें भाषण केलें. इलाख्यांतील प्रत्येक मनुष्यानें विद्वान होणें अशक्य होय व जरी मुलांस जितकी विद्या येईल तितकी चांगलीच तरी कीं मुलें विद्या शिकून पुढें कारकुनाच्या किंवा अंमलदारीच्या नोकऱ्या करतात त्याप्रमाणें व्यवहारांत कित्येक उपयुक्त उद्योग धंदे आहेत कीं ते शिकल्यानें मुलांस आपापल्या तारुण्यांत तसाच फायदा होतो. यास्तव ज्याप्रमाणें राजकारणी पुरुष व अधिकारी वगैरे तयार करणें महत्वाचें आहे तसेंच उद्योग धंदे शिकविणें हें आपलें कर्तव्य होय.

— बंगाल्यांत लहान मुलांस मद्य विकण्याची बंदी झाल्याचें समजतें.

— बेडाइक येथें पोलिसचे रात्रीं गस्तीस फिरणारे शिपायास मुजलायटर नीं धरून नेल्याचें समजतें.

— मि. ग्लाडस्टन यांनीं आयर्लंडांतील अपराध्यास शासन करण्या विषयींच्या बिलासंबंधानें असें भाषण केलें कीं हें बिल पास झाल्यास आयर्लंडांत शांतता न होतां अस्वस्थता मात्र अधिक वाढेल व तेथील अपराध्यांची चौकशी इंग्लंडांत करणें म्हणजे ऐरिश लोकांचा उपमर्द करणें होय.

— इंग्रज सरकारच्या लष्करांत २०१९ अंमलदार असल्याचें समजतें.

— नाव्हामध्यें मि. डिकसन नांवाचा एक इंजिनियर वानराच्या दंशानें मेल्याचें समजतें.

— स्पेनमध्यें राजक्रांती करण्याच्या उद्देशानें एक कट झाला होता तो उघडकीस येऊन पुष्कळ लोक कैद करण्यांत आले.

— मध्य हिंदुस्थानांत ग्वालेर व इंदूर संस्थानच्या दरम्यान अजून वरेच दरवडे पडतात असें समजतें.

— बंगाल्यांत भवानीपूर व आसपासच्या प्रदेशांत महामारीचा उपद्रव भयंकर रीतीचा उद्भवला असून पुष्कळ लोक मरत आहेत असें समजतें.

— रेशमाच्या व्यापारासंबंधानें सर्व चौकशीचें काम हिंदुस्थान सरकारनें बंगाल सरकाराकडे सोपविलें.

सर. सालरजंग हे अतिशय आजारी असल्यामुळें डाक्टरच्या सुचनेवरून सिलोन पर्यंत जलपर्यटन करण्यास जाणार आहेत तोंपर्यंत त्याचे कनिष्ठ बंधु काम पाहणार असें म्हणतात.

— जुबिलीच्या उत्साह निमित्त ज्या लोकांनीं घरें अत्यंत शोभिवंत केली होतीं त्यांचीं नांवें सरकारानें विचारली आहेत असें डकनहेरल्डवरून समजतें.

खानदेशचे असिस्टंट कलेक्टर यांस वाघानें जखमी केल्यामुळें ते दुसरे दिवशीं वारले असें समजतें.

— गेल्या सालच्या तिसऱ्या तिमाहित हिंदुस्थानांत १६१ $\frac{1}{2}$ नवीन आगगाडीचा रस्ता तयार झाल्याचें समजतें.

सु० प०

डायरेक्टर आफ पब्लिक इंस्ट्रक्शनचे जागेवर सनदी नोकरांची नेमणूक होत असे. आतां हिंदुस्थान सरकारचा विचार निराळा असल्याचें समजतें. त्यांनीं आपला असा अभिप्राय दिला आहे, कीं त्या जागेवर शाळाखात्यांतील अनुभवशीर लोकांस नेमीत जावें. स्थानिक सरकारास असें कळविलें आहे, कीं अशा प्रकारचे जागेवर ज्या मनुष्याची नेमणूक व्हावयाची त्यास शाळा खात्याचें तपासणीचें वगैरे सर्व काम माहीत असलें पाहिजे. आणखी त्यांनीं असें ठरविलें आहे, कीं एखादे स्थानिक सरकारचे पदरी असा मनुष्य मिळण्याजोगा नसेल तर शाळाखात्याखेरीज दुसरे खात्यांतील मनुष्याची नेमणूक करण्यापूर्वी दुसरे इलाख्यांतून शाळाखात्यांतील इसम मिळविण्याची तजवीज करावी. हिंदुस्थानसरकारचा हा विचार फारच स्तुत्य आहे असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं, शाळाखात्यांतील नांवाजलेल्या व अनुभवशीर लोकांस हे एक प्रकारचें उत्तेजन मिळाल्यासारखें आहे.

सन १८८७।८८ सालाचें जमाखर्चाचें टिपण प्रसिद्ध झालें. सन १८८५-८६ सालीं ७४४६४१९७ पौंड जमा असून ७७२६९९२३ पौंड खर्च झाला. १८८६ ८७ सालीं ७६०७६७०० पौंड जमा होऊन ७६०७१२०० पौंड खर्च झाला. ह्या सालचे जमेचा अदमास ७७४६०२०० असून ७७४४३५०० पौंड खर्चाचा अदमास टाकिलेला आहे. ह्मणजे सरासरी १६७०० बाकी आहे. सैन्य वाढविले कारणानें ३२४९८४ पौंड जास्त खर्च दाखल केलेला आहे. ह्या दोनतीन सालचे आकड्यांवरून जितकी जमा तितका खर्च असें झालेलें आहे. ह्या सालचे जमेची रकम वरीच वाढलेली आहे, परंतु खर्चाचेंही मान जास्त झालेलें आहे. ह्या सर्व हकीकतीवरून लोकांवर बसलेला इनकम टॅक्स कायम राहून तो आतां कमी होण्याची आशा विशेष धरतां येत नाहीं. या सालीं वाच खर्च कमी झाला, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. परंतु खर्चाचें मान वाढविल्या शिवाय दुसरा इलाज नसल्यामुळें ती रकम खर्चाचे भरतीस पडली. मिळून जो दिवस येतो तो गेल्या दिवसास बरा ह्मणतो.

ह०

निजाम सरकारानें हैदराबाद येथें स्थापन केलेल्या वैद्यकीय शाळेत शिकणाऱ्या सहा विद्यार्थ्यांनीस १० रुपये प्रमाणें दरमहा स्कालरशिपा देण्याचें ठरलें आहे.

भयंकर कुटुंबघात—दक्षिण रशियांत येलिसाबेट्ग्रड नांवाच्या एका गांवीं एक मोठा श्रीमान् गृहस्थ राहत होता. त्याचे जवळ राज सचाविनायक मंडळींतले दोघे दंगेखोर तरुण लोक चाकरीस राहिले होते. वरील गृहस्थाजवळ आठलक्ष रुबल रोखहोते. ते उपटण्याकरितां त्या घातकी नोकरांनीं त्या गृहस्थास त्याचे बायकोस व त्याच्या आठ मुलांस आणि त्याचे इतर आप्त स्त्रियांस ठार मारून नंतर ती सर्व मिळकत लांबविली. पुढें ते ओडेसा बंदरांत जाऊन तेथून टर्कीला जाण्याकारितां निघणार होते तों त्यांस पकडलें. कोण हें घोर कर्म !

न्या० सिं०

सदर्न मराठा रेल्वेची गाडी आज पावेतों दिवसा एकवेळच सुटत होती. आतां रात्रीची आणखीं एक गाडी सुरू झाली आहे. सकाळची गाडी पुण्याहून ८ वाजून ५ मिनिटांनीं निघून २ वाजून ५० मिनिटांनीं सातारारोड स्टेशनवर येईल. व रात्रीची पुण्याहून ११ वाजून ५ मिनिटांनीं निघून पहांटे ६ वाजून ४५ मिनिटांनीं सातारारोड स्टेशनवर पोंचेल. तसेंच सातारा रोड स्टेशनाहून दुपारीं १२ वाजून ४० मिनिटांनीं गाडी निघून संध्याकाळीं ७ वाजून ५ मिनिटांनीं पुण्यास जाईल. व रात्रीं सातारा रोड स्टेशनाहून ९ वाजून ३५ मिनिटांनीं निघून पहांटे ४ वाजतां पुण्यास पोंचेल. या प्रमाणें येणाऱ्या जाणाऱ्या दोन्ही गाड्यांच्या वेळा आहेत.

विचित्रसृष्टि—कलकत्यास एक ११ वर्षांचा मुलगा आला आहे. त्याचें डोकें, मान, व छाती इतर मनुष्यां सारखी आहे. पण पायांचे तळवे उलटे असून त्यांस घोटे नाहींत. कासवाच्या मागल्या पाया प्रमाणें त्याच्या मुख्यशरीरांतून दोन पाय निघून गुडघ्याच्या ठिकाणीं आले आहेत व त्यांस आठ आठ बोटें आहेत असें ईस्ट पत्रास एक बातमीदार कळवितो.

ता० १२ एप्रिल पासून मुंबई सरकार महाबळेश्वरास येणार.

पृथ्वीच्या पोटांतील उष्णतेचा उपयोग अमेरिकेंतील युनायटेड स्टेट्स संस्थानांतील फ्लोरिडा प्रांतांत सेंट आगस्टिन शहरांत १२ इंच व्यासाची एक कारंज्यांची विहीर खोदण्यांत येणार आहे. ही जेथ पर्यंत घर उपयोगी गरमपाणी लागेल तेथपर्यंत खोल खणण्यांत येईल. सुमारे ६०० फूट खोलीवर गरम पाणी लागेल असें अनुमान आहे. अशा रीतीनें हंगारी प्रांतांत पृथ्वीच्या पोटांतील गरम पाणी काढून त्याचा घरकामास उपयोग करीत असतात सर्व पृथ्वीतील भागा पेक्षां येथील कारंज्याच्या विहिरी फार खोल खणण्यांत येतात आणि तें गरमपाणी मोठ मोठ्या हमाम खान्यां कडे (स्नान गृहांकडे) व इतर कामांकडे दिलें जातें. या विहिरींतून १९८ अंश उष्णतेचें पाणी १,७०००० ग्यालन दररोज काढण्यांत येतें फ्रान्सांत १८०२ फूट खोलीची एक विहीर आहे. तींतून रोज ५ लक्ष ग्यालन ऊनपाणी काढतात.

सु०सू०

खंबायतचे दिवाण मि० शामराव लाडयांच्या फिर्यादीवरून खेडा येथील कलेक्टर मि० वुइल्लसन यांची चौकशी होऊन त्यांत ते दोषी ठरले हें वाचकांस कळलेंच आहे. हल्लीं असें कळतें कीं खेडा जिल्ह्यांतील सुमारें २००० लोकांनीं मि० वुईल्सन यांच्या तर्फेनें सरकारास नुकताच एक अर्ज केला असून त्यांत मि० वुईल्सन यांस आपण पुष्कळ दिवसांपासून ओळखतों, व ते न्यायी निःपक्षपाती आणि चांगल्या मनाचे कामगार असल्याबदल आपल्यांस अनुभव आहे असें ह्मटलें आहे. मि० वुइल्सन यांच्या खासगी वर्तणुकीच्या संबंधानें हे अर्जदार असें ह्मणतात कीं, त्यांच्यांवर मि० शामराव यांनीं जो आरोप आणला आहे तशा प्रकारची त्यांची वर्तणूक असल्याचें आपण पूर्वी कधींही ऐकिलें नाहीं. अशा मोठ्या आणि योग्य कामगारा वर आणलेल्या आरोपाची कमिशनानें ज्या रीतीनें चौकशी करावयास पाहिजे त्या रीतीनें केली नाहीं; आणि अखेर त्याच्या रिपोर्टाप्रमाणें सरकारचा ठराव झाला; हा अन्याय झाला. सरकारनें या प्रकरणाची चौकशी कामिशन मार्फत उघड रीतीनें न करितां जर गुप्त रीतीनें केली असती, किंवा इंग्लंडांत आणि जूरी यांच्याकडून ही चौकशी झाली असती किंवा निदान उइलसनप्रमाणें शामरावाचीही चौकशी होईपर्यंत सस्पेंड केलें असतें तर हल्लींसारखा परिणाम कदाचित झाली नसतां असें अर्जदारांचें ह्मणणें आहे आणि त्यांनीं शेवटीं सरकारास अशी विनंती केली आहे कीं, सरकारानें आपल्या ठरावाचा फिरून चांगला विचार करावा व मि. उइलसन यांच्यावर आणलेल्या आरोपाच्या खरेपणाबद्दल जो जबरदस्त संशय आहे त्याचा फायदा मि. उइल्सन यांस द्यावा. सदहू अर्जाचा प्रकार पाहून फार आश्चर्य वाटतें. कमिशनपुढें उघड चौकशी त लेखी व तोंडीं पुराव्यानें ज्या गोष्टी शाबीद झाल्या, त्या तशा नाहींत ह्मणून इतरांनीं आतां प्रतिपादन करणें हें काय यत्न म आहे समजत नाहीं.

क०

☞ हें पत्र आकोला येथें के० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छा० प्र० केलें.

चाहत्यारी " ३ " " ८८
हाव अखेर " ७ " " १८८
किरकोळ अंकास......................८४

नोटिशी बदल
१० ओळीचे आंत रु १
पुढें दर ओळीस ८।८६
दुसरे खेपेस ........८१

Per annum in arrears 7 " 13.8 a
Six monthly............ 3 " 8 as
Single copy............................ 6as

Advertisements:
Below 10 lines...2
Per line over 10...4a
Repetition per line 3a

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXI AKOLA MONDAY 18 APRIL 1887 NO 15

वर्ष २१ अकोला सोमवार तारीख १८ माहे एप्रिल सन १८८७ इ० अक १५

## जाहिरात

अकोट म्युनीसिपाल कमेटी कडून सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं हल्लीं अकोड येथील दवाखाना ज्या इमारतींत आहे तीं इमारत सभोंवतालच्या कांपौंडासह व आंतील नोकर लोकांचे घरासुद्धां हरास करण्याचा ठराव झाला आहे यास्तव ज्यांस सी विकत घेण्याची इच्छा असेल त्यांनीं ता० ३० माहे एप्रिल सन १८८७ इ० रोजीं शनवारी सायंकाळीं चार वाजतां म्युनीसिपल आफिसांत यावें. विशेष माहिती पाहिजे असल्यास तेथें मिळेल.

अकोट
ता० १४-४-८७

Ganesh Bapuji.
व्हाइस प्रेसिडेंट.
अकोट म्यु०

## जाहीरात.

## उपनिषदांचा मराठी अर्थ

ऋग्वेदाच्या शाखा २१ आहेत. यजुर्वेदाच्या १०९, सामवेदाच्या १००० आणि अथर्ववेदाच्या ५० शाखा आहेत याप्रमाणें चारवेदांच्या मिळून ११८० शाखा आहेत. प्रत्येक शाखेचें एकेक उपनिषद आहे, याप्रमाणें ११८० उपनिषदें आहेत त्यांतून मुख्य मुख्य अशा १०८ उपनिषदें श्रीरामानें मारुतीस उपदेशिलीं यांचीं नावें:—ईश, केन, कठ, प्रश्न, मुंड, मांडुक्य, तैतिरीय, ऐतरेय, छांदोग्य, बृहदारण्यक, इत्यादि आहेत. त्यांतील ऋग्वेदाचीं १०, (शुक्लयजूंची १९ आणि कृष्णयजूंची ३२ अशीं) यजूंचीं ५१, सामवेदाचीं १६ आणि अथर्ववेदाचीं ३१ उपनिषदें आहेत. गौडपादाचार्य, श्रीमच्छंकराचार्य, शंकरानंद, सदाशिवब्रह्मेंद्र, स्वयंप्रकाशानंद आणि विद्यारण्याचार्य इत्यादिकांनीं पूर्वोक्त उपनिषदांवर भाष्य आणि व्याख्या केल्या आहेत.

श्रीरामानें हनुमंतास उपदेशिलेल्या १०८ उपनिषदांचें मराठी भाषांतर करावें, ते सांप्रतकाळास फारच उपयोगीं होईल असें कित्येक मित्रांनीं सुचविल्यावरून, तसें करावें असें मी इच्छित आहें.

प्रथममूळ वाक्य लिहून नंतर याचे भाष्य आणि व्याख्या लिहून, त्यापुढें त्याचा अर्थ मराठींत लिहावा अशी योजना आहे.

हें पुस्तक सर्वांस घेण्यास सुलभ पडावें म्हणून मासिक पुस्तक रूपानें छापणार आहों. रायल जातीचे अष्टपत्री सांचाचें पुस्तक प्रति महिन्यास निघत जाईल. चांगला आश्रय मिळेल तर दर पंध्रवड्यासही काढितां येईल. प्रत्येक अंकांत १६ पृष्टे येत ... रु. १२ अंकाबदल आगाऊ किंमत २ रु० व मागाहून ३ रु० पडेल. हांशील आगाऊ ८६ व मागाहू ८८ पडेल.

एकशेंआठ उपनिषदांचें मराठी भाषांतराची अभिरुचि लोकांस लागून त्याचा चांगला खप झाल्यास, बाकी राहिलेल्या १०७२ उपनिषदांचा शोध करून मिळती ल तितकीं याच प्रमाणें छापण्याचा उद्योग करूं.

### नोटीशीचें उत्तर.

सोनी मर्द दरबाऱ्या महारीण वस्ती पिंपरी तालुके खामगांव जिल्हा आकोलें इजला नोटीस देणार दरबाऱ्या वल्द रामजी महार रहाणार मौजे नागझिरी तालुके खामगांव जिल्हा आकोलें. या नोटीशीनें असें कळवितों कीं, तूं दिलेली तारीख ४ माहे एप्रिल सन १८८७ ची नोटीस पावली सर्व मजकूर समजला. या नोटीशीचे उत्तर लिहिलें प्रमाणें:—

१ मी पुरुषांत आहे. अशा बदलचें सरटीफिकीट योग्य डाक्टरचें पुरुषांत मी आहे म्हणून मजपाशीं मिळविलें आहे.

२ एक वर्षाची खावटी रुपये ४८ आम्ही नोटीशी प्रमाणें देण्यास तयार आहों. परंतु आम्ही ह्या सदरील खावटी च्या सालांत चार वेळा तुजला माझेकडे आणण्या करितां मुद्दाम बोलावणीं पाठविली असून आज बरोबर टांळगाई करून तूं आली नाहींस म्हणून खावटी मिळत नाहीं आमची बोलावणी आली नव्हती असें शाबीत करावें म्हणजे खावटीचे रुपये ४८ मिळतील.

३ आतां ही नोटीस पावल्या दिवसा पासून १० दिवसाचे आंत तूं आमचें घरीं यावेस आणि जन चाली प्रमाणें घर संसार करावा. असें न केल्यास लग्ना बदल खर्च झालेले रुपये ५०० व या नोटीशीचा खर्च व या कामाचा अखेर निकाल होई पर्यंत जें नुकसान होईल तें सर्व भरून घेतलें जाईल. म्हणून नोटीसदिली सही तारीख ११ माहे एप्रिल सन १८८७ इसवी.

( सही ) दरबाऱ्या वल्द रामजी महार रहाणार नागझरी निशानी खुद.

### नोटीस.

राजश्रीं मांबुजी वल्द उकरडाजी पाटील राहणार नांगद तालुके बाळापूर जिल्हा आकोलें यास नोटीस देणार परशराम गोवरधनदास दुकान नागद तालुके बाळापूर नोटीशीनें असें कळवितों कीं, तुमचेकडे आमचें खाते बाकीचे रुपये येणें त्याज बदल तुम्ही आपल्या खास्याचें शेत व हिस्सा असें मिळून खातें बाकी मध्यें गहाण करून देण्याचें ठरले. व हा ठराव मारुति वल्द टिकाराम पाटील व शिवराम पाटील नागदकर यांच्या समक्ष सदरील बाकी बदल गहाणवट देण्याचे ठरलें असून आज पावेतों तुम्ही गहाण करून दिलें नाहीं. व बाकीचा ही निकाल केला नाहीं. याज करितां नोटीशीनें असे कळवितों कीं नोटीस पावल्या दिवसा पासून ८ दिवसाचे आंत ठरलें प्रमाणें गहाण करून द्यावें. नाहीं तर बाकी एकंदर पुज्य करावी. असें न केले तर रीतप्रिमाणें कोर्टांत दावा चालवून अखेर निकाल होई पर्यंत जो खर्च होईल तो घेतला जाईल. म्हणून दिली नोटीस सही तारीख ११ माहे एप्रिल सन १८८७ इसवी.

( सही ) परशराम गोवरधन दास दुकान नागद दस्तुर गोवरधन दास.

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र वद्य ११ शके ८०९

## जगन्नाथाचें देवस्थान व ब्रिटिश सरकारचे अधिकारी.

आमच्या वाचकांपैकीं बहुतेकांस माहीत असेल कीं जगन्नाथचें देवस्थान हिंदुस्थानचें पूर्वेस कटक जिल्ह्यांत आहे. हें देवस्थान फार पुरातन काला पासून सर्व प्रसिद्ध आहे आणि प्रतिवर्षीं तीन लाख पर्यंत यात्रेकरू हीं या देवाचें दर्शनास जात असतात. या देवस्थान संबंधानें नुकतेंच युरोपियन अधिकाऱ्यांनीं अविचाराचें केलेलें कृत्याबदल हकीकत कलकत्याचें एका पत्रांत वाचून आह्मास सखेद आश्चर्य वाटतें. ती माहिती आम्ही आपलें वाचकांस थोडक्यांत कळवितो.

हें जगन्नाथाचें देवस्थान अति पुरातन काला पासून खरदाचे राज्याचे ताब्यांत आहे व सर्व प्रकारच्या संबंधाची व्यवस्था ही तेच करीत आले असे समजतें. कोणत्याही प्रकारची चौकशी न करितां व हिंदुस्थानांतील देवस्थानांशीं ज्या प्रकारचा संबंध ब्रिटिश सरकारचा असावा म्हणून ठरले आहे त्याचे अगदीं विरुद्ध अशा रीतीनें कटक येथील कलेक्टर आणि जज्ज साहेबांनीं हल्लींची खरद्याची महाराणी हिचे ताब्यांतून देवस्थान हिसकावून घेऊन दोन तिऱ्हाईत इसमाच्या ताब्यांत दिलें. कलेक्टरनीं या कामांत हात घालण्यास त्यास अधिकार असल्याची मोठी शंका आहे. असें असून त्यांनीं जज्ज कोर्टांत दावा आणून सरकारी खर्चानें महाराणीच्या विरुद्ध फैसल मिळविला. या सर्व कृत्यास बंगालचे लेफ्टनेंट गव्हरनर सर रिव्हर्स थॉमसन याची परवानगी असलीच पाहिजे असें त्या पत्रावरून समजतें.

आतां असें करण्यास कलेक्टर साहेबांस कांहीं योग्य कारण तरी दिसलें काय? याज विषयीं विचार करितां तसें कांहीं नाहीं. असें ही समजतें हल्लींच्या महाराणीनें देवस्थानाचा कारभार फार उत्तम रीतीनें व फायदा न करून घेतां स्वतःस झीज लावून घेऊन चालविला असतां ही कलेक्टर साहेबांनीं अशा रीतीचा अन्याय कां केला याचें मोठें नवल वाटतें आमच्या लोकांच्या धर्म संबंधांत विना कारण ढवळाढवळ करून लोकांचीं मनें दुःखीत होतील अशा रीतीनें युरोपियन अधिकाऱ्यांनीं वर्तन करणें फार धोक्याचे आहे. हें सांगणे नको. आज पर्यंत इतर संबंधांत ढंढेलीचे प्रकार होतच आहेत. परंतु अशा प्रकारचें वर्तन करण्यास ब्रिटिश सरकारचें अधिकारी धजत नव्हते ते ही बिनधडक करण्याचें सुरूं केलें आहे. हे सरकारचे व आमचें दुरभाग्य समजले पाहिंजे आह्मांस त्यांनीं जिंकलेले म्हणून आमच्या राज्याची व्यवस्था ते पहातच आहेत परंतु हळूं हळूं आमच्या देवस्थानाच्या कारभारांत ही निरधास्तपणें हात घालूं लागले आहेत व अशा सबईस सरकारांनीं धक्का दि... नाहीं तर कालवशांत आमच्या खासगी व्यवस्थेंत ही सरकारचे कामगार हात घालतील असें सहज वाटतें असें झाल्या पासून काय परिणाम होतील हे आमच्या विषारी सरकारास स्पष्टपणें सांगणें नको. आतां सुख मानण्यास जागा एवढीच कीं, कटकचे जज्य साहेबांनीं केलेला ठराव हाय कोर्टानीं रद्द केला परंतु अशा प्रकारचें धोक्याचें वर्तन करणाऱ्या अधिकाऱ्यास योग्य शासन झाले नाहींतर पुन्हा असे प्रकार घडणार नाहींत अशा विषयीं कांहीं लोकांचीं मनें शांत करण्या लायक अभिवचन सरकाराकडून मिळत नाहीं. याकडे सरकारानें लक्ष्य पुरवावें अशी आह्मी शिफारस करितो.

## आमच्या राज्यप्रकर्णी व सार्वजनिक मंडळया.

(१३ व्या अंकावरून पुढें चालूं.)

गेल्या अंकांत आमच्या सार्व जनिक मंडळांच्या अंगीं आणणारें वर्तन क्रम

ऐक्यभाव व उद्देशाधारणता हे दोन दोष रा गिलेले. आतां हें ऐक्य आणि हा आशाधारणता अंगीं आणण्याकरितां प्रथम आमच्या मंडळ्यांच्या अंगीं जे कांहीं व्यक्तिदोष आहेत ते दूर झाले पाहिजेत. हे दोष दूर झाल्याशिवाय देशांतील इतर समाजांशीं ऐक्य करूं म्हटलें तर त्यापासून इष्ट हेतू पूर्णपणें साध्य होणार नाहींत. कोणत्याही समाजाच्या मनांत एखादी गोष्ट करावी आल्यास ती गोष्ट सिद्धीस नेण्याकरितां त्या समाजांतील सर्व व्यक्तींचें नुसतें ऐक्य झालें पाहिजे इतकेंच नाहीं; तर त्या सर्व व्यक्तींपैकीं प्रत्येकानें इच्छिलेला हेतु शेवटास नेण्याकरितां अगदीं मनोभावानें व उत्साहानें परिश्रम केले पाहिजेत. समाजाचें किंवा त्याच प्रकारच्या कोणत्याही सार्वजनिक मंडळाचें काम म्हटलें म्हणजे केवळ स्वतश्चलनशक्तिविशिष्ट अशा यंत्रासारखें नाहीं. अशा यंत्राला प्रथम एकदां गति दिली म्हणजे त्याचें काम आपल्यांस पाहिजे तितकावेळ आपोआप चालत असतें. पुनः पुनः त्याला चालून द्यावें लागत नाहीं. मंडळ्यांचें या प्रमाणें नाहीं. वर सांगितलेल्या यंत्राप्रमाणें एखाद्या कामाला सुरवात करण्यासाठीं यांनाही प्रथम गति द्यावी लागतें खरी; परंतु ही गति दिल्यानंतरही तीच गति आपला हेतु सिद्धीस जाईपर्यंत कायम रहावी या करितां, वाफेच्या यंत्राला जसा कमी अधिक वाफेचा पुरवठा करावा लागतो त्या प्रमाणेंच आपल्या मेहनतीचा व आश्रयाचा पुरवठा करावा लागतो. हा पुरवठा जर झाला नाहीं तर प्रथम एकदां दिलेली गति कमीकमी होत जाऊन शेवटीं अगदीं बंद होते व सर्व यंत्र अगदीं चकनाचूर शून्य होऊन जातें. याकरितां आमच्या लोकांनीं प्रथम ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं नुसत्या मंडळ्या स्थापन करून त्याकडून प्रथम कांहीं दिवस देशहितासंबंधानें कांहीं काम करविण्यास आरंभ केला म्हणजे त्यांचें कर्तव्य कर्म संपलें असें नाहीं. तें कार्य आपल्या इच्छे प्रमाणें शेवटास जाईपर्यंत जी मेहनत करणें किंवा त्या समाजाला जो आश्रय देणें जरूर आहे तो दिला पाहिजे. हल्लीं आपल्या देशांत ज्या नवीन नवीन मंडळ्या स्थापन होत आहेत त्यांत बहुधा असा प्रकार आढळून येतो कीं मंडळी जोंपर्यंत नवीन आहे तों पर्यंत कांहीं दिवस तींतील पुढारी व इतर लोक अंगमोडून काम केल्या सारखें दाखवितात तिच्या पासून लोकांना जेणें करून हीत होईल अशीं कार्यें करण्यास झटतात ही. परंतु ही मेहनत व हा उत्साह फार दिवस टिकत नाहीं ही च मोठी दुःखाची गोष्ट आहे. याचा परिणाम काय होतो हें सांगणें नकोच. थोड्याच दिवसांत त्या मंडळीच्या अंगची शक्ति कमी कमी होत जाऊन तिचें शरीर अगदीं शुष्क आणि निर्जिव होतें व शेवटीं कधीं कधीं प्राणोत्क्रमण ही होतें. अशीं उदाहरणें आमच्या डोळ्या देखत शेंकडों झालीं आहेत व हल्लीं होतही आहेत. तेव्हा आमच्या लोकांच्या मनांत आपल्या मंडळ्या स्थापण्या पासून खरोखरच देशा चें हीत [illegible] ें असेल तर [illegible]हीं-

दोष जो ठिकठिकाणीं आढळून येतो तो दूर करावा. एखादी मंडळी स्थापन करून नंतर तिच्या संबंधाच्या सर्व कामांत अंग मोडून व मनापासून मेहनत न करितां केवळ दुसऱ्यावर हवाला देऊन थंडा बसून राहणें हें मंडळी मुळींच स्थापन न करण्या पेक्षा वाईट आहे. मंडळी मुळींच नसल्या तर इतर देशस्थ लोक आपल्याला स्वातंत्र्याभिरुचिशून्य किंवा निर्बळ इतकेंच म्हणतील, परंतु मंडळी स्थापन करून त्यांचा उदय आणि क्षय आपल्या हातून जर बरोबरच होऊं लागला किंवा त्यांचें पोषण योग्य वेळीं न झाल्या कारणानें त्या शक्तिहीन होत चालल्या तर तेच लोक "तुम्ही आरंभ शूर, तुमच्या अंगांत हिम्मत नाहीं, दीर्घप्रयत्न नाहीं व पाणी नाहीं. तुम्हांला कोणतेंही काम उत्साहानें व मेहनतीनें करितां येत नाहीं" इत्यादि दोष आपल्या माथ्यावर घालतील एवढ्या साठीं आपल्या अंगात या प्रमाणें अंग मोडून मेहनत करण्याची हिम्मत नसेल त्यांनें अशा मंडळीच्या भानगडीतच पडूंनये हें बरें असें आम्हांला वाटतें. आणखी किंत्येक ठिकाणीं असें आढळून येतें कीं समाजांस देशहिता संबंधानें एखाद्या कामाचा विचार चालला असतां मंडळीचा आपसांत मतभेद होऊन हातांत घेतलेलें काम एकिकडेच रहातें. आपआपला पक्ष सिद्ध करून दाखविण्याकरितां मंडळीचें आपसांतच वाग्युद्ध सुरूं होतें. हें वाग्युद्ध कधींकधीं तर इतक्या निकरावर जातें कीं हातांत घेतलेलें काम बाजूसच राहून सार्वजनिक गोष्टी व्यक्तीवर येतात व असें होतां होतां शेवटीं परस्पर वैमनस्य वाढत जाऊन त्या मंडळीचाही क्षय होण्याची पाळी येते. ही गोष्ट अगोदर टाळली पाहिजे. वाकशक्ति मनुष्याच्या अंगीं असतें हें मोठें भूषण आहे खरें. परंतु त्या शक्ती पासून इतरांना हितकारक अशा गोष्टी जर होतील तर तिची खरी योग्यता. सभेंत उभे राहून नुसतें भड भड भड बोलत सुटले तर त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. वाकशक्तीपासून फायदे होण्याचा जितका संभव आहे त्या पेक्षां तोटे होण्याचा संभव अशा ठिकाणीं विशेष आहे. याकरितां तिचा अंगीकार करून जें करणें तें विचारानें केलें पाहिजे. सारांश हिंदुस्थानच्या लोकांना सार्वजनिक मंडळ्यापासून हीत व्हावें असें जर वाटत असेल तर त्या मंडळ्यांतील प्रत्येक व्यक्तीनें जें जें सार्वजनिकहिताचें काम निघेल तें तें पार पाडण्याकरितां अंग मेहनत करून उत्साहानें व मनापासून परिश्रम केले पाहिजेत. अंगीं असलेला अपमतलबपणा सोडिला पाहिजे. आपल्या इतर बंधूंचें हीत तेंच आपलें असा मनाचा समज प्रथम केला पाहिजे व प्रसंग विशेषीं स्वसुख निरभिलाष बुद्धीनें स्वतःच्या पदराला ही खार लागण्याचा प्रसंग आला तर तो सोसला पाहिजे. अशा रीतीनें प्रत्येक मंडळीतील व्यक्ती जर वागूं लागल्या तर त्यामंडळीपासून लोकांचें हीत झाल्यावांचून कधीं रहाणार नाहीं.

( पुढें चालूं. )

आमच्या तारीख ४ रोजच्या अंकांतील "आमच्या राजप्रकरणीं व सार्वजनिक मंडळ्या" या विषया वरील निबंधा संबंधानें तारीख ९ च्या वैदर्भांत एक पत्र प्रसिद्ध झालें आहे. या पत्रांत लेखकानें आमच्या वर विसंगतेचें व असभ्यतेचें आरोप आणिले आहेत. पत्र कर्त्याच्या मनांत आम्हा वर ही या विषयावर कांहीं लिहावयाचें आहे या करितां त्याचें सर्व म्हणणें पुरें झालें म्हणजे त्याला आमच्या संबंधानें काय म्हणावयाचें तें आम्ही म्हणूं. तोंपर्यंत इतकेंच सांगून ठेवितों कीं त्या पत्राच्या लेखकाचा आमच्या लेखा संबंधानें अगदीं गैर समज झालेला दिसतो. आमच्या लेखाचा खरा रोख त्याला मुळींच दिसून आला नाहीं. आपले लोक, आपल्या मंडळ्या व आपले सरकार यांना केवळ दोष द्यावा असा आमचा मुळींच उद्देश नव्हता व नाहीं. आमचें काम फक्त उपदेश करावयाचें आहे. ही गोष्ट या गृहस्थानें लक्ष्यांत आणिली असती तर त्याचा असा गैर समज झाला नसता. असो. सध्यां जास्त लिहिण्याचें कांहीं कारण नाहीं. आम्ही म्हणतो याचीं सविस्तर कारणें योग्य वेळीं कळतीलच.

---

तालुका बोर्डाच्या नियमाचा मसुदा एकदाचा बाहेर आला. आलीशान रेसिडेंटसाहेबांनीं या मसुद्याची एक एक प्रत सर्वत्र प्रसिद्ध केली आहे. या नियमांचा शेवटला निकाल तारिख १ मे ला होणार व या नियमासंबंधानें ज्यांना ज्यांना कांहीं दोष दाखविण्याचे असतील अगर सूचना करावयाच्या असतील त्यांनीं त्या तारीख १ मे च्या आंत रेसिडेन्ट साहेबांकडे पाठवून द्याव्या असा हुकूम फर्मावला आहे. या गोष्टी संबंधानें सर्वच मोठें चमत्कारिक दिसतें आहे. एकतर हे नियम केव्हांच लागूं व्हावयाचे ते आजपर्यंत कुजत पडून एकदाचे बाहेर आले. बरें बाहेर आले ते तरी येथें वेळेवर यावेत. तारीख १ एप्रिल रोजी नियम रेसिडेन्सी आरडरच्या सप्लीमेंटांत प्रसिद्ध होतात व आम्हाला मिळतात १९ वीला. याला काय म्हणावें. बरें इतके उशीरानें येऊन त्यांचा विचार करण्याला अवकाश तरी. छे. तोही नाहीं. तारीख १ ला म्हणे त्यांचा अखेरचा निकाल होणार. आतां या १९ दिवसांत लोकांनीं त्यावर विचार करावा काय आणि सूचना करण्या काय. आमच्या सरकारला एवढी घाई कां पडली आहे समजत नाहीं. इतके दिवस कुजत पडलेले होते तसेच आणखी महिनाभर कां पडेना. आम्हाला वाटतें आलीशान साहेबांनीं या गोष्टीचा विचार करून ही मुदत थोडीशी वाढवावी म्हणजे बरें पडेल. असो. या नियमा संबंधानें आमचे विचार आम्ही पुढील अंकीं देऊं.

---

# The Berar Samachar

MONDAY APRIL 18 1887

## FINANCIAL CONDITION OF THE AMRAOTI MUNICIPALITY AND THE TOLL-TAX.

A sub-committee has been appointed to consider and suggest some means by which the revenue of the Municipality would be brought up to the level of the financial needs that are growing every year. The question of finance is always a very important one to corporate bodies as to individuals, and it is but meet that the subject of income and expenditure should be deliberately considered by a body like the Amraoti Municipal Committee.

It may be asked what particular reason there was just as this moment for the Amraoti Municipality to consider about its finances; why was no question of this kind ever raised before. There is a reason which must always exist in a place like Amraoti where increased commercial prosperity requires increased convenience or in other words increased expense. In a town of nearly 30,000 souls a scheme of drainage is a necessity beyond doubt, roads have to be improved and enlarged; water pipes already laid have necessarily entailed an additional burden on the Municipal revenues. All this means increased expenditure and to meet this increase a reduction in the present heads of expenditure or additional taxation are the only alternatives. The estimated income for the current year is in round numbers Rs 41000 and the estimated expenditure Rs. 59000; thus leaving a clear deficit of 18000 rupees. The Municipality holds at its credit in the Bank of Bombay Rs. 16000 and odd; so that the utmost it could afford to spend during the current year would be 41000 plus 16000 or nearly 57000 Rs. Thus even if the whole balance in hand is spent there would still be a lack of 2000 and more. This is a dangerous condition of finances and it was very wise of the Committee to appoint a Sub-Committee of their body to consider the subject in a comprehensive spirit The look out, however, into this state of financial depression, has been the result, it is wonderful to say, only of an accident? There was a large item of 7400 on the income side of the budget, which was expected from the toll-tax; by an incautious and almost reckless stroke of policy the Committee abolished this tax without making any the least provision against the failure to be caused on account of the abolition of the tax and this it was that opened the eyes of the Municipality to the true condition of their finances. The abolition proved so far beneficial to the Committee that it brought before the Committee their income and expenditure and set them a-thinking about it in right earnest.

Much is now known regarding the causes that led to the abolition of the tax. The grounds on which the abolition was recommended or pressed was rather peculiar. It was said the toll was very like a transit tax and as such was against the spirit of the standing orders of the Government of India against the levy of such taxes. The argument has all the speciousness of such objections; but a little reflection will discover the frivolity of the argument about the tax being a transit tax. In the first place the toll tax has been standing for so many years, has been so meekly born and so little felt that those who attempt to impeach its existence on the grounds of its injustice mus[illegible]ke out a very

[illegible]

clear case indeed in favour of its abolition. Apart from this consideration however does the tax really act as a transit tax when it is charged on carts passing over Municipal roads at Amraoti to places beyond. It is admitted that the cotton Market cess and the grain market cess on carts that unload in Amraoti is *not* a transit tax but is taken for a certain amount of convenience which the cart men receive in the town; and the question is about the carts merely passing over the municipal roads on their way to places beyond Amraoti. Now does the tax act as a transit duty on these latter carts and is it so unjust as it is shewn to be? The principle of free trade is that trade should not be hampered by unnecessary taxes on goods while they are in transit; so that they may not form a charge on the goods and make them dearer. Has any body ever found that the toll-tax does really impede trade and makes goods dearer by so much? or in other words would the goods be cheaper by so much if the tax were not levied from the carts merely passing over the Municipal roads? No body ever thought of it. The villagers pay it from their pocket and do not as a matter of fact make it a charge on their goods. And again do not these carts, heavily laden as they are, furrow the roads and make constant repairs necessary. If, as cannot be denied, they pester the roads very much, is it not only just that they should pay for what they use and spoil? The road toll is in existence in the Bombay Presidency and no body thought it ever acted as a transit tax.

The Committee have thrown away this tax, without giving due thought to the matter. They find it now very difficult to fill up the gap and are in a fix what to do. If reduced expenditure is not practicable, as we believe, the Committee will do well to revise their decision in the matter of this toll tax a tax which stood so long without a murmur and was so little felt.

We are given to understand that a scheme for introducing Octroi is under contemplation of the Committee. Much can be said for that mode of indirect taxation, on both sides; but certainly it will be for the Committee to see if any such innovation in the mode of taxation is really expedient and desirable. Are the old taxes to be brushed off at a stroke and new ones placed instead. We shall treat separately for having no octroi in Amraoti; but in the meantime we would suggest to the Municipality that experience was in favour of the old toll tax, and any innovation ought to be avoided if possible, unless of course there was the clearest necessity for it.

---

The case in which a European Military officer Captain Plumer was charged for assault by a native Darji of the Ellichpur Cantoument, came off for rial before Colonel Meckenzie, our popular Deputy Commissioner. The Court recorded the statement of the complainant and the evidence of Mr. Hendricks (Military apothecury) and other native witnesses on his behalf. he Magistrate found the accused guilty of the charge and ordered him to pay a fine of Rs. 5. The Magistrate showed great patience during the trial. We must praise Colonel Meckenzie for the justice done to the poor native complainant.

---

(Continued from our last issue.)

**Religion.**

The subject of religion is difficult and delicate ground, and must be but sparingly remarked upon. It would, however be an error to omit it altogether from our consideration. Each must, of course, be guided by his own convictions. In this department exact knowledge is not attainable so as to find universal acceptance. Hence a generous toleration and brotherly feeling to all great duties. Religion being viewed as subservient to morality some religion is better than none. Where certainty is difficult, but error is easy, I would admit light from all quarters; light from the creation generally; light from human reason, from human instinct, and from human conscience, enlightened by knowledge; light from the opinions and beliefs of the best men of all climes and ages; light from the requirements of human society; and light from considerations of what may be probable or safe and solacing.

**Patriot and Politician.**

Many educated persons wish to be either or both. The wish is natural, strong and almost intuitive. And I venture to say that it is useful and honorable. None need regret it; all may rejoice at it. If educated men are not to be patriots and politicians, who else can be? The preservation of all the good which India at present happily enjoys, and its future advancement depend upon her patriots and politicians. This is the class which, of all the vast and varied population of India, is most capable of understanding, appreciating and using the magnificent opportunity which England affords us of learning all that ought to be learnt by progressive communities. England has spread before us the vast stores of knowledge accumulated during many centuries of hard and honest investigation. Let us diligently appropriate these stores. To shut our eyes to them would be worse than intellectual folly; it would be an intellectual sin. Useful knowledge of all kinds must be acquired and assimilated; and political knowledge certainly is not the least important part of it.

**Past political condition.**

It is sometimes asserted in a reckless spirit that the old political condition of India was better than the present. I trust you will not accept such an assertion. Ancient ideals of Government have come down to us in prose and poetry. If the best of those ideals were restored to us in all its integrity India would loudly protest against it. Coming to more recent times, I do not think India would tolerate any Government as it was in pre-British times. The truth must be frankly and gratefully admitted that the British Government of India is incomparably the best Government we have ever had. It is the strongest and the most righteous and the best suited to India's divers populations and divers interests. It is the most capable of self-maintenance, of self-renovation and self-adjustment, in reference to the progressive advancement of the subject-races.

(To be continued.)

---

## वऱ्हाड.

हवमान:—ह्या आठवड्यांत उष्णतेचें मान फारच वाढलें आहे. मधून मधून अभ्रें येऊन हवा कुंद होते हवेचा आजार बराच आहे व ह्या मुळें वऱ्याच लहान मुलांना यम सदनीं जावें लागलें.

मि० हेबर ड० क० खामगाव यांस निजाम सरकारनें १८०० रुपये पगाराची जागा दिल्या वरून ते त्या संस्थानांत रवाना झाले.

---

कर्नल फिट्झरल्ड डे० क० एवतमाळ हे येथें येऊन आपले स्वदेशी जाण्या करितां रवाना झाले. तूर्त हे फर्लोवर गेले आहेत परंतु पुढें लागलीच पेनशन घेण्याचा त्यांचा विचार आहे.

---

मि० ओबर्ड एम् ए सी. स यांनीं बुलढाणें येथील डे० क० चे जागेचा चार्ज घेतला व कर्नल थावसन् यांस अकोले येथें ज्युडिशिअल असिस्टंट नेमिले. असें कळतें.

---

ने० कर्नल ग्रांड डे० क० सा० ह्यांची स्वारी उन्हाळ्या निमित्त शैलशिखरी (नरनाळा) येथें गेली आहे. मि० बंधूजी जनार्दन ए० अ० क० हे तीन महिन्याचे रजेवर गेल्या मुळें त्यांचे जागीं हैद्राबादेस कमिशनरचे क्लार्क आफ् कोर्ट मि० वासुदेव पिसोळकर यांस व त्यांचे जागीं मि. सेल हरमाईल यांस व त्यांचे एवतमाळ येथील क्लार्क आफ् कोर्टचे जागी तेथील इंग्रजी आफीसांतील सेकंड क्लार्क मि० नारायणराव ग्रेंद यांस आक्टिंग नेमिले.

---

केळापूर येथील तहसिलदार मि० अबदूल अजीज यांनीं गेल्या पहिले तारखे पासून पेनशन घेतलें

---

मि० बापूजी भिकाजी एलिचपूर येथील हे० क० चे हेडक्लार्क यांनीं तीन महिन्याची रजा घेतल्या वरून त्यांचे जागीं मि० पॉप यांस आक्टिंग नेमिले.

---

प्रसिद्ध तंट्याभिल यानें चिखल दऱ्याच्या खालच्या बाजूस चिचाली नांवाचें लहानसें खेडें आहे तें लुटल्याचें समजतें.

---

शोचनीय मृत्यु:—आम्हांस लिहिण्यास दुःख वाटतें कीं मलकापूर येथील प्रसिद्ध सभावित सावकार बाळुसा सावजी यांचे वडिल चिरंजिव व्यंकट बापू यांचा मृत्यु फारच चमत्कारिक रीतीनें झाला. व्यंकट बापू हे आपले खाजगी दिवाणखाण्यांत असतांना तेथें एक गोसावी आला व असे सांगू लागला कीं मजपाशीं सोनें तयार करण्याची कांहीं किमिया आहे व एकांत स्थलांत याल तर मी तुम्हांस सोनें तयार करून दाखवितों त्यावरून बिचाऱ्या व्यंकटसा यांना दिवाण खान्याचे सर्व दरवाजे व खिडक्या बंद केल्या व आपण व गोसावी असें दोघेच तेथें राहिले. इकडे या प्रमाणें स्थिती होती इतक्यांत सदर्हू बरोबर लिहिलेल्या गोसाव्याचा चेला एकदम बाळुसा सावजी यांचे दुकानची माडी चढून गेला व सांगूं लागला कीं तुमचे चिरंजिवानें माझा गुरू कोठे फितावून नेला आहे. तो मला लवकर आणून द्या नाहीं तर तुमचे उंबरठ्यांत मी आपले प्राण बळी पाडतो या वरून सावजी अगदींच घाबरून गेले व मुलाचा शोध करूं लागले. आपले मुलाचे दिवाण खान्या कडे येऊन पहातात तों सर्व दरवाजे बंद केले आहेत शेवटीं गच्ची फोडून मंडळी आंत घुसली तों हृदय द्रावक भयंकर देखावा त्यांचे नजरेस पडला. व्यंकटसा हे गत प्राण होऊन पडलेले आहेत व त्यांचे आंगावर गोसावीही पडलेला आहे परंतु गोसाव्याचे निर्वात थोडी धुगधुगी मात्र होती. त्यास डाक्टरचे हॉस्पिटलकडे नेतांना मार्गांतच त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. गोसावी मजकूर याजपाशीं २०-२५ तोळे सोनेंही सापडलें आहे. गुरूचा चेला यास पोलिसांनीं अटकेत ठेविले आहे व तपास फार जारीनें सुरूं आहे. अशा प्रकारचे भयंकर रीतीनें पुत्राचा मृत्यु झाल्यामुळें शेट बालुसा यांजवर दुःखाचा पर्वत कोसळला आहे, व त्यांचें हें दुःख पाहून बहुतेक सर्व बुलढाणें जिल्ह्यांतील लोकांस फारच वाईट व हळहळ वाटत आहे आतां सावजी यांचे मित्रमंडळीनें त्यांचें दुःख कमी करवेल तितकें केलें पाहिजे. कारण ईश्वर सत्तेपुढें कोणाचा उपाय नाहीं.

---

नाटक:- संगीत गुणोत्कर्ष नाटककार मंडळीं ह्या आठवड्यांत येथें आली व खेळ्यासही सुरवात झाली गेले शनवारी संगीत मालती माधव नाटकाचा प्रयोग त्यांनीं करून दाखविला नाटकात टापटीप व्यवस्था याची बरीच उणीव असल्यामुळें नाटकास जितकी शोभा अवश्य होती तितकी नव्हती. पहिला विष्कंभक नीट वठला नाहीं. मकरंद याचे अंगीं थोडें चापल्य व तरतरी असल्यामुळें त्याचा आवाज जरी अमळ घोगरा होता तरी फारशी उणीव दिसून आली नाहीं. माधव या पात्राचे अंगीं गायन शैली बरीच आहे परंतु मध्यें मध्यें गवय्याचे ऐटीवर जाऊन आलाप विशेष घेत असे परंतु हे आलाप अशा प्रकारचे संगीत नाटकांत आनंद दायक वाटत नाहीं. हें पात्र प्रमुख पात्रांपैकीं एक असल्यामुळें त्याचे अंगीं तरतरी, चपलता, व हावभाव हे गुण अवश्य पाहिजे होते परंतु त्याचा अभावच दिसला. यांत या पात्रानें सुधारणा केली तर हें पात्र आपला भाग निःसंशय वर्णनीय करील. भगवती कामंदकी व राक्षसीकपालकुंडला ह्यांनीं आपआपलीं कामें फार वर्णनीय केली. दासी लवंगिका हिनें आपला भाग साधारण बरा केला. मुख्य पात्र मालती हे आपलें काम प्रशंसनीय करील अशी पुष्कळांस आशा होती परंतु व्यर्थ. या पात्राचे अंगीं कोमलता व विनयता हे गुण जरी होते तथापि हावभाव व गाण्याचें अंग कमी असल्यामुळें काम फार फिक्के पडलें. असो नाटककर्तांचा हा पहिलाच खेळ होता त्यांची सामानसुमानाची व्यवस्था बरोबर न लागल्यामुळें व खेळाचें सामान अगदीं वेळेवर येऊन पोंचल्यामुळें त्यांची बरीच घांदल उडाली होती तथापि एकंदर मानानें पाहिले असतां खेळ साधारण बरा झाला येत्या शनवारी ही मंडळी संगीत इंद्रसभेचा खेळ मराठी भाषेत करून दाखविणार आहे.

---

## वर्तमानसार.

इंग्लंडामध्ये ज्युबिली महोत्सवाप्रित्यर्थ कशी तयारी असली पाहिजे ह्याचा विचार करण्याकरितां ठिकठिकाणीं सभा भरत आहेत त्यांपैकीं कित्येक सभांमध्यें अशा प्रकारचा महोत्सव करण्याचा कांहीं अवश्य कता नाहीं असें उद्गार निघावें ही मोठी दुःखाची गोष्ट होय. वेल्स प्रांतातील लानली नामक शहरांमध्यें एका प्रसिद्ध सभेंमध्यें महाराणी साहेबांच्या नांवानें अशा प्रकारचा महोत्सव करण्याचें कांहीं कारण नाहीं असा ठराव बहुमतानें पसार झाल्याचें समजतें. ह्या देशामध्ये कोठें असा प्रकार घडून आला असता तर राजद्रोहाचा मोठाच ओरड झाली असती. हिंदुस्थानामध्यें कोठें असा प्रकार होऊन पुढें काय होते हा अनुभव पाहण्याची वेळ आली नाहीं ही मोठ्या आनंदाची गोष्ट समजावयाची.

एक साठहजार रुपये किंमतीचा हत्ती तीन हजारांच्या हौद्या सह पार्शियाच्या शहास देण्याचा निश्चय झाला. ह्या प्रमाणें हत्ती मुंबईस आला होता. तो येथून बुशायरला पाठविण्यांत आला. तारवावर चढतांना बरीच गडबड त्यानें केली.

एक फ्रेंच गणीती असें ह्मणतो कीं पुष्कळ मैल लांब एक खड्डा खणावा ह्मणजे आपले पाया खालीं काय चाललें आहे तें आपणास तावडतोब कळेल. शिवाय पृथ्वीच्या आंत असलेल्या उष्णतेचाही उपयोग करून घेतां येईल.

— लोखंड व पोलाद बाहेर पाठविण्याचे संबंधानें जे बंध होते ते सर्व चिनी सरकारानें काढून टाकले असें समजतें.

— इंग्लंडामध्यें हल्लीं पिठाच्या गिरण्या बंद होण्याची वेळ आली आहे. अमेरिकेहून इतकें कांहीं पीठ येत असतें कीं ह्या देशाशीं बरोबरी करितांना इंग्लंडचे हात थकले. ज्याच्या योगानें इंग्लंड वाढलें त्याच्याच पायानें इंग्लंडचा चूर न होवो ह्मणजे झालें.

— न्यूयार्क येथील पोलिस खात्यांत फार उत्तम व्यवस्था आहे असें कळतें. संध्याकाळीं एक शिपाई साडे बारा वाजतां कामावरून परत गेला. तो रात्रीं ११ वाजतां गैरवर्तनामुळें पकडला गेला, व त्याच रात्री वाजतां एक वाजतां नोकरींतून काढून टाकलें. ने० ओ०

खंबायतच्या खटल्याची चौकशी होत असतां मि. शामराव लाड यांनीं असें एक वाक्य ह्मटलें कीं, "मी दाक्षिणी ब्राह्मणा प्रमाणें आपल्या मुलीशाळी साहेबाकडे पाठविणारा मनुष्य नव्हे." मि. शामराव यांचें हें वाक्य याच आठवड्यांत एक ठिकाणीं आमच्या वाचण्यात आलें व त्यांणी तें वाक्य कशाही रागाच्या झपाट्यांत उच्चारलें असलें तरी जे पानी नाहींत त्या दक्षणी ब्राह्मणास तें सहन होण्यासारखें नाहीं; म्हणून मि. शामराव यास आम्ही असें सांगतो कीं, त्यांणी आपलें तें वाक्य परत घेऊन दक्षणी ब्राह्मणाची माफी मागावी नाहींतर त्यांचें प्रायश्चित्त त्यास भोगावें लागेल.

राष्ट्राच्या बचावाकरतां यत्न करणें हें इंग्लंड व इंग्लंडच्या ताब्यांतील वसाहती या सर्वांचे मिळून काम आहे असें विलायतचे मुख्यप्रधान लार्ड सालिसबरी यांनीं ता. ४ रोजीं एक ठिकाणीं बोलून दाखविलें. त्यांचें हें म्हणणें आम्हास अगदीं पसंत आहे व त्याबद्दल आम्हीं त्यांचे आभार ही मानतों पण त्याच्याचबरोबर राष्ट्राचें हितही इंग्लंड व इंग्लंडच्या ताब्यातील वसाहती या सर्वांत सारखें दिलें जाईल असें ही त्यांणी सांगणें अवश्य होतें, आणि त्यांनी तें सांगून त्याप्रमाणें आपली कृतीही दाखविली असती म्हणजे मात्र त्यांची स्तुतीपात्रता कायम राहिली असती त्यांणीं त्यावेळीं तसें न सांगतां पाहिजे वाक्य मात्र उच्चारलें यावरून खानेकु हम और लढणें कु मेरा भाई या म्हणी प्रमाणें त्यांची स्थिती दिसते. इंग्लंडच्या ताब्यांत ज्या कित्येक लहान मोठ्या वसाहती आहेत त्या सर्व इंग्लंडच्या बरोबरीनेच हितास व अनहितास भागिनदार आहेत असें जर त्यांचें वर्तन असतें तर आज जो ऐलंडचा दखेडा सुरू आहे तो मुळींच नसता आणी कायद्यासारख्या महा पवित्र लेखांतही काळ्या गोऱ्याचा जो फरक ठेवला आहे तो मुळींच राहिला नसता. अफगाणची लढाई जर राष्ट्राकरतां होती तर तिचा सर्व खर्च एकट्या हिंदुस्थानावर कधींही पडला नसता. तसेंच इंग्लंड व हिंदुस्थान मिळून जर एक राष्ट्र आहे तर त्या उभयतांच्या दरम्यान होणाऱ्या व्यापारावर ज्या अनेक प्रकारें हिंदुस्थानास नुकसानकारक अशा अडचणी घातलेल्या आहेत त्यांचें ही कारण नव्हते. इंग्लंड व हिंदुस्थान मिळून जर एक कुटुंब आहे तर त्याकुटुंबाचा पुढारी जी पार्लमेन्ट तींत इंग्लंडचे प्रतिनिधी ज्या प्रमाणानें आहेत त्याचप्रमाणें हिंदुस्थानचे प्रतिनिधीही असतें हिंदुस्थानचा एकही प्रतिनिधी नाहीं असें कधींच झालें नसतें, उभयतांचे मिळून जर कुटुंब आहे तर काळ्यास रोज एक आणा बस व गोऱ्यास रोज एक रुपया तरी पाहिजे असा फरक कसा झाला असता इत्यादि प्रकार पाहिले म्हणजे लार्ड सालिसबरी यांच्या या वाक्यांचा अर्थ तुम्ही आम्ही एक व कंठाळीस मेळ यासारखा अथवा आमचें ते आमचें व तुमचें तें आमच्या बापाचें यासारखा ठरतो व त्याकरतां वसाहतींत पसंत होण्यासारखा नाहीं.

पायोनियर म्हणतो कीं, अफगाणिस्थानांतून आलेली बातमी अमिराने विचार करण्यासारखी आहे इतकेंच नसून हिंदुस्थानसरकारानेंही विचार करण्यासारखी आहे. गिलचे लोकांची गडबड अजून सुरू झाली नाहीं, पण त्याचा जमाव होऊं लागला आहे. अमिराने जरी हिंदुस्थान सरकाराकडे मदतीचे व सल्याचें मागणे केलें आहे तरी त्यानें आपली तयारी चालविली असून तो काबुलास फौज जमा करीत आहे आणि त्या गिलचे लोकांस आपण शासन करूं शकूं अशी अमीरास उमेद आहे. लोकांत अशी बोलवा आहे. कीं, या गिलचे लोकांच्या दांडगा त्यापासून अमिराच्या अधिकारास कांहीं हरकत येण्याचा संभव नाहीं, कारण गिलचे लोक जरी चांगले शूर आहेत तरी त्यांच्या पाशीं चांगलीं हत्यारें नसून त्यांच्यांत चांगले शहाणे व वजनदार असे पुढारीही नाहेत आणि त्यांच्या पाशीं पैशाचा ही पुरवठा नाहीं

मि. गार्डन नावाच्या एका मनुष्यावर खोटा कागद करून पैसे आल्याचा आरोप असून हल्लीं तो जबलपूर येथें कैदेत आहे असें सांगतात. युरोपियन लोक असें करतात!

लोहारच्या पत्रांचा विश्वासनीय बातमीदार सांगतो कीं, उत्तरअफगाणीस्थानांतील असे जे गिलझे लोक ते एकत्रपणाने अमिराच्या विरुद्ध वागण्यास तयार झाल्यावरून अमीर अगदीं घाबरून गेला आहे. अशा स्थितींत मला मदत करा व मी कसा वागूं तें सांगा असें अमिरानें हिंदुस्थान सरकारास विचारलें असून त्याबद्दल विलायतसरकारचें मत विचारण्यांत आलें आहे असा अमिरास जबाब मिळाला. अफगाणीस्थानतील लोकांचें मत अमिराविरुद्ध फार झालें आहे व आडदांड लोक अमिराविरुद्ध व्हावे अशी खटपट होण्याची भीति आहे. अफगाणीस्थानातील लोक व तो देश हे अमीर हा गुप्तरीतीनें इंग्रजास विकीत आहे आणि इंग्रजास आपली फौज अफगाणिस्थानांत आणण्यास संधी व सवड मिळावी ह्मणून त्यांस कंदाहारपर्यंत रेल्वे करण्यास अमीर हा चुपीतऱ्हेनें परवानगी देत आहे अशी तिकडच्या लोकांची समजूत होत चालली आहे. लोकांचा हा दंगा मानण्यास अफगाण तुर्कस्थानातील बदक शाना प्रांतांत फैजाबाद येथें जाऊन राहण्याच्या बेतांत असून तेथेंच आपली संपत्ती नेऊन ठेविली आहे व ती संपत्ती सुरक्षित असल्याबद्दल अमीर हा आपणास धन्य मानीत आहे. हा असा प्रसंग आल्यास पर्शियाच्या हद्दींत फसरी होऊन राहिलेला सरदार अयुबखान याच्या वाचून दुसर कोणी गादीचा खरा वारस नसल्यामुळें त्यावेळीं बरीच मोठी गडबड होईल अशी अटकळ आहे.

ब्रह्मदेशाच्या कामावर गेलेले जे लष्करी शिपाई व सोजीर तिकडे आजारी पडून आहेत त्यांच्या करतां जर कोणास वर्तमानपत्रें व लहान सहान पुस्तकें पाठवावयाची असतील तर त्यांस डाकहशील पडणार नाहीं असें हिंदुस्थान सरकारानें फर्माविलें आहे.

मि. फरदुनजी जमशेटजी यांस हैद्राबादच्या दिवाणाचे प्रायव्हेटसेक्रेटरी नेमले आहेत. हे गृहस्थ निझामाच्या राज्यांतच जन्मास आलेले असून वेगळाल्या पुष्कळ हुद्याची कामें केलेलीं आहेत.

ढाका स्टेटरेल्वे चितागांगपर्यंत वाढविण्याचा ठराव झाला आहे.

अफगाणिस्थानांतील गडबडीची बातमी गव्हरनरजनरल यांस अलाहाबादच्या मुक्कामास असतां पोचली असें सांगतात, पण ती गडबडीची बातमी काय हे त्यांत नाहीं.

इटाली सरकार अबिसीनियादेशांत जास्त बंदोबस्त करण्याच्या तयारीत आहे. ११,००० फौजेची एक टोळी त्या देशांत रवाना करीत असून १८८३ सालीं परत आणलेली १७,००० फौजही पुन्हा तिकडे पाठविण्याचा विचार चालू आहे अबिसीनियास खाणार कीं काय?

मेजर गाग हे निझामाचे प्रायव्हेट सेक्रेटरी झाल्यापासून निझाम व त्यांचे दिवाण यांचें विशेष सख्य होत चाललें आहे. हल्लीं निझामांचे एकंदर तीन प्रायव्हेट सेक्रेटरी आहेत पण ते वेगळाले तीन असल्यामुळें कामाचा फार घोटाळा होतो म्हणून दुसऱ्या दोघांस काढून त्या तिन्ही जाग्यांचें काम या मेजरसाहेबाकडेच सोंपाविण्यांत येणार आहे. म्हणजे इंग्रजांवांचून त्यांस बोलतांही येऊं नये. सरकारी सेक्रेटरीही साहेबच आहेत.

ठा० ब०

नेवाड जिल्ह्यांत सरकारानें राखून ठेवलेल्या जंगलास आग लागून ३६ मैलांतील झाडे झुडपे जळून सुमारें एकलक्ष रु. नुकसान झालें.

कलकत्ता येथें सरकारी बंगल्यांतल्या मेजवानीच्या समयीं व्हाइसराय साहेबांच्या भाषणास सेररिव्हर्स थामसन यांनीं हिंदुस्थान प्रमाणें अगांव होतकरू देश नाहीं असें उत्तर दिलें.

होळकर सरकार ता. १९ रोजीं मुंबइहून युरोपांत जाण्यास निघणार ते प्रथम कांहीं दिवस पारिसमध्यें राहणार व ज्युबिलीच्या उत्साहाच्या सुमारास इंग्लंडांत जाणार असें म्हणतात.

मेलबोर्न युनिव्हर्सिटीनें स्त्रियांस वैद्यशास्त्राच्या परिक्षेस येण्याची परवानगी दिली.

हिंदुस्थानांत मद्यपानाचें व्यसन दिवसेंदिवस वाढत चाललें आहे हा प्रकार अत्यंत घातक आहे अशी इंग्लंडांतील लोकांची खात्री झाल्याशिवाय हा हानीकारक व्यापार ते करण्याचें सोडणार नाहींत असें मि. साम्युअल स्मिथ यांनीं इंग्लंडांतील एका वर्तमान पत्रांत प्रसिद्ध केलें आहे.

म्हैसूरचे दिवाण शेतकीच्या कामाकरितां शेतकऱ्यास पैसे कर्ज देण्यासाठीं कांहीं बँकी स्थापन करण्याच्या विचारांत आहेत असें म्हणतात.

पंजाबांतील विद्याभ्यासाच्या रिपोर्टावरून असें समजतें कीं सन १८८५।८६ सालांत तिकडील प्रांतांत ६१६ नवीन विद्यालयें झालीं परंतु १९ विद्यार्थ्यांची मात्र संख्या वाढली.

बंगाल इलाख्यांतील १९ जिल्हे तुरंग बंद करण्याचा बंगाल सरकार विचार करीत आहे.

हिंदुस्थान सरकार खर्चाची काटकसर करीत आहे यास्तव हिंदुस्थानच्या संबंधाचे जे कारभार सरकार ठेवते त्यांचीं सर्व तारखें इकडेस तयार करावींत व त्या वरील सल्लाशी ही एतद्देशीय ठेवावेत म्हणजे पुष्कळ खर्च वाचेल अशी अमृत बजार कर्त्यानें सूचना केली ती खरोखर सयुक्तिक आहे.

मिरजे पर्यंत रेल्वे सुरू होणार होती परंतु आणखी कांहीं दिवस ती सुरू होत नाहीं असें प्रसिद्ध झालें आहे. सु० प०

---

☞ हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छा० प्र० केलें.

साहसमाही " १ " ३ " "
साल अखेर " ७ " ७ " " ८
किरकोळ अंकास........................ ४

नोटिशी बदल
१० ओळीचे आत रु १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०।

Per annum in arrears 7 " 1R. 8 a
Six monthly............ 3 " 8 as
Single copy.............................. 4as

Advertisements.
Below 10 lines...2
Per line over 10...4a
Repetition per line 3a

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR.

VOL XXI AKOLA MONDAY 25 APRIL 1887 NO 16

वर्ष २१ अकोला सोमवार तारीख २५ माहे एप्रिल सन १८८७ इ० अंक १६

पंजाब नादरी मुकदमा नंबर. १
सन १८८७ इ०
नमुना ( नी. )

विद्यमान नादारी कोर्ट जिल्हा आकोळें यांचे कोर्टांतून सर्व लोकांस प्रसिद्ध करण्या साठीं कळविण्यांत येतें कीं, महेबुबशा वल्दद कमालशा फकीर राहणार तालुके आकोट हा नादार आहे असा आज तारीख ९ माहे एप्रिल सन १८८७ इसवी रोजीं ठराव झाला आहे आणि तारीख १३ माहे मे सन १८८७ हा दिवस नादारचे सावकारांनीं नेमण्या करतां आणि सावकारांनीं आपल्या तर्फेचा असामी नेमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटकेविषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटकेसंबंधीं ज्या सावकारांची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्यासर्वांनीं या बद्दल आठ आण्याचे स्टांप कागदावरर अर्ज लिहून त्या आर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशीत ज्या आधारावरून तक्रार सांगणे असेल ते आधार आणि त्याबद्दल ज्या साक्षीस समन्स करावयाची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें दाखल करावीं. ही नोटिस नेमण्याकरितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीनदिवस पूर्वी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनी पाहण्याकरितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड रीतीनें ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्यावर अर्जदारानें सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे रहाणारे असतील त्यांनीं आठ आण्याच्या स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या ज्युडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी. आणि ती यादी टपालांतून कोर्टास पाठवावी म्हणजे ते दावे रजिष्टर दाखल होतील. ता. १६-४-८७ इ०

Mahomad Yasinkhan.
ज्यडूज.

पंजाब नादारी मुकदमा नंबर. २
सन १८८७ इ०
नमुना. ( नी. )

विद्यामान नादारी कोर्ट जिल्हा आकोळें यांचे कोर्टांतून सर्व लोकांस प्रसिद्ध करण्यासाठीं कळविण्यांत येतें कीं, केसो वल्दद नारायण राहणार म्हैसपुर तालुके आकोळें हा नादार आहे असा आज तारखेस ठराव जाहला आहे. आणि तारीख १३ माहे इप्रील सन १८८७ इसवी रोजीं ठराव जाला आहे. आणि तारीख १४ ... सन १८८७ हा दिवस नादाराचे सावकारांनीं जमण्याकरितां आणि सावकारांना आपल्या तर्फे असामी नेमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटकेविषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटकेसंबंधीं ज्या सावकारांची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्यासर्वांनीं या बद्दल आठ आण्याचे स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या आर्जानें नोटिस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आधार आणि त्याबद्दल ज्या साक्षिस समन्सें करावयाची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमुद करावी. ही नोटीस नेमण्याकरितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनी पहाण्या करिता नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांणी आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्यावर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांप कागदावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपत लिहावी. आणि ती यादी टपाला कडून कोर्टास पाठवावी. ह्मणजे ते दावें रजिष्टर दाखल होतील. ता० १६ माहे एप्रील सन १८८७ इ०

Mahomad Yasinkhan.
जड्ज.

नोटीस.

जितमल सदाराम रहाणार हल्लीं दासानीया शेरगड जिल्हा जोदपूर यांस नोटीस देणार देवकिसन बाल मुकुंद राहणार तळेगांव तालुके आकोट नोटिसीनें असें कळवितों कीं, तुम्ही आमच्याशीं शेअरनें सावकारी दुकानदारी बेरगांवीं करून चार वर्षें झाली. अलीकडे आपण आमच्याशी दगाबाजी करून दुकानचा हिशेब देणें घेणें नफा नुकसान वगैरे बद्दल दुकानचा हिशेब आम्हास समजुन न देतां तुम्ही पंधरा दिवसां पूर्वीं काहीं रोकड वगैरे दुकानची घेऊन न कळवितां निघून गेला. ह्मणून आपल्यास ही नोटीस देतो कीं नोटीस पावल्या पासूर १५ दिवसांचे आंत येऊन सर्व हिशेब घेणेंदेणें नफा वगैरे याचा हिशेब समजून देऊन सर्व निकाल करावा असें न झाल्यास रीति प्रमाणें तजवीज करून सर्व नुकसान भरून घेतलें जाईल.

तागाकल्द मालाच्या झडती बद्दल असामी वगैरे बद्दल एकंदर हिशेब सदरील मुदतींत निकाल करावा, असें न केल्यास सदरीं लिहिले प्रमाणें तजवीज होईल. कळावें.

( सही ) देवाकिसन
बालमुकुंद दस्तुरखुद.

नोटीस.

नामदेव वल्दद गंभीरजी पाटील तायडे कारंजे रमजानपूर ता० बाळापूर जि० आकोलें यांस नोटीस देणार सिताराम मानसिंगजी पाटील रहाणार कारंजा रमजानपूर. नोटीसीनें असें कळविलें जातें कीं तुमचे बापाकडे आमचे रु.एकंदर येणें २४० त्याजबद्दलचा गहाण दस्ताऐवज याचा आज पावेतों तुमचे बापाचे हातून निकाल झाली नाहीं. व तुमचे वडील मध्यंतरी गुदरले. त्यास आज सुमारें चार महिने झाले परंतु तुह्मी आपले बापाचे मागें निकाल केला नाहीं. याज करितां नोटीसीनें कळविलें जातें कीं. नोटीस पावल्या पासुन १५ पंधरा दिवसाचे आंत रुपये सर्व देऊन निकाल करावा. असें न केल्यास रीती प्रमाणें कोर्टांत काम चा, लवूं कळावें. तारीख १८ माहे एप्रील सन १८८७ इसवी.

( सही ) सितारामजी
मानसिंगजी पा. मोजे
कारंज रमजानपूर.

नोटीशीचें उत्तर.

राधाबाई जवजे मारुती पाळन करणार बाप गणुजी वल्दद एकोजी गुजर राहणार कजबे मांदुरें या उभयतांस नोटीस देणार मारुती वल्दद खंडुजी रंगारी रहाग राहणार कजबे मांदुरें या नोटीसीनें असें कळवितो कीं, तुम्ही तारीख ११ माहे एप्रील सन १८८७ रोजीं वऱ्हाडसमाचार मधून नोटीस दिली ती पावली. सर्व मजकूर समजला. लग्न होऊन सुमारें ५ वर्षें झालीं सात झाली नाहींत. आम्ही राधाम आश्विन वद्य १२ शके १८०८ रोजीं तुह्मी स्वतः येऊन माझे समती शिवाय चार लोकांत पाहिजे ती हलकटपणाची बडबड करूनतिजला घेऊन गेला त्या नंतर आह्मी चारमहिन्यांनीं तीर्थरूप आमचे बंधु गणपती यांस आह्मी आणण्या करितां पाठविलें असून त्यांस तुह्मी सांगितलें कीं मुलगी लहान आहे. आसां ९ देणेत नाहीं. चार दिवसांनीं पाठवूं या प्रमाणें आम्ही दुसरे वेळीं रीती प्रमाणें बोलावणे पाठविलें परंतु तुह्मी शिवीगाळ करून माझे माणसाची इज्जत घतली. आतां आपण नोटीशींत कळवितां कीं आह्मी लग्न दुसरें करणार मग तुमचा संबंध नाहीं त्यास आमच्या आंगांत ताखत आल्यास आम्ही आणखी चार बायका करूं ह्मणून पहिलीस रीती प्रमाणें नांदविणार नाहीं असें नाहीं. आतां तुह्मी दोन वर्षांची खावटी रुपये १२५ मागितली त्यांस लहानपणी मांदेर सासर जे करितात या लोकांनीं आज पावती कोणी खावटी दिली नाहीं. त्या प्रमाणें आम्ही ही खावटी देत नाहीं. ज्या प्रमाणें आपण आपल्या मोठ्या लेकीस विनाकारण चार घरठाव करून दिले आणि तुमचा बंधु नामें पुरणसा याजला तुह्मी गंधर्वाची स्त्री करून दिली त्या वेळेस पहिली स्त्री लग्नाची नऊ वर्षाची होती. तिचें कांहीं एक गुण अवगुण व कांहीं अपराध न पहातां कशी करून दिली या प्रमाणें तुह्मी काम करितां तर तुह्मी मोठे मनुष्य अहा. तुह्मास त्यावेळेस पंचानीं मना केले होते काय हे तुह्मी आपल्या मनांत समजावें. त्याप्रमाणें आम्हास आपण समजूं नये. आह्मी आमची बायको इजला रीतीप्रमाणें सर्व गोष्टीनें नांदविण्यास तयार आहो. याज करित आह्मी आंगावरील सर्व दागदागीनें काढून न घेतां तसेंच तिच्या अंगावर ठेविलें आहेत, ह्मणजे आह्मी रीती प्रमाणें तिजला वागविण्यास जन रीती प्रमाणें आह्मी तयार आहों. आतां माझी बायको लहान आहे ह्मणून तुह्मास ही नोटीस पावल्या बरोबर तुह्मीं स्वतः येऊन तिजला पोचवावी. व तो वयांत आल्यावर मी मग तिजला स्वतः येऊन घेऊन जाईन कळावें ह्मणून दिली नोटीस. तारीख २० माहे एप्रील सन १८८७ इसवी.

( सही ) मारुती वल्दद खंडुजी रंगारी रहाणार कजबे मांदुरें
दस्तुर खुद.

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख शुद्ध २ शके १८०९

## शिंदे सरकार व त्यांचा खजीना.

थोड्या दिवसां मागें बंगालपांतील इं-

गिलशमन नामक एका इंग्रजी पत्रांत शिंदे सरकारच्या खजिन्यांतून ३॥ कोटी रु. आपल्या सरकारला त्यानी दिले नातीळ असा एक लेख प्रसिद्ध झाला होता. ही गोष्ट प्रथम आम्हाला विश्वसनीय वाटली नाहीं; कारण शिंदेशाई दरबारांत चांगले हुशार, जुने व अनुभविक लोक असल्या कारणानें व मुख्य रिजंटच्या जागीच सर गणपतराव राजे हे असल्या कारणानें त्या दरबारच्या हातुन असा अविचार होईल असें आमच्या ध्यानींही आलें नव्हतें. परंतु हीच गोष्ट आतां इतर पुष्कळ एतद्देशीय व इंग्रजी पत्रांत विश्वसनीय म्हणून प्रसिद्ध झाली आहे व त्याप्रमाणेंच मुंबईच्या बांबे गॅझेट पत्रांत ही या विषयासंबंधानें खुद्द ग्वालेरहून एका गृहस्थाचें एक पत्र आलेलें छापलें आहे त्यावरून पहातां हा सर्व प्रकार खरा आहे अशी आमची खात्री झाली. ग्वाहेर दरबारच्या हातून ही केवढी धोक्याची एवढी चूक झाली आहे हें सांगणें नकोच. अशा रीतीनें इंग्रज सरकारच्या तिजोरींत व्याजानें पैसा ठेवणें हें कितीही फायदेशीर असलें तरी ज्या संस्थानांत खुद्द आपल्या प्रांतांतच पैशाची जरूर विशेष आहे त्या संस्थानांनीं आपल्या जवळ पैसा पुष्कळ शिल्लक राहिला ह्मणून त्याचा असा व्यय करणें हें रास्त नव्हे. आमच्या एतद्देशीय संस्थानांत अद्याप पुष्कळ लोकहिताचीं कामें करणें राहिलीं आहेत त्या प्रमाणें शिंदे सरकारच्या राज्यांतही या उणिवा पुष्कळ आहेत. त्या दूर करण्याकडे जर दरबारनें या पैशाचा व्यय केला असता तर त्याचें चीज विशेष झालें असतें. शिंदे सरकारच्या खजिन्यांत सध्यां एकंदर शिल्लक ७ कोटी रुपये आहे. आतां त्या राज्यांतील लोक संख्येकडे लक्ष दिलें असतां इतका पैसा शिल्लक कसा राहिला हें कोणी पाहूं लागला तर त्याला तेव्हांच दिसून येईल कीं एवढा पैसा शिल्लक रहाण्या करितां लोकांवर कराचें ओझें बरेंच जोराचें बसलें पाहिजे आहे. व अशा रीतीनें लोकां कडून आलेला पैसा या रीतीनें खर्च करणें ह्मटलें ह्मणजे लोकांस त्याची खरोखरच गरज नाहीं असें असेल तरच रास्त दिसणार आहे. या विषया संबंधानें दरबारांत वादविवाद चालला असतां प्रथम कित्येक मुत्सदी लोक याच्या विरुद्ध होते परंतु सर गणपतराव यांच्या ह्मणण्याला शेवटीं त्यांना रुकार द्यावा लागला. हा पैसा अशा रीतीनें खर्च करण्या बद्दल दरबारांत सर गणपतराव यांनीं जीं कारणें दाखविलीं आहेत तीं हीं मोठीं चमत्कारीकच आहेत. ते ह्मणतात कीं अशा रीतीनें इंग्रज सरकारला पैसा उसना दिला असतां एक प्रकारें त्यांवर आपला विश्वास असें दाखविल्या सारखें होणार आहे व शिवाय त्याचें व्याज ही पुष्कळ येऊन त्या व्याजांतूनच आपल्याला मुद्दल कायम राहून सुधारणेचीं पुष्कळ कामें करितां येतील! काय तरी सबळ कारणें हीं हीं. इंग्रज सरकारवर आपला विश्वास आहे असें दाखविण्यास सर गणपतराव यांना दुसरें साधनच कांहीं सांपडलें नाहीं. त्या प्रमाणेंच फायदेशीर पैशाचा उपयोग करण्याची ही दुसरी युक्ति त्यांना दिसली नाहीं. सर गणपतराव हे चांगले विद्वान आहेत त्यांना देशाचें खरें हिताहित सर्व समजत आहे. तेव्हां त्यांना स्वदेश व्यापाराला किंवा एतद्देशीय धंदा कला यांना उत्तेजन येईल व त्यांची भरभराट होईल असें एखादें कृत्य या पैशानें करविलें असतें तर हल्लींच्या व्याजा पेक्षां अधीक फायदा त्यांना मिळाला नसतां काय? एतद्देशीय संस्थानांत अशीं कामें होणें कितीं इष्ट आहे हें गायकवाड भावनगर, ट्रावहनकोर वगैरे संस्थानिकांनीं घालून दिलेल्या उदाहरणांनीं उघड दिसत आहे. तेंच उदाहरण सर गणपतराव यांनीं गिरविलें असतें तर हल्लींचा त्यांचा इष्ट हेतु अधीक चांगल्या रीतीनें सिद्धीस गेला नसतां काय? आपल्या देशांत कोणतें ही प्रकारें असलीं कामें सुरूं करणें ह्मटलें ह्मणजे त्याला पैशाची मोठी उणिव येते. त्यालाच जर या ३॥ कोटी रुपया पैकीं कांहीं लक्षांची मदत झाली असती तर किती उत्तम झालें असतें. त्या प्रमाणें शाळा, तळीं; विहिरीं, रस्ते वगैरे व लोक हितांचीं कामें करण्यांत या पैशाचा कांहीं भाग खर्च केला असतां तर लोक किती खुष झाले असते.

या विषया संबंधानें आमच्या मनांत दुसरी एक कल्पना येते. ती कदाचित चुकीची असेल. परंतु आह्मांला ती पुष्कळ अंशीं संभवनीय वाटते. आमच्या सरकारची पैशा संबंधानें उडालेली हल्लींची त्रेधा सर्वांस विदीतच आहे. तेव्हां या प्रकारें कर्ज देण्याचें आमच्या सरकारा पैकींच कोणी तरी ग्वाल्हेर दरबारला सुचविलें असेल किंवा दुसरें कांहीं अधीक झालें असेल. त्या शिवाय हा प्रकार इतका जलद व कांहीं गडबड झाल्या शिवाय शेवटास गेला नाहीं. अशा गोष्टी एतद्देशीय संस्थानांत अलीकडे घडून आल्याची उदाहरणें बरीच झालीं आहेत. असेंच असेल तर तेथें विचाऱ्या सर गणपतरावाचा व खुद्द शिंदे सरकारचा तरी काय इलाज. असो. कांहीं झालें तरी या ३॥ कोटी रुपयांचा जो असा व्यय होतो आहे तो आह्मांला मुळीच पसंत दिसत नाहीं. त्यांत निदान शिंदे सरकार जों पर्यंत लहान आहेत तों पर्यंत तर असें करणें मुळींच बरोबर नाहीं. सर गणपतराव व त्यांचे अनुयायी मंडळी यांनीं या गोष्टीचा विचार चांगला करावयाचा होता असें आह्मांला वाटतें.

---

## दिवाण सर सालरजंग.

(लिहून आलेला मजकूर.)

निजाम सरकार व त्यांचे दिवाण यांचीं मनें परस्परां विषीं अधिकाधिक कलुषित राहणें दिवसें दिवस कठीण पडूं लागलें तसतसा त्यांचा बेबनाव उघडरीत्या लोकदृष्टीस येत चालला; हा विरोध बलावत आहे तोंच मूळ बीज नाहींसें करावें आणि निजाम सरकार व त्यांचे दिवाण यांचे ऐक्य करावे ह्मणून लार्ड डफरीन यांनीं हैद्राबादची सफर केली व थोड्या दिवसा पूर्वीं कर्नल मार्शल यांस ही निजाम सरकारचे सेक्रेटरीच्या हुद्यावर पाठविलें. कर्नल मार्शल येऊन हळूहळूं जुळवाजुळव करूं पहात आहेत अशा वेळीं दिवाण सर सालरजंग यांनींच आपलें कामाचा राजीनामा सादर केला असें खात्री लायक समजतें. हैद्राबादचा राज्य कारभार क्रमाक्रमानें अनिष्ट थरावर येत असल्या विषया वेळोवेळ लेख आहेत त्या वरून वस्तुस्थितीच्या धोरणानें पहातां दिवाण साहेबांनीं राजीनामा दिला हें कांहीं विलक्षण वाटण्या सारखें नाहीं तर गत गोष्टींच्या ओघानेंच हा प्रकार घडून आला असें सहज कळून येणार आहे. माजी व्हाईसराय लार्ड रिपन यांनीं केवळ परोपकार बुद्धीनें हैद्राबादची राज्यव्यवस्था नीट सुयंत्र चालावी म्हणून स्वतः मध्यस्ती करून सर सालरजंग यास दिवाण केलें व ह्या मोठ्या संस्थानचा कारभार सुरळीत चालेल असा मार्ग लावून दिला व त्यांच्या मागून हल्लींचे व्हाइसराय लार्ड डफरिन यांनीं ही मोठ्या उल्हासानें लार्ड रिपन साहेबांची व्यवस्था कायम राखेल तितकी राखिली यांची सर्व अखेर दिवाण साहेबांच्या राजी नाम्यावर येऊन ठेपिली हें फार वाईट झालें. राजीनामा देण्याची कारणें अनेक असोत तरी सर सालरजंग यांनीं आपखुषीनें दिवाण गिरी नाकारिली व कर्नल मार्शल यांनीं तसें न होऊं देण्याबद्दल पुष्कळ प्रयत्न केले. माजि सर सालरजंग यांचे ज्येष्ट चिरंजीव जीव दिवाण राहिल्यान त्यांच्या वडिलांनीं तीस वर्षांत केलेल्या सुधारणा व राज्यव्यवस्थेतील फेरबदल हे उत्तम रीतीनें अमलांत येतील आणि शिवाय ते दिवाण कादमचे असल्यानें विरुद्ध पक्षाची मंडळी कांहीं व्यत्यय किंवा आडकाठी आणू शकणार नाहींत हे हिंदुस्थान सरकारास पक्के कळून आलें होतें व त्याप्रमाणें तें वागत होतें हें अतिरशः खरोखर आहे.

पुढें चालूं.

---

# The Berar Samachar

MONDAY APRIL 25 1887

## RULES UNDER SECTION 33 OF THE BERAR RURAL BOARDS LAW 1885.

One month's time is hardly enough for objections to the rules as framed being considered and submitted to the Resident. The framing of these rules is rather important, as there is chance of the spirit of the original Law being toned down by the rules framed theirunder. We confess, we have not had time enough to detect all objectionable rules but as it is necessary to put in all objections before that date, we will note some which appear to us on the very face of the rules.

Rule 111 lays down who the electors will, be having a right to vote for a member of a Talook Board. The number of voters is not to exceed 100 and to be no less than 25 as settled by the Commissioner and the Deputy Commissione What this comes to is that the Deputy Commissioner is to pack a body of 100 or less electors who will vote ior members of a Talook Board. This is by no means the spirit of the original Law. That Law defines the *classes* from which the electors are to come when it speaks of persons paying Jaglia Cess and Town Fund as possessing the right to vote only the *number* and qualifications of persons from amongst those classes being left to be determined by the Resident. Under the present rules however certain persons will have a right to vote, not because they belong to a certain *class* and possessing certain quaiifications, but because the Deputy Commissioner puts them in. As there is a general rule determining the qualifications of candidates to seats in Talug Boards in Rule 11 so there ought to be a *general rule* setting a limit to the right to elect. As it is, a wayward Deputy Commissioner can bring in the electoral body only such men as he thinks will be the least troublesome and most yielding; and besides all this will have a deteriorating effect on the electoral body as well as the members of a Talook Board, as they will always bear the consciousness of being the nominees of Deputy Commissioners. This is so to say nomination distguished in the form of an election.

If there were such a general rule framed for the constitution of electoral bodies after the fashion of Rule 11 for the candidates to a membership of a Talook board, and if after a certain number being elected the Deputy Commissioner or the Commissioner had a right to choose a certain member from out of them, it would have been far better than what it is now; but of course the best way would be to have a election under a general rule as above indicated.

Under Rule X11 the Deputy Commissioner or any other officer conducting the management at an election will, it is declared 'dispose *finally* of any question regarding the qualifications of voters or of candidates., Certainly this is not check enough on the officer presiding. In Bombay Presidency questions of this kind can be decided authoritatively finally by a Civil Court but if there is no need to go that length here in Berar, we would suggest that there should at least be a remedy by appeal to the officer superior to the one presiding at the elections.

In rule 15 it is said that when two candidates get an equal number of votes 'the election shall be decided by rotation.' We could not quite comprehend the meaning of this. At any rate it ought to be made more clear.

Rule 73 makes it incumbent on the District Boards to observe those general principles of which the Government has approved in the several departments of administration. This is ambiguous and it would be better to illustrate the rule by examples in point.

Under rule 79 certain funds which are to be shown at the credit of the District Boards as assets are not available for expenditure by the board itself so far as they may be given over to the Public Works Department to spend on works of local importance. Has the District Bo

ard no control over the expenditure of these sums by the Public Works Department. If it has none why should such items be shown to the credit of the District Eoarks. We think provision might be made for some sort of control by the Board upon the expenditure by that Department.

Rules 102 and 103 have the control and direction of receipts and expenditure with the Commissioner; but what if a difference of opinion arises between the Board and the Commissioner, as it is likely. In such cases this right to pass a final order must be with the Resident.

Under rule 112 the sanction of the Deputy Commissioner and Commissioner has to be obtained before certain expenses above 50Rs can be incurred. The remark above mentioned must apply also in this case.

Rule 113 (f) says that the Deputy Commissioner shall decide the agency for the execution of works and repairs. We think the District Boards have a right to be consulted as to the agency thought to be fit by the Deputy Commissioner; otherwise practically every thing must remain with that officer alone.

It is not much to say that the rules have been carefully framed; but there is no doubt that they require to be changed in certain places. As only the flaws in the rules are to be found out for possible amendment we have cursorily gone over the objections as they appeared to us.

---

The Amraoti Municipality have not yet decided what expenses they will do away with or what taxes they will bring in. We learn some members are for an Octroi; it will be as well to remind the Committee that the Banglore Municipality have lately decided to abolish the octroi. We hope to suggest something by which the Municipality could get what it wanted an increased revenue.

---

Dr. Pollen's views in connection with the Social Reform movement have been lately expressed. He differs very strictly from Sir Lepal Griffin who supported the movement at Indore. His argument that people should not be taught to consider their ancestors as unwise has been attacked by the Indu Prakash with some vehemance. The latter considers that the improvements effected by the natives in the world would not have come about if respect had always been paid to old institutions. The old is to be demolished because the present generation has been pleased to regard certain reforms in the society to be necessary. We do not suppose Dr. Pollen had not the sense to appriciate the value of reform and the strictures of the paper were unnecessary. The occasion may have been useful to the papers to turn into ridicute the sober action given by the Doctor but then who read between the lines would not consider the reproach as in any way deserved. The fanatic zeal of the Indu Prakash would be satisfied with nothing less than a complete break down of the arguments of the learned Doctor. When a man is determined to force the opposite [illegible] into silence he spares no efforts, genuine or vicious to get the victory. But though it would do very well for a flash of elguence, the value of the writing as a sober pie of criticism is necessarily weakened. The Indu Prakash is trying to inspirit the men in its ranks that the opposition of the Doctor might not warp their zeal. We suppose and that is the only possible supposition considering the erudition of the Doctor that he warned the people against making an innovation which would ill harmonise with the present state of thought and feeling and we suppose he was perfectly justified in giving out such a warning. The desire for reform might be too powerful to keep a touch of the past. The ancestors who introduced institutions that have stood for ages must have considered the matter very thoughtfully and although the advancement of society might render a similar change in the institutions desirable, the change ought to be made with such discretion that the people should accept it with pleasure and not consider themselves or overpressed. Such a change would be very little opposed and the society would be prepared for it. In fact such a change takes place of its own accord and all that the Reformers have to do is to help it on as much as possible. They may put before the public new material. Further suggestions might be made. But the public opinion must be formed upon them. They must be discussed in detail so much so that it might not be dfficult to measure the strength of opinion upon it.

---

## वऱ्हाड.

हवामान:— ह्या आठवड्यांत ऊष्णतेनें तर आपला कडक अम्मल बसविला. हवा बिघडण्याचा संभव दिसत आहे. बडनेर पर्यंत तर बाई साहेबाची स्वारी येऊन थडकली आहे असे समजतें.

रा. रा. गणेश रंगनाथ नाझर यांस मे० हेअरसाहेब यांच्या हाताखालीं अकौंटंटची जागा दरमहा रुपये १०० ची मिळाली व या प्रमाणें ते ह्या आठवड्यांत तिकडे जातील. त्याचे जागीं रा. रा. काशीराव रामचंद्र डेपुटी क्लार्क यांस व रा. रा. गणेश विष्णु खरे २५ रुपयाचे कारकून यांस डेपुटी क्लार्कचे जागीं नेमिले हे ऐकून आम्हास फार संतोष वाटतो.

खून:— थाखात वाडा येथें तीन चार दिवसापूर्वी एका मारवाड्याचा खून झाला. पोलीस तपास सुरूं आहे.

आग—गेल्या शुक्रवारीं व शनवारीं नवीन जीनींग कंपनी जवळ असलेले गवती झोपड्यास आग लागून कंपनीचें ३०१४० रुपयाचें नुकसान झालें. तसेंच शनवारी ऐन दोन प्रहरीं स्टेशन नजीकचे हमाल पुऱ्यात आग लागून गरीब लोकांचें बरेच नुकसान झाले. आमच्या म्युनिसिपालिटीचे एवढे जबर उत्पन्न असतां तिच्याजवळ अशा प्रसंगा करितां पाण्याचे पंप ठेवत नाहीं काय ?

प्रसिद्ध डाकेखोर तंट्या भिल्ल याचा सोबती [illegible] यांस वाशीम येथें एका जागल्यानें गोळी घालुन ठार केले सबब आत ९१० रुपये सरकारातून इनाम देण्यांत आलें.

मोर्तिजापूर तालुक्यातील जी गांवें उमरावती स्माल्काज कोर्टाचे स्थल सीमेत नाहित यातील ५० रुपये पर्यंतचे दिवाणी दावे चालविण्या करितां मि. गणेश श्रीकृष्ण खापरडे ए. अ. क. यांस स्मॉल कॉज जड्ज्याचा अधिकार देण्यांत आला.

मि० विश्वनाथ नारायण दांडेकर ए. अ. क. हे तारीख ६ मे १८८७ पासून ९१ दिवसांचे हक्काचे रजेवर जाणार आहेत.

येथील डे० क० कचेरींतील कारकून मि. नरसोपंत यांस निजाम सस्थांत ८० रुपयाची जागा मिळाल्यावरून ते तिकडेस लवकरच जाणार आहेत.

नाटक:—संगीत गुणोत्कर्ष मंडळीनें गेल्याशनवारी संगीत रंगी नायकीण प्रहसन करून दाखविलें. या प्रहसनांतील भाषा अगदी गचाळ. घाणेरडी वछचोर पणाची असल्या मुळें नऊरसांपैकी बीभत्स रसाची यांत बरीच रेलचेल आहे. हे नाटक कामचे येथील मंडळीस अगदीच नवें असल्या बद्दल व तें उत्तम होईल असें कळल्या मुळें थिएटरांत प्रक्षक जनांची बरीच गर्दी झाली होती परंतु भ्रमाचा भोपळा लवकरच फुटला. आमचे आकोलें वाशी जनांस अशाप्रकारचे बीभत्सर संयुक्त नाटक पाहण्याची मुळीच हौस नसल्या मुळें त्यास ते केवळ शिमग्यातील तमाशा प्रमाणें वाटले.

राजीनामा—निजामसरकारचे दिवाण सरसालरजंग यांनीं गेल्या ता० १८ रोजीं आपल्या हुद्दाचा व अधिकाराचा राजीनामा दिला. कां?

---

नोटीस

पंजाब नादरी मुकद्दमा नंबर. १

सन १८८७ इ०

नमुना ( जी. )

विद्यमान नादारी कोर्ट जिल्हा आकोलें यांचे कोर्टांतून सर्व लोकांस प्रसिद्ध करण्या साठीं कळविण्यांत येतें कीं, बंनाई मर्द संभाजी राहणार चतारी मुकयार राबजी हा नादार आहे असा आज तारीख २० माहे एप्रिल सन १८८७ इसवी रोजीं ठराव झाला आहे आणि तारीख ११ माहे मे सन १८८७ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करतां आणि सावकारांनीं आपल्या तर्फेचा असामी नेमून देण्याकरिता व नादारानें आपल्या सुटकेविषयीं दिलल्या अर्जाचा विचार करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटकेसंबंधीं ज्या सावकारांची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं या बदल आठ आण्याचे ष्टांप कागदावरर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणे असेल ते आधार आणि त्याबद्दल ज्या साक्षीस समन्स करावयाची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवे दाखल करावीं. ही नोटिस नेमण्याकरितां नेमलल्या तारखेच्या निदान तीनदिवस पूर्वी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनी पाहण्याकरितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड रीतीनें ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे ष्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी, व ते दावे खरें असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्यावर अर्जदारानें सही केली असावी.

जे सावकार दूरचे रहाणारे असतील त्यांनीं आठ आण्याच्या ष्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या ज्युडिशियल अफिसरापुढे तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी. आणि ती यादी टपलांतून कोर्टांस पाठवावी म्हणजे ते दावे रजिष्टर दाखल होतील. ता. २१-४-८७ इ०

Mahomad Yasinkhan.

जड्ज.

---

मागांहून आलेली नोटीस.

चतुरभूज सरदारमल हा मैत वारीस पुत्र चुणीलाल हा अज्ञान पालन करणार मातोश्री लाडूबाई मर्द चतुरभुज मारवाडी व तुळशीराम सरदारमल व जेसीराम सतीदान सर्व रहाणार जामोद तालुके जळगांव यांस.:— खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं कसबे जामोद तालुके जळगांव येथें तुमची व आमची शरकतींत राम गोपाल फत्तेलाल या नांवाचा दुकाण असून चतुरभुज हा मरण पावला आहे. दुकानची वहिवाट करण्यास कोणी नाहीं. सबब आम्ही तारीख १० माहे एप्रील सन १८८७ इसवी. रोजीं लाधुराम हिराचंद व गोविंदराम धनरूप या उभयतांस ती दुकानदारी १३,९८६८६ तेरा हजार नऊशें शहाशी रुपये सहा आण्यास विकली आहे. व त्याज बदल जमाखर्च ही झाला आहे व दुकानदारीमध्यें मालकाचे पुंजींत एकंदर नुकसानी ५८०९८९ निघाले आहे त्यापैकीं निमे हिस्साचे रुपये तुमचे कडेस घेणे निघतात ते २,९०४८१२॥ त्यांत तुमचें खात्यांत ६५४८६८३ देणें निघतात. ते रुपये वजा जातां बाकी रुपये २,५९०८६८३ तुमचें कडेस घेणें राहिले आहे. ते नोटीस पावल्या दिवसा पासून १५ दिवसाचे आंत ही रकम व नोटीसचा खर्च आणून दावा न दिल्यास रीती प्रमाणें दावा करून घेऊं अगर दुकानदारी आम्ही विकली ती तुम्हास कबूल नसल्यास निमे रकम पुंजीची तुम्ही १५ पंधरा दिवसाचे आंत आणून देणें व निमे दुकानदारी वाटून घेणें असें हो न केल्यास जी रकम वर लिहिलेली नुकसानी बदल निघत आहे. ती व त्याचें व्याज व कोर्ट खर्च आणि नोटीशीचा खर्च असें सर्व तुमचे पासुन भरून घेतले जाईल. तारीख १८ माहे एप्रील सन १८८७ इ०

(सही) श्रीराम सालीग्राम

दस्तुर खुद.

---

## वर्तमानसार.

नवीन आलेले मद्रासचे गव्हरनर लोकप्रिय होतील असें वाटतें. नेटवाशीं जितका निकट संबंध ठेववेल तितका ठेवण्याचा ह्यांचा इरादा आहे. मद्रासच्या मुख्य रेल्वेच्या स्टेशनावर हे साहेब एकाएकीं येऊन थडकले. त्यावेळीं यांनीं गाडीनिवळ पुष्कळ नेटीव उतारू नमलेले पाहिले, पण कोणी ही आंत शिरेना. ही स्थिति पाहून त्यांनीं एका रेल्वे नोकरास बळावून विचारलें कीं गाडीच्या सरतेशेवटीं असलेल्या रिकाम्या डब्यांत ह्यांस कां बसवीत नाहीं; शिपायानें उत्तर दिलें कीं हे रिकामे डबे पुढील स्टेशनच्या उतारूं करतां ठेविले आहेत, व ह्या लोकांसाठीं लवकरच नवीन डबे जोडण्यांत येतील. हें ऐकून साहेबांनीं "लज्जा, लज्जा" असे शब्द उच्चारिले. नंतर साहेबांनीं उतारू भरलेले डबे पाहिले व डबा अतिशय गर्दीनें भरलेला होता तोही पाहिला न ह्मणाले कीं प्रत्येक डब्यांत किती मनुष्यें असावयाचीं! शिपायानें उत्तर दिलें ९ पासून ६० पर्यंत. हें उत्तर ऐकून पुन्हा साहेबांनीं "लज्जा लज्जा" असे शब्द उच्चारिले. वाटेनें जात असतां साहेबांनीं एक रिकामी गाडी पाहिली व शिपायास विचारलें कीं ही रिकामी कशाकरतां. शिपायानें उत्तर दिलें कीं एका रेल्वेच्या आफिसरासाठीं मुद्दाम राखून ठेविली आहे. हें ऐकून पुन्हा साहेबांनीं लज्जा असे शब्द उच्चारिले साहेबांनीं विचारलें कीं अशी राखून ठेविलेली गाडी कोणच्या आफिसरास लागतें. त्यावर उत्तर मिळालें कीं एजंठ, म्यानेजर, ट्राफिक म्यानेजर, चीफ इंजिनियर, लोको. सुपरिंटेंडेंट व टेलिग्राफ इंजिनियर इतक्या प्रत्येकास वेळ पडेल तेव्हां असली एक गाडी द्यावी लागते. या गोष्टीचें टिपण करून साहेब निघून गेले. आमच्या इकडच्या रेल्वेंतही असाच एक धडधडीत अन्याय होतो. एका नेटिवानें व एका गोऱ्यानें तिसऱ्या क्लासाचें तिकिट काढिलें असतां गोऱ्यांस अगदीं निराळा डबा मिळत असून नेटिवांस मिळत नाहीं इतकेंच नसून गोऱ्याकरितां राखून ठेविलेल्या तिसऱ्या क्लासाचे कम्पार्टमेंटांत एखादा नेटिव बसला असून जर त्याच डब्यांत बसण्यास एखादा गोरा आल्यास नेटिवास खालीं उतरावें लागतें व वेळेस त्यास खेचूनही काढण्यांत येतें. दुकानदार जसा दोन गिऱ्हाईकांस सारख्याच किंमतींत एकास चांगला व एकास वाईट माल देत नाहीं तसेंच रेल्वेंतही करावें. दुसरा अन्याय तिकिट कलेक्टर जर नेटिव असला तर त्यास पगार १९ रुपये, पारशी असला तर २९ रुपये व गोरा असला तर ५० रुपये! ह्यावरून गोऱ्याकडून जें ह्मणण्यांत येतें कीं हिंदुलोक जाती मत्सर करतात तें तर अगदीं निर्विवाद खोटें ठरते पण उलट त्यांच्यांतच असला प्रकार आढळतो असें होतें आतां आम्ही प्रजा आहोत व ते राजे व जोंपर्यंत आमच्या अंगांत शक्ति नाहीं किंवा आमच्यांत एकी झाली नाहीं तोंपर्यंत त्यांचीं सर्व कृत्यें आम्हांस निमूटपणें सोसलीं पाहिजेत.

रशियाचा प्रधान तेहरान येथें येणार असल्यामुळें त्याचा आदरसत्कार करण्याची फार मोठी तयारी तेथें सुरू आहे.

टा० ऑ०

— डाक्टर डब्लू. डब्लू. हंटर यांनीं असें प्रसिद्ध केलें आहे कीं हिंदुस्थानांतील एक चतुर्थांश प्रजा एकवेळ मात्र जेवून दिवस काढतात.

— अमेरिकन लोकांनीं मरणाची शिक्षा झालेल्या कैद्यास फाशी देण्याच्या प्रकारांत विशेष क्रूरतां दिसून येते यास्तव विजेच्या यंत्राच्या साह्यानें ती शिक्षा अमलांत आणण्याचा विचार केला आहे.

— ताज्या मिलास पकडण्याचें काम मध्य हिंदुस्थानांतील व्हाइसराय साहेबांचे एजंटाकडे सोपविलें असून त्यांच्या ताब्यांत एक घोडेस्वाराची पलटण माळव्याची भिल्लाची पलटण व भोपाळची एक पलटण अशा तीन पलटणी दिल्या आहेत असें ह्मणतात.

— पंजाबांत लवकरच पर्जन्य पडून पिकें न सुधारल्यास तिकडेस दुष्काळ पडण्याची चिन्हें दिसत आहेत असें ह्मणतात.

— हिंदुस्थानांतून स्टेस, हांगकांग, आस्ट्रेलिया, इंग्लंड, आस्त्रिया, व इटली इतक्या ठिकाणीं काणिक विकरास जाते असें ह्मणतात.

— इम्पेरिअलइन्स्टिटुट बांधण्यास ६००००० पौंड खर्च लागेल या खेरिज याची पुढील व्यवस्था चालण्यास खर्च लागेल तो निराळाच असें म्हणतात.

— एडिंबरो युनिव्हर्सिटी गोंडलच्या ठाकूर साहेबांस डाक्टर आफ लाज ही पदवी देणार आहे.

— व्हाइसराय साहेबांस सिमल्यास जाण्याचा मूळ प्रघात पडण्याचें असें कारण सांगतात कीं मागील एका गव्हरनर जनरलास एक नाजुक कन्या होती तीस कलकत्त्याची हवा मानवत नसे यामुळें तिला वारंवार सिमल्याच्या थंड हवेंत नेऊन ठेवावी लागे. नंतर तिचीं मातापितरें पाठीमागून भेटण्यास जात तेव्हांपासून सर्वच व्हाइसराय सिमल्यास जाऊन कांहीं दिवस राहूं लागले असें म्हणतात.

— न्यूब्रिटेन बेटांतील लोक अजून मनुष्यांच्या मांसाचा अहार करतात व नवरा मेला कीं बायकोस लागलेंच मारून खातात असें म्हणतात.

— हल्लीं जपाना प्रमाणें जगांत कोठें ही उत्तम तरवारी होत नाहींत यामुळें जपानी शिपायांच्या अंगीं शीक लोकांप्रमाणें तरवारीनें युद्ध करण्याचें कौशल्य नसतां ही हात घाइवर येऊन जपानी लोकांशीं लढणें मोठें भयंकर आहे असें म्हणतात.

— अड्रिआटिक समुद्र किनाऱ्यास इलिरियाच्या डोंगराळ देशांत दोन धनगराचीं पोरें मेंढरें राखीत होती त्यापैकीं एकास गरूड पक्षानें उचलून नेण्याचा प्रयत्न केला परंतु लोखंडाची कडीं असलेला एक सोटा त्या मुलाच्या सावध्यानें पक्षाच्या डोक्यांत घातल्यामुळें तें मूल सुटलें असें ह्मणतात.

— थोड्या दिवसांपूर्वी इटालींत जो धरणी कंपाचा धक्का बसला त्यासमयीं एका दुकानवाल्याच्या कुत्र्यानें आपला धनी घराखालीं दडपला गेला आहे असें त्याच्या वासावरून ओळखून त्याचे मस्तकावरून मातीं उकरून काढली व त्यास लागलेल्या नखांतून रक्त वाहतें असें पाहून त्यास वाटूं लागलें. शेवटीं या कुत्र्यानें आपल्या धन्यावरील सर्व मातीं उकरून काढवणार नाहीं असें जाणून त्यानें एका मनुष्याचा कोट तोंडांत धरून त्यास घेउन आला व त्यास आपल्या धन्याचें मस्तक दाखविलें यामुळें तो मनुष्य वाचला गेला ! !

— पारसि डी व्याटल पत्रांत समरकंदच्या बातमीदाराचें पत्र छापिलें आहे. त्यांत बोखाऱ्याचे लोक, तो देश रशियानें आपल्या राज्यास जोडावा म्हणून, फार उत्सुक आहे व इंग्लंड व रशिया यानपैकीं कोणाचें वर्चस्व आशिया खंडांत असावे याजकरितां जबरदस्त प्रयत्न लवकरच सुरू होईल असें लिहिलें आहे.

— निजाम सरकारचा वऱ्हाड प्रांत इंग्रज सरकारच्या व्यवस्थेखालीं आहे. याच्या उत्पन्नांतून राज्य व्यवस्थेचा खर्च जाऊन सन १८८४।८५ साल अखेरीस ३४,७२,६०६ रु० शिल्लक राहिली. पुढच्या वर्षी आणखी साडे एकोणवीस लक्षांची शिल्लक राहिली. तिजपेकीं सव्वा आठरा लक्ष रु० तर या वर्षांत निजाम सरकारास दिले. बाकी सर्व शिल्लक इंग्रज सरकाराकडे आहे.

सु० प०

व्हाईसराय साहेबांची स्वारी डेऱ्हाडन येथें आहे. तेथें मुक्काम २३ तारखे पर्यंत होईल. आणि सिमल्यास जाण्यापूर्वी हद्वार व मसुरी येथें स्वीरा जाईल.

स्विझरलंड मधील डायव्होर्सचा कायदा— झ्यूरिच येथें परस्पराचे स्वभाव जुळत नाहीं. या कारणावरून जर नवरा बायको पैकीं कोणी सोडचिठ्ठी मागत असेल तर त्यांत शिक्षा देतात ती अशीः— त्या दंपत्यास एका किल्ल्यांत १९ दिवस ठेवितात येथें त्यांना एकच खोली दिलेली सामानांची व्यवस्था टेवलेली असते. त्यामुळें असें होतें कीं प्रत्येकास दुसऱ्यावर सर्वांशीं अवलंबून रहावें लागतें. यामुळें दोघाच्या स्वभावांतील सर्व विरोध तितक्या अवकाशांत अगदीं नाहींसे होतात व दोघांचीं मनें एक होतात. रखमाबाई, पाहा बावा. असें कांहीं केलेंत तर त्यांत तुमचा नफा आहे असें आह्मास वाटतें.

## वैद्यक मांत्रिकार्णव.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं आह्मी शके १८०९ चैत्र शुद्ध प्रतीपदेपासून "वैद्यकमांत्रिकार्णव" या नांवाचें मासिक पुस्तक काढणार आहेत; या पुस्तकामध्यें चरक, सश्रूत, वाग्भट, भावप्रकाश. आयुर्वेद इत्यादि संपूर्ण वैद्यशास्त्रविषय स्वीय ग्रंथांची, व यवनकृत वैद्यशास्त्रविषयक ग्रंथांची, व मंत्रमहोदधि. रुद्रयामल, शारदापटल दत्तपटल, प्रपंचसार, तंत्रसार, वाराहतंत्र. इंद्रजाल इत्यादि मंत्रशास्त्रविषयक ग्रंथांची माहिती क्रमाक्रमानें दिली जाईल हें पुस्तक रॉयल ४० पानांचें असून यामध्यें संस्कृत श्लोक मराठी अर्थासहित देऊन प्रसिद्ध केलें जाईल.

वर्षाची किंमत ४ रुपये ८ आणे व टपालखर्च ६ आणे.

किरकोळ अंकास ८ आणे.

वर्गणी आल्याखेरीज पुस्तक पाठविलें जाणार नाहीं.

नारायण गोविंदराव कडलक,
ज्योति. प्रकाशकर्ते, नानाची पेठ, घोंघोपेरानवळ घरनंबर २८४, पुणें.

## जाहीरात.
## उपनिषदांचा मराठी अर्थ

ऋग्वेदाच्या शाखा २१ आहेत. यजुर्वेदाच्या १०९, सामवेदाच्या १००० आणि अथर्ववेदाच्या ५० शाखा आहेत याप्रमाणें चारवेदांच्या मिळून ११८० शाखा आहेत. प्रत्येक शाखेंचें एकेक उपनिषद आहे, याप्रमाणें ११८० उपनिषदें आहेत त्यांतून मुख्य मुख्य अशा १०८ उपनिषदें श्रीरामानें मारुतीस उपदेशिलीं, त्यांचीं नावें:—ईश, केन, कठ, प्रश्न, मुंड, मांडुक्य, तैतिरीय, ऐतरेय, छांदोग्य, बृहदारण्यक, इत्यादि आहेत. त्यांतील ऋग्वेदाचीं १०, (शुक्लयजूंची १९ आणि कृष्णयजूंची ३२ अशीं) यजूंचीं ५१, सामवेदाचीं १६ आणि अथर्ववेदाचीं ३१ उपनिषदें आहेत. गौडपादाचार्य, श्रीमच्छंकराचार्य, शंकरानंद, सदाशिवब्रह्मेंद्र, स्वयंप्रकाशानंद आणि विद्यारण्याचार्य इत्यादिकांनीं पूर्वोक्त उपनिषदांवर भाष्य आणि व्याख्या केल्या आहेत.

श्रीरामानें हनुमंतास उपदेशिलेल्या १०८ उपनिषदांचें मराठी भाषांतर करावें, ते सांप्रतकाळास फारच उपयोगीं होईल असें कित्येक मित्रांनीं सुचविल्यावरून, तसें करावें असें मी इच्छित आहें.

प्रथम मूळ वाक्य लिहून नंतर त्याचे भाष्य आणि व्याख्या लिहून, त्यापुढें त्याचा अर्थ मराठींत लिहावा अशी योजना आहे.

हें पुस्तक सर्वांस घेण्यास सुलभ पडावें ह्मणून मासिक पुस्तक रूपानें छापणार आहों. रायल जातीचे अष्टपत्री साचानें पुस्तक प्रति महिन्यास निघत जाईल. चांगला आश्रय मिळेल तर दर पंधरवड्यासही काढितां येईल. प्रत्येक अंकांत १६ पृष्ठें. येत जातील. १२ अंकाबद्दल आगाऊ किंमत २ रु० व मागाहून ३ रु० पडेल. हांशील आगाऊ ८६ व मागाहू ८८ पडेल.

एकशेंआठ उपनिषदांचें मराठी भाषांतराची अभिरुचि लोकांस लागून त्याचा चांगला खप झाल्यास, बाकी राहिलेल्या १०७२ उपनिषदांचा शोध करून मिळतील तितकीं याच प्रमाणें छापण्याचा उद्योग करूं.

☞ हें पत्र आकोला येथें के० बाळकृष्ण खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छा० प्र० केलें.